चारित्र
२९८

REFBK-0000184

सं.प.२१८

बोधपर व नीतिपर

# साध्वी स्त्रियांचीं चरित्रें

भाग १ ला.

हें पुस्तक.

जनार्दन दिवाकर वैद्य.

REFBK-0000184

पुरंदर आणि कंपनीनें
सर्व हक्कांसह विकत घेऊन
मुंबईंत
'गणपत कृष्णाजी' छापखान्यांत छा०
सन १९०४, शके १८२६.

किंमत बारा आणे.

( ह्या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क प्रकाशक

चे २५ वे आक्टाप्रमाणें आपले

ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

सा सर्वांत श्रेष्ठ आणि सारा दिवस संसाराची दगदग क-
मनास विश्रांतीच्या वेळीं तर त्याची विशेष आवश्य-
अशावेळीं, आपल्या देशांत होऊन गेलेल्या नीतिमान्
वीं चरित्रें जर वाचावयास मिळतील तर त्यांपासून म-
रंजन होऊनही आणखी अनंत फायदे होतील; हें
ानवीकल्पनेनें येऊं शकणाऱ्या संकटांपैकीं अत्यंत
याचें धैर्य, नीति, उत्साह व प्रतिष्ठा हीं उत्तम
ीं; त्या अहिल्या, द्रौपदी, सीता इ. अनेक साध्वी
लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

ल्या पुरुष व स्त्री वाचकांकरितां हा जो अल्प प्र-
प ३ तो त्यांना कितपत मानवेल हें जरी आजच सांगतां
तरी पण साध्वी स्त्रियांच्या चरित्रांपासून त्यांचें पुष्कळ
ाचा संभव आहे. आमची आमच्या बंधु—भगिनींना अ-
आहे कीं, त्यांनीं हीं साध्वी स्त्रियांचीं रसाळ व सुनीति-
ग रित्रें वाचावीं, त्यांविषयीं विचार करावा आणि आपणही
ाच अजरामर कीर्ति मिळविण्याचा यत्न करावा. शेवटीं
हा अल्प प्रयत्न तडीस गेला, त्या परमेश्वराचे आभार
ाविक लेख पुरा करितों.

जनार्दन दिवाकर वैद्य.

ग्रंथकर्त्ता.



बोधपर व नीतिपर

# साध्वी स्त्रियांचीं चरित्रें.

## अहिल्या.

ही ब्रह्मदेवाची मानसकन्या व गौतम ऋषीची पत्नी. अहिल्या परम सुंदर, सत्गुणी व मोठी पतिव्रता असल्यामुळें तिला पुराणप्रसिद्ध पंच कन्यांत आद्य स्थान मिळालें आहे. अहिल्या उपवर झाली तेव्हां तिच्या स्वयंवराविषयीं ब्रह्मदेवानें असा पण प्रसिद्ध केला होता कीं, दोंन प्रहरांत जो पृथ्वीप्रदक्षिणा करून येईल, त्याला मी आपली कन्या अहिल्या ही अर्पण करीन.

अहिल्या ही परम सुंदर रूपवति आहे अशी कीर्ति ऐकिल्यावरून देव, ऋषि, यक्ष, गंधर्वादि सर्वत्रांस तिजविषयीं प्रेम व तिचें पाणिग्रहण करण्याची उत्कट इच्छा उत्पन्न होऊन ते आपापल्या वाहनांवर बसून पृथ्वी प्रदक्षिणेस निघाले. इंद्र आपल्या ऐरावतीवर बसून निघाला. शंभु नंदीवर बसले व गणपति आपल्या विशाळ दोंदासह

मूषकावर स्वार होऊन विष्णु गरुडारूढ झाले, या प्रमाणें सर्वच आपापल्या वाहनांवर बसून मोठ्या तांतडीनें एका मागें एक धांवत सुटले ! ! ज्याला त्याला वाटे कीं, आपण, सर्वांच्या आधीं ब्रह्मदेवाजवळ जाऊन पोंचावें; कारण, जो सर्वांच्या अगोदर पृथ्वीप्रदक्षिणा करून येईल त्यालाच नवरी मिळावयाची असा पण होता; ह्मणून जो तो सर्वां अगोदर पृथ्वीप्रदक्षिणेचें श्रेय संपादन करून घेण्यांत सक्त गुंतला होता.

इकडे गौतम ऋषि गंगेवरून स्नान करून परत येत असतां मार्गांत एक कपिल वर्णाची धेनु प्रसूत होत होती. वत्स अर्धें पोटांत असून अर्धें बाहेर आलें होतें; ही संधी पाहून मुनिवर्यांस वाटलें कीं, ब्रह्मदेवाची कन्या आपलीशी करण्यास ही युक्ती बरी आहे ! कारण, प्रसूत होत असलेल्या धेनूस प्रदक्षिणा केली असतां पृथ्वीप्रदक्षिणा केल्याचें श्रेय मिळतें, अशी पुरातन काळापासून आह्मां आर्यांची समजूत आहे. असो ! असा विचार करून गौतमानें त्या धेनूस तीन प्रदक्षिणा घातल्या आणि सत्यलोकीं गमन केलें.

गौतमानें सर्वांच्या अगोदर पृथ्वीप्रदक्षिणेचें श्रेय मिळविलें असें पाहून, ब्रह्मदेवानें त्याजकरवीं आपल्या

कन्येचें यथाविधि पाणिग्रहण करविलें. इतक्यांत इंद्र सर्वांच्या पुढें पृथ्वीप्रदक्षिणा करून तेथें आला! आतां अहिल्या आपल्याला माळ घालील अशी देवेंद्राला मोठी आशा होती, पण तेथें निराळाच प्रकार त्याच्या दृष्टीस पडला. आपल्या आशेचा भंग झाल्यामुळें अमरपतीला मोठें दुःख होऊन ब्रह्मदेवानें अहिल्येसारखें रत्न गौतमासारख्या वृद्ध तपस्व्याच्या गळीं बांधल्यामुळें मोठा रागही पण आला; त्यानें अहिल्येचें पातिव्रत्य भ्रष्ट करण्याचा निश्चय करून मोठ्या त्वेषानें हात पाय आपटीत अमरावतीकडे गमन केलें. इकडे गौतमही आपल्या भार्येसह मोठ्या आनंदानें आश्रमीं आला. अहिल्येचें पाणिग्रहण करण्याच्या हेतूनें पृथ्वीप्रदक्षिणेस गेलेल्या इतर देवांना हें वर्तमान समजतांच, त्यांना गौतमाच्या या युक्तीचें आश्चर्य वाटून मोठा आनंद झाला. असो!!

इकडे गौतम अहिल्येसह आनंदानें काल घालवीत असतां, तिकडे इंद्रही आपले हेतु पूर्ण करण्याची संधी पहात होता; पण पुष्कळ दिवसपर्यंत त्याच्या मनाप्रमाणें घडून आलें नाहीं.

पुढें बराच काळ लोटल्यावर, एके समयीं सूर्यग्रहणपर्वानिमित्त गौतमऋषि आपल्या प्रियपत्नीस घेऊन भागिरथीचें स्नान करण्यासाठीं गेला व स्नान दानादि आटपल्यावर

अहिल्येस परत आश्रमीं पाठवून आपण ग्रहणसंबंधी जपास बसला.

इकडे अहिल्या आश्रमांत येऊन फार वेळ झाला नाहीं तोंच इंद्र गौतमाच्या वेषानें तेथें आला आणि अहिल्या आश्रमांत एकटीच आहे असें पाहून, तो कपटवेषधारी आश्रमाच्या द्वाराशीं उभा राहिला आणि केंविलवाण्या स्वरानें " अहिल्ये धांव " असें ह्मणून, त्यानें धरणीवर धाडकन आंग टाकिलें. ही शोकमद करुणावाणी ऐकून ती साध्वी घावरून आश्रमाच्या द्वाराकडे धांवली आणि पहाते तों आपला पति मूर्च्छा येऊन पडला आहे ! ! आपल्या पतीची एकाएकीं झालेली ही अवस्था पाहून त्या साध्वीला अनिवार दुःख झालें तथापि तिनें धैर्य धरून त्याला हळूच उचलून नेऊन पुष्पशय्येवर निजविलें आणि आपल्या कोमलकरांनीं पुष्कळ शीतोपचार केले. मग कांहीं वेळानें त्या वेषधारी मुनिवर्यांनीं आपले नेत्र उघडले व आपला हेतु कळविला. तेव्हां अहिल्येस मोठें संकट पडलें. पण ती मोठी विचारी व चतुर असल्यामुळें तिनें आपल्या पतीचें मन वळविण्याचा प्रयत्न केला, ती ह्मणाली—' प्राणवल्लभा, मला आपली आज्ञा शिरसावंद्य आहे हें खरें ! पण आज ग्रहण. तशांत माध्याह्नसमय झालेला असें असतां, आपण हें काय बोलतां ? स्वामी

आपण शास्त्रज्ञ असल्यामुळें आपल्याला सर्व गोष्टी अवगत आहेत; मी सांगावें असें नाहीं आणि तसें सांगण्याची या दासीची योग्यताही पण नाहीं. ” ब्रह्मतनयेचें हें भाषण ऐकून तो वेषधारी गौतम ह्मणाला–‘ प्रिये, पति हें स्त्रियांचें मुख्य दैवत असल्यामुळें, पतिवचन हेंच स्त्रियांस शास्त्रप्रमाण आहे, ” हें भाषण ऐकून ती साध्वी निरुत्तर झाली. असो !

तो वेषधारी गौतम अहिल्येसह आनंदांत आहे; इतक्यांत खरे गौतमऋषि आपलें आन्हिक व ग्रहणसंबंधीं जप आटपून आश्रमीं येऊन अहिल्येस हांका मारूं लागले. पतीचा शब्द ऐकतांच अहिल्या घाबरून उठली आणि त्या वेषधारी पुरुषाकडे क्रोधदृष्टीनें पाहून ह्मणाली–दुष्टा साध्वीछलोत्पादका, तूं कोण आहेस ? अहिल्या इतका वेळपर्यंत हा आपला पति गौतममुनिच आहे असें समजत होती. अहिल्येच्या भाषणावर तो वेषधारी मोठ्या डौलानें ह्मणाला–‘मी अमरेंद्र आहें, ते ऐकून अहिल्येनें त्याचा धिःक्कार करून त्यास तूं ‘ येथून सत्वर निघून जा’ ह्मणून सांगितलें व आपण दार उघडलें. गौतममुनि महा ज्ञानी व अंतरसाक्ष असल्यामुळें घडलेलें यच्चयावत वर्तमान त्यांना कळलें होतें. ह्मणून त्यांनीं आंत येतांच इंद्राला ‘ तुला सहस्त्र भगें

पडोत ' असा शाप दिला. मुनीच्या शापानें प्रत्यक्ष सुरपतीची झालेली भयंकर स्थिति पाहून तर अहिल्येच्या काळजानें ठावच सोडला. भीतीनें तिच्या सर्वांगाचें पाणी होऊन आतां आपली धडगत नाहीं असें तिला वाटलें. सारांश—भावी स्थितीविषयीं अनर्थावह असे हजारों तरंग तिच्या मनांत एकदम उभे राहिले. अहाहा ! त्या वेळीं कल्पांतींच्या रुद्राप्रमाणें भयंकर दिसणाऱ्या त्या तपोनिधीपुढें हात जोडून व दीनमुद्रेनें स्वामिचरणांकडे नजर लावून उभी असलेल्या अहिल्येचें चित्र रेखण्यास एखाद्या कुशल व मार्मिक चितार्‍यास सुद्धां पुष्कळ प्रयास पडले असते ! ! असो; मुनीचा प्रज्वलित कोपानल एकट्या पाकशासनाचीच आहुति घेऊन राहिला नाहीं; त्यानें अहिल्येसही " तूं शिळा होऊन साठ हजार वर्षेपर्यंत अरण्यांत पडून राहाशील " असा शाप दिला.

शापवचन ऐकून अहिल्येला ' देमाय धरणी ठाय ' झालें; तथापि अशा शोकप्रद प्रसंगींही तिनें धैर्य सोडलें नाहीं. आपला पती समर्थ असल्यामुळें, त्याला शरण जाण्याखेरीज अन्य तरणोपाय नाहीं असें जाणून अहिल्येनें आपल्या पतीचे पाय घट्ट धरिले व हातून घडलेलें कृत्य न जाणतां अज्ञानपणानें घडलें अशी पतीच्या मनाची खातरी करून, क्षमा करण्यासाठीं, त्याची

पुष्कळ प्रकारें विनवणी केली. घडलेला प्रकार अहिल्ये-च्या हातून केवळ अज्ञानानें घडला असून, तिला कृतकर्माबद्दल पश्चात्ताप झाला आहे अशी जेव्हां गौतमाच्या मनाची पक्की खातरी झाली, तेव्हां अहिल्येला दिलेल्या शापाबद्दल त्याला मोठें दुःख झालें. आपल्या प्रियतमेची ती केविलवाणी मुद्रा पाहून गौतमाच्या नवनीताहून ही मृदु व कोमल हृदयाला प्रेमाचा पाझर सुटला. गौतमानें या गोष्टीचा आपल्या मनाशीं पुष्कळ विचार करून अहिल्येस उश्शाप दिला; तो ह्मणाला-' अहिल्ये ' तुझ्या हातून हें घोरकर्म फसगतीनें घडलें असेल, पण ज्यानें तुझ्या पातिव्रत्याला कलंक लाविला त्याला शासन करण्याचें तुझ्या आंगीं सामर्थ्य असतां, त्या वेषधारी कपटपटूला त्वां असेंच जाऊं द्यावेंस ? असो; आतां पुढें त्रेतायुगांत महाविष्णु ' राजारामचंद्र ' या नांवानें अ-वतरणार आहे; त्या रविकुलावतंस दाशरथिरामाच्या पादस्पर्शानें तूं आपलें पूर्वरूप पावशील. " असें ह्मणतांच अहिल्या शिळा होऊन जमिनीवर पडली. त्या पाषाणरूप अहिल्येस पाहातांच तिच्या संस्मरणीय गुणांचें स्मरण होऊन, त्या ब्रह्मनिष्ठ तपोनिधीला अनिवार रडें कोस-ळलें. अहिल्येसारखें पतिव्रता धन घोर अरण्यांत एक-टेंच टाकून तपश्चर्येस जाणेंही त्याला इष्ट वाटेना, ह्मणून

त्यानें ' जे जीव या शिळेसमीप येतील, ते सर्व गतप्राण होतील ' असा त्या क्रूर व भयंकर प्राण्यांच्या वसतिस्थानास शाप दिला व आपण बद्रिकाश्रमीं जाऊन तेथें अनुष्ठान करीत राहिला.

पुढें त्रेतायुगांत श्रीरामहस्तें ताटका व तिचा पुत्र सुबाहु यांचा वध होऊन व मारीच नामक तिच्या द्वितीय पुत्रास जलसमाधीचें प्रायःचित्त मिळून, विश्वामित्राचा यज्ञ सिद्धीस गेल्यावर जनकराजाच्या निमंत्रणावरून सीतास्वयंवरासाठीं रामलक्ष्मणासह विश्वामित्र मिथिला नगरीस जात असतां मार्गांत त्यांना एक अरण्य—जेथें अहिल्या शिला होऊन पडली होती तें—लागलें; तेथें कोणत्याही प्राण्याचें वास्तव्य नाहीं हें पाहून रामास मोठें आश्चर्य वाटलें. त्यानें हें वन असें कां ह्मणून विश्वामित्रास प्रश्न केला; तेव्हां विश्वामित्रानें गौतमऋषि व त्याची स्त्री अहिल्या यांचा वृत्तांत ह्मणजे आह्मीं वर लिहिलेलें चरित्र सांगितलें; त्यावरून राम तिच्या दर्शनास गेला. तों असें झालें कीं, त्या शापदग्ध गौतमभार्येवर रामाचे पदरजःकण उडून पादस्पर्श होतांच तिचा उद्धार झाला.

अहिल्या शापमुक्त झाली असें जाणून गौतमही तेथें प्रगट झाला; नंतर सर्वांच्या आनंदानें भेटी होऊन, अहिल्येसह त्या ऋषिश्रेष्ठाची श्रीरामचंद्रानें यथाविधि पूजा

केली. त्यांनींही ‘ तुला स्वयंवरांत सीता नवरी प्राप्त होवो’ असा आशिर्वाद दिला.

नंतर साध्वी अहिल्या व गौतम हीं मोठ्या आनंदानें प्रभूचे गुणानुवाद वर्णन करीत स्वाश्रमीं परत गेलीं.

# द्रौपदी.



# द्रौपदी.

ही पांचालकुलोत्पन्न द्रुपद राजाची कन्या व पुराण-प्रसिद्ध पंचकन्यांतील एक. हिला कुलाच्या व पित्याच्या नांवावरून ' पांचाली' व 'याज्ञसेनी' अशीं हीं नांवें होतीं. पांचाली ही द्रोणाचार्यांस मारणारा पुत्र उत्पन्न व्हावा ह्मणून द्रुपदराजानें केलेल्या यज्ञांत शचीच्या अंशानें अग्नीं-तून निर्माण झाली असून अंगकांति गौरवर्णांत किंचित् श्यामता मिश्रित असल्यामुळें द्रुपद राजानें द्रौपदीचें लाडकें नांव ' कृष्णा ' असें ठेविलें होतें.

कृष्णा उपवर झाल्यावर द्रुपदराजानें तिचें स्वयंवर आरंभिलें; त्यांत ' मत्स्ययंत्रभेदाचा ' पण केला होता. स्वयंवरास अनेक देशींचे राजे व राजपुत्र आले होते; त्यांत मत्स्ययंत्राचा भेद कोणासही होत नाहीं असें पाहून कर्ण त्याचा भेद करावयास उठला; त्यास हा ' हीन-जाति ' असल्यामुळें मी वरणार नाहीं असें द्रौपदीनें सांगितल्यावरून त्या मत्स्ययंत्राचा भेद विप्रवेषधारी अर्जुनानें केला व द्रौपदीस वरिलें.

द्रुपदराजानें आपली कन्या ब्राह्मणास दिली असें पाहून पांचालपुरास जमलेले राजे व राजपुत्र रुष्ट झाले; त्यांनीं द्रुपदाशीं युद्ध प्रसंग आरंभिला; तेव्हां भीमार्जुनांनीं पुढें होऊन त्या सर्वांचा पराभव केला व द्रौपदीस घेऊन ते ज्या कुलालगृहीं[1] उतरले होते तेथें गेले. ज्यानें द्रौपदीस वरिलें तो व त्याचे सहायकर्त्ते ब्रह्मकुलोत्पन्न असून, ते ज्या अर्थी कुलालगृहीं वास्तव्य करितात; त्या अर्थी ते ब्राह्मणच आहेत किंवा कसें याविषयीं द्रुपदराजास संशय येऊन, त्यानें त्यांचा गुप्तपणें शोध करावा या हेतूनें धृष्टद्युम्नास तिकडे पाठविलें. पांडव ज्या कुलालगृहीं उतरले होते; त्याच्या बाह्यप्रदेशीं तो रात्रीं उभा राहून त्यांचीं भाषणें काय होतात तीं ऐकूं लागला; त्यांत त्यांच्या संभाषणावरून ते क्षत्रिय आहेत असें जाणून, त्यानें तें वर्तमान आपल्या पित्यास येऊन कळविलें; तें ऐकून द्रुपदाला मोठा आनंद झाला, त्यानें दुसऱ्या दिवशीं त्या पांचांसही मोठ्या समारंभानें राजमंदिरीं आणिलें; त्यांत धर्माच्या

१ कुंभाराच्या घरीं.

भाषणावरून ते पांडव आहेत अशी खात्री होतांच द्रुपदराजाला पराकाष्ठेचा आनंद झाला, हें सांगावयास नकोच. कारण द्रौपदी अर्जुनाला द्यावी असा पहिल्यापासूनच त्याचा निश्चय होता.

द्रौपदीचा अर्जुनाबरोबर विवाह करण्याची सिद्धता द्रुपदराजा करूं लागला; तेव्हां युधिष्ठिरानें, मातेच्या आज्ञेप्रमाणें वागणें आह्मांस उचित असल्यामुळें द्रौपदीचा विवाह अम्हांपांचांसमागमें झाला पाहिजे असें सांगितलें. युधिष्ठिराचें हें भाषण ऐकून द्रुपदास मोठा विचार पडला. इतक्यांत कृष्णद्वैपायन व्यास तेथें प्रगट होउन, त्यांनीं "पांडव हे पूर्वींचे पांच इंद्र असून द्रौपदी ही शची आहे; यास्तव तिचा विवाह पांचांशीं विरुद्ध नसून, कुंतीनेंही 'तुह्मी आणलेली भिक्षा समसमान वांटून घ्या' असें सांगितलें आहे" त्याअर्थी तो निंद्य नाहीं; असें सांगून, या विषयीं आधारभूत अशी जंटिलेची व कंडुक ऋषीस प्रम्लोचा अप्सरेपासून झाले-

---

१ ही गौतमकुलोत्पन्न कन्या असून, हिला सात पति असल्याचें भारतांत सांगितलें आहे.

'ल्या 'मारीषा' नामक कन्येची कथा सांगितली. त्याव-रून द्रुपदराजानें आपली कन्या त्या पांचांसही अर्पण केली. कित्येक दिवसपर्यंत तत्संबंधीं सोहाळा होऊन विवाहसमारंभ यथासांग उरकल्यावर असंख्य गज, अश्व, रथ, दास, दासी, रत्नें, भूषणें, वस्त्रें, व अपार धन देऊन धृतराष्ट्राकडून त्यांस हस्तिनापुरास नेण्यासाठीं विदुर आला होता; त्यासहित पांडवांस त्यानें मोठ्या आनंदानें निरोप दिला.

पांडव हस्तिनापुरास आल्यावर, त्यांचा व दुर्योधना-दिकांचा कलह अधिक न वाढावा ह्मणून, त्यांस अर्धें राज्य देऊन, खांडववनांत नगर वसवून तेथें रहावयास सांगितलें; त्यावरून पांडवांनीं तेथें येऊन कृष्णद्वैपायन व्यासांनीं सांगितलेल्या मुहूर्तावर 'इंद्रप्रस्थ' नांवाचें नगर वसविलें. येथें असतां पांडवांनीं स्वपराक्रमानें अ-पार संपत्ति मिळवून 'राजसूय' नांवाचा मोठा यज्ञ केला. त्यावेळीं दुर्योधन हा आपल्या बंधूंसह धृतराष्ट्रा-समागमें तेथें गेला असतां, श्रीकृष्णानें याकडे कोशागा-

---

१ हिला दहा पति असल्याचे पुराणांतरीं वर्णन आहे. उत्तान-पादवंशीय बर्हिराजाचें 'दशप्रचेतस' नांवानें प्रसिद्ध असलेले दहा पुत्र तेच हिचे पति होत.

राचा अधिकार दिला होता; त्यावरून यानें द्वेषानें, फूट पडावी ह्मणून जरी द्रव्याचा अपरिमित व्यय केला तरी तें सरलें नाहीं; तेणेंकरून, व मयासुरानें त्यांस तयार करून दिलेल्या सभेचें ऐश्वर्य अवलोकन करून, त्यास पांडवांच्या संपत्तीविषयीं अनिवार लोभ उत्पन्न झाला.

पुढें दुर्योधनानें हस्तिनापुरास आल्यावर कर्णादिकांच्या सहायानें शकुनीकडून द्यूतमिषानें मयसभेसहित पांडवांची सर्व संपत्ति व राज्य हरण करवून, व त्यांनाही पणास लावून घेऊन जिंकिल्यावर द्रौपदीस जिंकलें व तिला सभेंत आणण्यासाठीं दूतास पाठविलें. पण द्रौपदीनें विचारिलेल्या प्रश्नांचीं त्याला उत्तरें देतां न आल्यामुळें तो परत आला. आपला अपमान झाला हें पाहून दुर्योधनाला मोठा राग आला; त्यानें दुःशासनाकरवीं द्रौपदी ऋतुस्नात असतांही तिची वेणी धरून, तिला फरफरां ओढीत सभेंत आणिलें; त्यावेळीं तिनें भीष्मद्रोणादि ज्ञानवृद्धांस प्रश्न केला कीं, " मला दुर्योधनानें जिंकलें हें सत्य कीं, असत्य ? " ती पुनः पुनः दीनवाणीनें प्रार्थना करून हाच प्रश्न करी, पण त्यावेळीं त्या साध्वीच्या प्रश्नाचें उत्तर कोण देणार ? भीष्म-द्रोणादिकांनीं तर बहुतेक आपल्या कानावर हात ठेवल्या सारखें केलें;

तथापि विदुर व विकर्ण यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, " द्रौपदी, कौरव तुला जिंकिलें ह्मणून ह्मणतात, हा शुद्ध अन्याय आहे.

आपल्या प्रियतमेची निष्कारण चाललेली विटंबना पाहून भीमसेनाला अनिवार क्रोध उत्पन्न झाला; त्यानें सहदेवाला अग्नि आणण्याची आज्ञा करून, जे हस्त पांडवललनेची विटंबना होण्यास कारण झाले; ज्यांनीं पांडवांच्या माना शत्रूच्या हातीं दिल्या, ते युधिष्ठिराचे हस्त दग्ध करण्यास तो सिद्ध झाला. पण अर्जुनानें त्याचें शांतवन करून, त्याला स्वस्थ बसविलें; नाहींपेक्षां केव्हढा भयंकर प्रसंग ओढवता हें आमच्यानें सांगवत नाहीं. असो.

इकडे द्रौपदीनें आपल्या मांडीवर येऊन बसावें ह्मणून दुर्योधनानें भर सभेंत धृतराष्ट्र, भीष्मद्रोणादि वृद्धांसमक्ष तिला खूण केली. इतकेंच नव्हे तर 'तूं या सार्वभौम कौरवेश्वराची पट्टराणी हो;' असेंही सांगितलें. आपणास पृथ्वीपति ह्मणविणाऱ्या त्या दुरात्म्या कुलांगाराचें हें निर्लज्जपणाचें वर्तन व काळजाला घरें पाडणारें भाषण यांहींकरून पांचालीच्या सर्वांगाची क्रोधाग्नि होळी झाली. तें पाहून द्रौपदीच्या या क्रोधाग्नींत सर्व कुरुकुलांची आतांच आहुति पडते कीं काय अशी सर्वां-

सें मोठी धास्ती पडली. क्रोधभरानें संतप्त झालेल्या द्रौपदीनें दुर्योधनास शाप दिला. ती ह्मणाली–" अरे साध्वीछलका, अंतीं तुझ्या या शब्दांची तुला आठवण करून देऊन भीमसेनाची गदा तुझ्या मांडीवर बसेल, ती तुझे सर्व हेतु पूर्ण करील; मग तूं आपल्या प्राणांचा त्याग करून आपल्या मातापितरांना आणि स्त्रियांना दुःखसागरांत लोटून, तिजसमागमें रणमंचकीं अक्षय्य निद्रा घे. " काळजाला तीव्रशरासारखें टोंचणारें हें भाषण ऐकून दुर्योधन सापासारखा खवळून गेला; नेत्र आरक्त होऊन आतां या द्रौपदीचें काय करूं असें त्याला झालें! तो मोठ्या आवेशानें दांत ओंठ खाऊन ह्मणाला–" अरे, पहातां काय ? हिचीं वस्त्रें हिरून घ्या; हिची जिव्हा छे-दून देहाचे शतशः तुकडे करा. " ही पडत्या फळाची आज्ञा मिळतांच दुःशासनानें धांवत जाऊन डाव्या हातानें त्या साध्वीची वेणी धरली व उजवा हात तिच्या वस्त्रास घातला; त्यावेळीं कौरवसभेंतून ‘ अन्याय, अन्याय ’ असे उद्गार निघून सर्वत्रांनीं आपले नेत्र झांकिले. विदुरानें ही दुष्ट बुद्धि सोडून देण्याविषयीं दुर्योधनाला पुष्कळ बोध केला. पण त्यानें तिकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. आपल्या धर्मपत्नीचा नाहक छल करणाऱ्या दुष्टांचें पारिपत्य क-रण्याचें आपल्या आंगीं सामर्थ्य असतांही आपल्याला

दीनासारखें एका बाजूस बसण्याचा प्रसंग आलेला पाहून पांडवांना मरणापेक्षांही अधिक दुःख झालें असेल! आपल्या अर्धांगीची भर सभेंत चाललेली विटंबना, त्याचप्रमाणें आपल्या व आपल्या बंधूच्या नाशाविषयीं दुर्योधनादिखलांनीं केलेलीं कपटकृत्यें भीमसेनाच्या डोळ्यांपुढें मूर्तीमंत उभीं राहून, त्याचें नऊहजार हत्तीचेंबळ त्याच्या देहांत एकदम संचरलें!! त्या दुरात्म्या कौरवांच्या शोणितनदींत आपण केव्हां डुंबूं असें भीमसेनाला वाटूं लागलें! क्रोधावेशानें तुफान झालेल्या भीमसेनानें आपली गदा सांवरून, त्या दुष्ट दुरात्म्या कौरवांचा संहार करण्याची तयारी केली, पण ज्येष्ठभ्रात्याच्या आज्ञेशिवाय पाऊल टाकावयाचें नाहीं असा त्याच्या मनाचा निर्धार झाल्यामुळें त्याला स्वस्थ बसणें भाग पडलें.

इकडे दुर्योधनानें वस्त्रहरणाची एकसारखी घाई लाविली होती. आपले पांचही पती सिंहासारखे महत्पराक्रमी असतांही, ते कौरवांच्या कपटपाशांत सांपडून दीन व अधोवदन होऊन बसल्यामुळें, येथें परमेश्वराशिवाय आपला कोणीही कैंवारी नाहीं असें पाहून द्रौपदीनें मनोभावानें श्रीकृष्णाचा धांवा आरंभिला.

आपली प्रिय भगिनी महत् संकटांत पडली असून ती करुणावाणीनें आपला धावा करीत आहे असें जाणून, त्या भक्तकामकल्पद्रुम द्वारकाधीशानें, रुक्मिणीनें नानाप्रकारच्या पक्वान्नांनीं सिद्ध करून पुढें ठेविलेल्या अन्नपात्राचाही स्वीकार न करितां द्रौपदीकडे धांव घेतली.

इकडे राजसभेंत काय चमत्कार झाला तो पहा ! दुःशासन पांचालीचें एकेक वस्त्र हरण करी तों आंत त्यापेक्षांही सरस दुसरें आहेच. असे एकापेक्षांएक बहुमोल अशा वस्त्रांचे ढीगच्या ढीग तेथें पडले. याप्रमाणें भगवान् श्रीकृष्णानें वस्त्रें पुरवून आपल्या भगिनीची लज्जा रक्षण केली. खरेंच आहे कीं; कमलावर आपल्या अनंत हस्तांनीं देऊं लागला. ह्मणजे दुःशासनासारखे मानवकोटींतील क्षुद्र प्राणी आपल्या दोन हातांनीं कितीसें घेणार ? जेथें प्रत्यक्ष भगवान् पांचालीची लज्जा रक्षण करण्यास उभा राहिला; तेथें दुःशासनासारख्यांचा पाड काय ? असो. शेवटीं हातीं सुदर्शन घेऊन श्रीकृष्णानें विराटस्वरूप प्रगट केलें; तें पाहून सर्व सभा भयकंपित झाली. दुर्योधनास मोठा धाक पडून त्यानें हस्तसंकेतानें दुःशासनाचें निवा-

---

१ द्रौपदी ही कृष्णाची प्रत्यक्ष बहीण नव्हे. द्रौपदीची आपणाविषयीं दृढ भक्ती व प्रेम पाहून श्रीकृष्ण तिला'बहीण'ह्मणत असे.

रण करून तेथें जमिनीवर पडलेले वस्त्रांचे ढीग भांडारगृहांत नेऊन ठेवण्यास सांगितलें; तों ते तेथच्या तेथेंच आदृश्य झाले. ईश्वर आपला पाठिराखा आहे; त्यानें विपत्कालींही आपणास न विसरतां आपल्या भार्येची लाज राखिली हें पाहून पांडवांस मोठा आनंद झाला; तसेंच दुरात्म्या कौरवांनीं आपल्या प्रियतमेची निष्कारण विटंबना केल्यामुळें भीमसेनाला अनिवार क्रोध उत्पन्न होऊन त्यानें दुर्योधन व दुःशासन यांस मारून दुःशासनाचें रक्त भाशन करण्याची व रुधिरभरित हस्तांनीं याज्ञसेनीची वेणी घालण्याची घोर प्रतिज्ञा केली. हा सारा प्रकार अवलोकन करून धृतराष्ट्राला मोठें दुःख वाटलें; त्यानें दुर्योधनाची पुष्कळ निर्भत्सना करून द्रौपदीची क्षमा मागितली. तो ह्मणाला “ सुमति, माझ्या पुत्रांनीं जे तुझे घोर अपराध केले त्यांबद्दल मनांत विषाद न धरितां तुला जें मागणें असेल तें माग; मी प्रसन्नचित्तानें देण्यास तयार आहें ” धृतराष्ट्राचें हें भाषण ऐकून द्रौपदी ह्मणाली–“ मामंजी, माझे पांचही भ्रतार तसेंच प्रतिविंध्यादि पुत्र ‘ दास ’ भावापासून मुक्त व्हावे असा प्रथम वर द्यावा. ” यावर धृतराष्ट्रानें ‘ तथास्तु ’ ह्मणून दुसरा वर मागण्याची आज्ञा केली. तेव्हां द्रौपदी ह्मणाली. “ हे पृथ्वीपते, धनुष्यबाण आणि रथ

यांसह पांडव दूतपणापासून मुक्त व्हावेत" धृतराष्ट्रानें 'तथास्तु' ह्मणून आणखी वर मागण्यास सांगितलें; यावर पांचालीनें 'वैश्यांनीं एक; स्त्रियांनीं दोन; क्षत्रियांनीं तीन आणि ब्राह्मणांनीं शत वर मागावे, अशी शास्त्राज्ञा आहे' असें सांगून धृतराष्ट्राच्या चरणांवर मस्तक ठेविलें. धृतराष्ट्रानें पांडवांची सर्व संपत्ति व राज्य परत देऊन त्यांस इंद्रप्रस्थीं जाऊन राहण्याची आज्ञा दिली.

पांडव केवळ आपल्या स्त्रीच्याच प्रयत्नांनीं कौरवांच्या ऋणांतून मुक्त झाले, हें पाहून कर्णानें त्यांचा पुष्कळ उपहास केला, त्यावरून अर्जुनास फार राग येऊन, त्यानें कर्णाला मारण्याची प्रतिज्ञा केली.

पांडव पितृआज्ञेप्रमाणें इंद्रप्रस्थीं जाण्यास निघाले; असें पाहून दुर्योधन, कर्ण, शकुनी आणि दुःशासन यांना मोठी धास्ती पडली; ते धृतराष्ट्राजवळ जाऊन ह्मणूं लागले-" हे लोकपाला, आमचे वैरी जे पांडव त्यांना आह्मीं महत्प्रयासांनीं आपल्या हस्तगत करून घेतलें असतां, त्यांस सोडून देऊन आपल्या पुत्रांचा घात केलात; महाराज, आतां हे पंडुपुत्र आमचा कुलक्षय केल्यावांचून स्वस्थ बसावयाचे नाहींत; यासाठीं हे तात, अपण अजूनही त्यांस द्यूत खेळण्यास बोलवावें. आह्मीं

असा पण केला आहे कीं, " द्यूतांत जो हरेल; त्यानें बारावर्षें वनवास भोगून, नंतर एक संवत्सर पूर्ण होईपर्यंत ' अज्ञात ' ( गुप्त ) असावें. अज्ञातवासांत असतां आढळल्यास पुनः एक तपपर्यंत वनवास भोगावा. " महाराज, युधिष्ठिर आपली अवज्ञा कधींही करणार नाहीं आणि आमचे शकुनीमामा तर पांडवांस पुनः खास जिंकितील " हें भाषण ऐकून धृतराष्ट्र ह्मणाला—' दुर्योधना, ज्याचा भीष्म, विदुरासारख्या नीतिमान् पुरुषांनीं निषेध केला; त्या कपटद्यूतमिषानें पांडवांची संपत्ति हरण करण्याची इच्छा तूं धरूं नको, त्यांत तुझें कधींही कल्याण होणार नाहीं; तुला पाहिजे तर तूंही पांडवांप्रमाणें पराक्रम करून संपत्ति मिळीव. भीष्म, विदुर, धृतराष्ट्र आणि गांधारी यांनीं दुर्योधनाला ही दुष्ट बुद्धि सोडून देण्याविषयीं परोपरीनें पुष्कळ उपदेश केला पण तो तेथें रुचला कोणाला ? मनुष्याचें दुर्दैव ओढवलें आणि त्याच्या देहांत एकदा अक्काबाईचा संचार झाला ह्मणजे दुसऱ्यांचीं हितवचनें व बुद्धिवाद त्याला विषाप्रमाणें वाटूं लागतात; तशांत धृतराष्ट्र हा हलक्या कानाचा व क्षणिक बुद्धीचा असल्यामुळें, आणि पांडव हे महान् पराक्रमी आहेत, तेव्हां आपल्या पुत्रांकडे राज्य कसें टिकेल ही रात्रंदिवस काळजी असल्यामुळें, त्याला आ-

पल्या पुत्रांविषयीं मोह उत्पन्न होऊन, दुर्योधनाचें सर्व बोलणें त्यास खरें वाटलें; त्यानें आपल्या पुत्रांचा पक्ष धरून पांडवांस परत आणण्यासाठीं प्रतिकामी–दूत पाठविला. मग तर दुर्योधनाच्या आनंदाला पारावारच नाहींसा झाला.

बिचारे पांडव परमेश्वरकृपेनें संकटांतून मुक्त झाल्याचा आनंद मानीत व आपल्या धर्मपत्नीची लज्जा रक्षण केल्याबद्दल, त्या भक्तवत्सलप्रभूचे गुणानुवाद वर्णन करीत चालले आहेत, तोंच त्यांस दूतानें येऊन धृतराष्ट्राचा संदेश कळविला. त्या कालरूपी दूतास पाहतांच पांडवांस भयानें धडकी भरली; त्यांनीं ' नशीब, नशीब, नशीब ' ह्मणून आपल्या कपाळाला हात लाविला; तथापि कांहीं झालें तरी पितृआज्ञा उल्लंघन करावयाची नाहीं, असा युधिष्ठिराच्या मनाचा निर्धार असल्यामुळें तो अर्ध्या मार्गांतूनच हस्तिनापुरास द्यूत खेळण्यास येण्यासाठीं मार्गे परतला.

हस्तिनापुरास येऊन युधिष्ठिरानें धृतराष्ट्रास वंदन केल्यावर, शकुनीनें केलेला ' पण ' त्यास कळविला. कौरवांनीं कपटपाश घालून आपली, आपल्या कनिष्ठ भ्रात्यांची आणि आपल्या धर्मचारिणीची भरसभेंत के-

लेली विटंबना व पांडवांच्या नाशाविषयीं केलेलीं भयंकर कृत्यें युधिष्ठिराच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभीं असतांही, कपटपटु शकुनीबरोबर पुनः द्यूत खेळण्यास तो तयार झाला. कारण आपल्या मुखांतून ‘ नाहीं ’ असें कधींच वदावयाचें नाहीं; असा युधिष्ठिराचा निश्चय होता.

पहा; प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णानें द्रौपदीला आपली बहीण ह्मणून ह्मटलें असतांही, तिजवर नानाप्रकारचीं संकटें यावींत; शत्रु ह्मणविणारांकडून भरसभेंत तिची विटंबना व्हावी; यापेक्षां दैवदुर्विलासाचा आणखी मासला तो कोणता पाहिजे? ह्यावेळीं पांडवांचें पुरें नष्टचर्य ओढवल्यामुळें ह्मणा अगर काळ अनुकूल नसल्यामुळें ह्मणा; पांडवांस याही प्रसंगीं यश न येतां ठरलेल्या नियमाप्रमाणें बारा संवत्सरपर्यंत वनवास भोगण्याचें त्यांच्या कपाळीं आलें. असो!!

पांडव वनवासास गेले; तरी कौरवांनीं त्यांचा छल करण्यास सोडिलें नाहीं. आपला पति केवढ्याही संकटांत असला व तत्संबंधानें आपल्याला कितीही दुःख होत असलें, तरी त्याच्याशीं प्रेमानें वागून, आपल्या सलज्ज, शांत व प्रसन्न वृत्तीनें, त्याचें दुःख कमी करून त्याला तोषविणाऱ्या स्त्रिया खरोखर पतीच्या अर्धांगी होत. द्रौपदीला स्वतःचें दुःख कांहीं कमी होतें अशांतली

गोष्ट नव्हे, पण आपले पती सुखी तरच आपण सुखी अशी द्रौपदीच्या मनाची समजूत असल्यामुळें व तदनुसार तिचें आचरण असल्यामुळेंच, तिच्या साहचर्यानें अत्यंत कष्टतम वनवासही पांडवांस सुखप्रद वाटला.

पांडव वनवासास गेल्यावर कौरवांनीं त्यांचा पुष्कळ छळ केला ह्मणून वरतीं लिहीलेंच आहे; त्याचा प्रकार असा. दुर्वास नांवाचा एक महान तपस्वी व परम कोपिष्ट ब्राह्मण होता. ह्याच्या तब्येतींत किंचित अंतर पडलें कीं, हा क्रोधाधीन होऊन शाप देत असे. त्याची दुर्योधनानें उत्तम प्रकारें सेवा करून त्यास प्रसन्न केलें आणि वर मागितला कीं, 'तुह्मीं मध्यरात्रीनंतर आपल्या शिष्यांसह पांडवांकडे अतिथी जाऊन अन्नाची याचना करावी' दुर्योधनास पक्कें माहीत होतें कीं, रात्रीं द्रौपदीचें भोजन झाल्यावर सूर्यदत्तस्थालींतून अन्न उत्पन्न होत नाहीं तेव्हां अशावेळीं दुर्वासानें अन्नाची याचना केली आणि तें मिळालें नाहीं ह्मणजे अर्थातच तो पांडवांना शाप देईल. दुर्योधनाचें हें सांगणें दुर्वासास मुळींच रुचलें नाहीं; परंतु 'वरमाग' असें ह्मटल्यामुळें त्याचा निरुपाय होऊन, त्यानें दुर्योधनाच्या इच्छेप्रमाणें एके दिवशीं मध्यरात्री 'अलख' ह्मणून दहा हजार

शिष्यांचा तांडा काम्यकवनांत पांडवांच्या दाराशीं आणून उभा केला.

युधिष्ठिरानें त्या सर्व अतिथींचा सत्कार करून, कुशल विचारल्यावर त्यांना 'स्नान करून येणें असेल तर यावें' अशी विनंति केली, त्यावरून ते सर्व स्नानाकरितां निघून गेले.

इकडे युधिष्ठिरानें आश्रमांत येऊन द्रौपदीस व आपल्या कनिष्ठ भ्रात्यांस जागें करून ऋषि आल्याचें वर्तमान कळविलें. आतां रात्रीच्यावेळीं इतक्यांना अन्न कोठून पुरवावें ह्मणून पांचही भ्राते मोठ्या विवंचनेंत पडले. कारण, एक तर आपलें सत्व नष्ट होऊन दुर्वासासारख्या तपोनिधीचा कोप होतो. सारांश मनुष्यप्राण्यांवर येऊं शकणाऱ्या संकटांपैकीं एका अत्यंत दुर्धर संकटांत पांडव पडले असतांही द्रौपदीनें आपल्या मनाचा शांत व गंभीरपणा यत्किंचितही ढळूं न देतां, आपल्या प्रियपतींस धीर देऊन भक्तकामकल्पद्रुम भगवान् श्रीकृष्णाचें स्मरण केलें; तों तात्काळ तेथें श्रीकृष्ण प्रगट होऊन, त्यानें आपण 'विश्वात्मा' आहों असें दाखविण्यासाठीं सूर्यदत्त स्थालींत शाकपत्र निर्माण करून, तें भक्षण करितांच तिकडे संपूर्ण ऋषींसह दुर्वास तृप्त होऊन, द्रौपदीसमीप नानाप्रकारच्या पक्वान्नांचे ढीग

उत्पन्न झाले. आज आपल्या पतींच्या सत्वाचें रक्षण झालें; हें पाहून द्रौपदीस मोठा आनंद झाला; तिनें ऋषींस पाचारण करण्याविषयीं युधिष्ठिरास विनंति केली ; त्यावरून त्यानें सहदेवास ऋषींकडे पाठविलें; पण ते कोठेंही आढळले नाहींत कारण, ते गंगेवर स्नानाकरितां ह्मणून जे गेले ते श्रीकृष्णानें सूर्यदत्त स्थालींतून उत्पन्न झालेलें शाकपत्र भक्षण करून ढेंकर देतांच तिकडल्या तिकडेच तृप्त होऊन युधिष्ठिराचें कल्याण असो; असा आशीर्वाद देऊन चालते झाले.

एकदां पांडव मृगयेस गेले असून धौम्य व द्रौपदी मात्र आश्रमीं आहेत अशी संधी साधून जयद्रथ तेथें आला. द्रौपदीनें त्याचा सत्कार करून ‘ पांडव मृगयेस गेले आहेत;इतक्यांतच येऊन तुह्मांस भेटतील’इत्यादि सरळ भाषण केलें. पण हा कुटिल असल्यामुळें यानें द्रौपदीशीं अत्यंत निर्लज्जपणाचें भाषण आरंभिलें, त्यावरून द्रौपदीला पराकाष्ठेचा राग येऊन तिनें त्याचा धिक्कार केला. पण हा जसा कुटिल होता, तसाच उन्मत्तही असल्यामुळें याला द्रौपदीचें भाषण न रुचून यानें तिला आपल्या रथांत घालून पळविलें; तें पाहून धौम्यही त्याचा निषेध करीत त्याच्यामागें लागला. हें वर्तमान पांडवांस समजतांच त्यांनीं जयद्रथाचा पाठलाग करून द्रौपदीस सोड-

विलें. भीमसेनानें जयद्रथाच्या कोटिक नामक एका कु-टील सारथ्यास तर ठारच मारिलें व यास मारणार, तोंच युधिष्ठिरानें 'याच्या मरणानें दुःशिलेस वैधव्य येऊन धृतराष्ट्र व गांधारी यांस वृद्धापकाळीं मोठें दुःख होईल; यासाठीं याला मारूं नको;' असें सांगितल्यावरून 'मी पांडवांचा दास आहें,' असे त्याच्याकडून कबूल करवून त्याला सोडून दिलें व द्रौपदीस घेऊन धौम्यासह पांडव आपल्या आश्रमीं आले.

याप्रमाणें नानाप्रकारचीं संकटें भोगून बारा संवत्सर-पर्यंत वनवास कंठल्यावर पांडवांनीं एक वर्ष अज्ञातवास केला; त्यांत ते आपापलीं रूपें पालटून विराटगृहीं येऊन राहिले. द्रौपदीनेंही आपल्याला सैरंध्रि हें नाव धारण करून विराटाच्या पट्टराणीचें–सुदेष्णेचें दास्यत्व पतक-रिलें व तत्पूर्वीं तिजपासून हें मागून घेतलें होतें कीं 'मी कोणाचें उच्छिष्ट भक्षण, पादसेवन व अनुचित अन्य कार्य कधींही करणार नाहीं, मजविषयीं अभिलाषबुद्धि जो धरील त्याला तुह्मीं शासन केलें पाहिजे; तसें न कराल तर माझे पति पांच गंधर्व महासमर्थ असून ते त्यास शासन करितील, मग तुह्मांस वाईट वाटेल तर असें होऊं नये.' हें सर्व सुदेष्णेनें मान्य करून तिला आपणाजवळ

ठेविलें. कारण, ती मोठी पवित्र बायको असावी असा तिच्या मनाचा ग्रह झाला होता.

याप्रमाणें सैरंध्रि–द्रौपदी, सुदेष्णेसमीप सुखांत असतां तिचें अत्युत्कृष्ट सौंदर्य पाहून, सुदेष्णेच्या भ्रात्याचें–कीचकाचें मन विकारवश झालें. सैरंध्रीची जेणेंकरून प्राप्ति होईल असे प्रयत्न तो करूं लागला. पण त्या पतिव्रतेनें त्याला एकच सांगितलें कीं, 'कीचका, परस्त्रीचा अभिलाष धरून आजपर्यंत कोणाचेंही कल्याण झालें नाहीं; यासाठीं, तूं आपल्याला नसत्या अनर्थांत पाडून घेऊं नकोस; कारण, माझें संरक्षण करणारे पांच गंधर्व महा समर्थ असून ते गुप्तरूपानें सर्वकाळ माझें रक्षण करीत आहेत, त्यांस जर का तुझा हा अन्याय कळला तर मात्र बरी गत नाहीं.' असो; कीचक यावेळीं विशेष कांहीं न बोलतां स्वगृहीं गेला.

सुदेष्णेनें सैरंध्रीच्या वाटेस न जाण्याविषयीं कीचकाला पुष्कळ उपदेश केला; तरी पण तो तिचा भ्राता असल्यामुळें, तिला कीचकाचें इष्ट करणें आवश्यक होतें; ह्मणून या गोष्टीस मध्यें पुष्कळ दिवस जाऊं देऊन सैरंध्रीस त्याचा अगदीं विसर पाडिला; नंतर एके दिवशीं सुदेष्णेनें आपल्या इतर परिचारिका अन्य कार्यांकडे गुंतवून, सैरंध्रीस कीचकाच्या घरीं जाऊन मद्य आणण्या-

स सांगितलें; त्यावर सैरंध्रीनें 'हें माझें काम नव्हे' असें सांगून पुष्कळ आढेवेढे घेतले, पण उपाय नसल्यामुळें तिला कीचकाकडे जाणें भाग पडलें.

सैरंध्रीनें कीचकगृहाकडे जातांना मार्गांत सूर्याचें स्तवन केलें; त्यावरून एक दूत तिला मात्र दिसावा अशा रूपानें तेथें अकस्मात प्राप्त झाला, तेणेंकरून ती निर्भय होत्साती कीचकाकडे जाण्यास निघाली.

सैरंध्री कीचकाकडे गेल्यावर त्याच्या दाराच्या बाहेर उभी राहिली व तिनें आणिलेलें पात्र उंबऱ्याच्या आंत ठेवून सांगितलें कीं, तुमच्या भगिनीनें यांत मद्य मागितलें आहे.' सैरंध्रीस पहातांच कीचकाला मोठा आनंद होऊन, तिनें आपणाला वश व्हावें ह्मणून, त्यानें आपल्या ऐश्वर्याचें पुष्कळ वर्णन केलें. पण द्रौपदीनें त्याच्या बोलण्याकडे लक्ष्य न देतां, त्याला निक्षून सांगितलें कीं, 'कीचका, माझें सर्व वर्तमान तुला सांगितलेंच आहे. आतां पुनः सांगतें, जर मजविषयीं तूं पापबुद्धि धरशील तर मरणास पात्र होशील.' सैरंध्रीचें हें उद्धटपणाचें भाषण ऐकून, तो मोठ्या आवेशानें तिजसमीप येउन, तिला बलात्कारानें आंत नेण्याचा प्रयत्न करूं लागला. त्यावेळीं सैरंध्री क्रोधानें नागिणीसारखी फणाणून जा-

ऊन ह्मणाली–' मूर्खा ' इतका मदांध कशानें झालास ? कोण स्त्री कशी आहे याचा विचार कर; कामाधीन होऊन भलत्याच कामास प्रवृत्त होऊं नकोस !! मग तर कीचकास इतका अनिवार कोप आला कीं, त्याच्या तळव्याची आग मस्तकापर्यंत भडकून नेत्र आरक्त झाले. कीचकाचें तें भयंकर रूप पाहून, सैरंध्री तेथून जी पळाली ती राजसभेंत आली. कीचकही तिच्या मागोमाग तेथें आला व त्यानें तिची वेणी धरून तिला जोरानें लाथ [illegible]रिली; हें पाहून सैरंध्रीला दृश्यमान होणाऱ्या सूर्य[illegible]नें कीचकाला असा प्रबल आघात केला कीं, त्या[illegible] व्याकूळ होऊन धाडकन जमिनीवर पडला.

[illegible]स कीचकानें केलेला लत्ताप्रहार सर्वांनीं पाहिलाच [illegible]ावरून तिनें राजास–विराटास हात जो[illegible]ाजाधिराज, आपणासमक्ष भरसभेंत असा [illegible]ोग्य नाहीं; राजानें जर गरीब दुबळ्या [illegible]द घतली नाहीं तर तिनें कोणीकडे जावें ?' कीचक हा विराटाचा शालक व सेनाध्यक्ष असून महा बलाढ्य असल्यामुळें सर्वांस त्याचा मोठा धाक वाटे; यामुळेंच राजानें सैरंध्रीच्या प्रश्नास उडवाउडवीचें उत्तर दिलें; तो ह्मणाला–' स्त्रियांचीं कृत्यें कशीं असतात तीं

कोणीं जाणावीं ? ' राजाच्या या भाषणावर तेथें कंक-युधिष्ठिर होता, तो कोणीही बोलत नाहीं असें पाहून ह्मणाला–' सैरंध्रि, राजसभेंत येऊन तुला इतकें अमर्याद भाषण करणें योग्य नाहीं. त्वां येथून सत्वर निघून जावें.' हें ऐकून सैरंध्रि तेथून निघून सुदेष्णेकडे आली व झालेलें वर्तमान तिला कळविलें तेव्हां तिनें पुष्कळ प्रकारें समजूत करून तिचें शांतवन केलें.

सुदेष्णेनें सैरंध्रीच्या मनाचें आपल्याकडून पुष्कळ समाधान केलें खरें पण त्याविषयीं तिला अगदींच नैर्त पडलें नाहीं; ' आतां याला उपाय तरी काय करावागि-हेंच वारंवार तिच्या मनांत येऊं लागलें. शेवटीं आनंद मनांत आलें कीं, या संकटांतून मला एक बल्लव आपल्या नच सोडवील; इतरांच्या हातून हें होणें न त्याच्या विचार करून रात्रीं सर्वत्र सामसुम झाल्यागितलें कीं, ष्णेच्या मंदिरांतून निघून भीमसेन ज्ञातलेंच आहे. निजला होता तेथें आली व त्यास जागें करून पटलेल

१ पांडवांनीं अज्ञातवासांत रूपें पालटून जीं नांवें धारण केलीं होतीं तीं. कंक–युधिष्ठिर; बल्लव–भीमसेन; बृहन्नट–अर्जुन; ग्रंथिक–नकुल; तंतिपाल–सहदेव.

यच्चयावत् वर्तमान सांगितलें व रडूं लागली; भीमसेनानें तिचें सांत्वन करून सांगितलें—प्रिये, उद्ईक कीचक तुला भेटेलच; तो भेटला ह्मणजे त्यावेळीं त्याला क्रोधयुक्त मुद्रा न दाखवितां सांग कीं, तूं आज नृत्यागारांत ये ह्मणजे तुझी मनकामना पूर्ण होईल. इकडे कीचक येण्यापूर्वीच मी तेथें जाऊन बसतों; मग मी आहें आणि कीचकही आहे; उभयतांचें इतकें बोलणें झाल्यावर बल्लवानें सैरंध्रीला अंतःपुराकडे मार्गस्थ केलें.

कडे राजसभेंत सूर्यदूताच्या प्रबल आघातानें की-
दूता र्छित पडल्याचें वरती सांगितलेंच आहे. कांहीं
मुळें ता तो सावध झाल्यावर तेथून उठून मुकाट्यानें घरीं
सैरंध्री साध्वीचा विनाकारण छल केल्याबद्दल कीच-
होता; त्य व होऊन पश्चात्तापही झाला; त्यानें तो
डून ह्मटलें—'र रात्र कशी तरी ढकलली व प्रातःकाल
अन्याय होणें कडे गेला, तों ती बल्लवाच्या आश्वा-
भजेची
सनानें प्रसन्नवदन दिसली; यावरून तो मोठ्या लगबगीनें तिच्याजवळ जाऊन ह्मणाला—' सैरंध्रि, काल मजकडून जो तुझा अन्याय झाला तो तूं क्षमा करावास ह्मणून मी तुजकडे आलों आहें; तर सैरंध्रि, झाल्या गोष्टी चा मनांत रोष न धरितां मला क्षमा कर. ' कीचकाचें

कोणीं जाणावीं ? ' राजाच्या या भाषणावर तेथें कंक-युधिष्ठिर[1] होता, तो कोणीही बोलत नाहीं असें पाहून ह्मणाला—' सैरंध्रि, राजसभेंत येऊन तुला इतकें अमर्याद भाषण करणें योग्य नाहीं. त्वां येथून सत्वर निघून जावें.' हें ऐकून सैरंध्रि तेथून निघून सुदेष्णेकडे आली व झालेलें वर्तमान तिला कळविलें तेव्हां तिनें पुष्कळ प्रकारें समजूत करून तिचें शांतवन केलें.

सुदेष्णेनें सैरंध्रीच्या मनाचें आपल्याकडून पुष्कळ समाधान केलें खरें पण त्याविषयीं तिला अगदींच चैन पडलें नाहीं; ' आतां याला उपाय तरी काय करावा ? ' हेंच वारंवार तिच्या मनांत येऊं लागलें. शेवटीं तिच्या मनांत आलें कीं, या संकटांतून मला एक बल्लव—भीमसेनच सोडवील; इतरांच्या हातून हें होणें नाहीं. असा विचार करून रात्रीं सर्वत्र सामसुम झाल्यावर ती सुदेष्णेच्या मंदिरांतून निघून भीमसेन ज्या पाकशाळेंत निजला होता तेथें आली व त्यास जागें केलें.

---

१ पांडवांनीं अज्ञातवासांत रूपें पालटून जीं नांवें धारण केलीं होतीं तीं. कंक—युधिष्ठिर; बल्लव—भीमसेन; बृहन्नट—अर्जुन; ग्रंथिक—नकुल; तंतिपाल—सहदेव.

यच्चयावत् वर्तमान सांगितलें व रडूं लागली; भीमसेनानें तिचें सांत्वन करून सांगितलें—प्रिये, उदईक कीचक तुला भेटेलच; तो भेटला ह्मणजे त्यावेळीं त्याला क्रोधयुक्त मुद्रा न दाखवितां सांग कीं, तूं आज नृत्यागारांत ये ह्मणजे तुझी मनकामना पूर्ण होईल. इकडे कीचक येण्यापूर्वींच मी तेथें जाऊन बसतों; मग मी आहें आणि कीचकही आहे; उभयतांचें इतकें बोलणें झाल्यावर बल्लवानें सैरंध्रीला अंतःपुराकडे मार्गस्थ केलें.

इकडे राजसभेंत सूर्यदूताच्या प्रबल आघातानें कीचक मूर्च्छित पडल्याचें वरती सांगितलेंच आहे. कांहीं वेळानें तो सावध झाल्यावर तेथून उठून मुकाट्यानें घरीं गेला. त्या साध्वीचा विनाकारण छल केल्याबद्दल कीचकाला मोठें दुःख होऊन पश्चात्तापही झाला; त्यानें तो दिवस व ती रात्र कशी तरी ढकलली व प्रातःकाल होतांच तो सैरंध्रीकडे गेला, तों ती बल्लवाच्या आश्वासनामुळें प्रसन्नवदन दिसली; यावरून तो मोठ्या लगबगीनें तिच्याजवळ जाऊन ह्मणाला—' सैरंध्रि, काल मजकडून जो तुझा अन्याय झाला तो तूं क्षमा करावास ह्मणून मी तुजकडे आलों आहें; तर सैरंध्रि, झाल्या गोष्टी चा मनांत रोष न धरितां मला क्षमा कर. ' कीचकाचें

हें नम्र भाषण ऐकून सैरंध्रीला मोठें आश्चर्य वाटलें; ती किंचित् हंसून ह्मणाली–'कीचका, मला तुझा राग मुळीं-च आला नाहीं; मी तर तुझ्या मनाप्रमाणें वागण्यास तयार आहें. पण मी सांगतें असें मात्र कर. मी आज रात्रीं नृत्यशाळेंत जाऊन बसेन व तूही तेथें काळोखां-तूनच यावेंस; कारण, तुझा जो मनोदय पूर्ण व्हावयाचा तो माझ्या गंधर्वांस न कळावा. सैरंध्रीच्या तोंडचे हे शब्द त्यास इतके अमृततुल्य वाटले कीं, तो आपणास कृतार्थ मानून आपल्या घरीं गेला.

त्या दिवशीं कीचकास सूर्यास्त केव्हां होईल असें झालें होतें; फार काय पण त्यादिवशीं त्याला इतकें कांहिं वेड लागून गेलें होतें कीं, त्यानें वारंवार बाहेर येऊन सूर्याकडे पहात रहावें; असें होतां होतां रात्र होऊन का-ळोख पडला, तेव्हां तो मोठ्या आनंदानें उत्तम शृंगार करून नृत्यागारांत गेला. तो जाण्यापूर्वीच बल्लव–भीम-सेन तेथें जाऊन अंधारांत बसला होता, त्याशीं कीच-काचें मल्लयुद्ध होऊन तो भीमाच्या हस्तें मृत्युमुखीं पडला.

पुढें पांडवांचा अज्ञातवास संपल्यावर ते प्रगट होऊन उपप्लव्य नामक नगरांत जाऊन राहिले व कौरवांनीं आ-पला राज्यभाग द्यावा ह्मणून साम करण्यासाठीं श्रीकृ-

ष्ण कौरवांकडे जावयास निघाला असतां युधिष्ठिरानें 'होतां होईल तितकें करून युद्धाचा प्रसंग टाळावा अशी विनंति केली.' युधिष्ठिराचें हें भाषण ऐकून द्रौपदी जरी क्षमाशील बायको होती, तरी तिला अतिशय कोप आला; ती आपला केशपाश धरून कृष्णाकडे आली आणि डोळ्यांत आंसवें आणून ह्मणाली— 'भाऊराया, दुःशासनानें हे केश धरून मला अंतर्गृहांतून सभेंत ओ-ढीत नेलें, त्याचें स्मरण मात्र असूंदे. पांडव जर कौरवांशीं साम करूं इच्छितील तर माझे पांच पुत्र अभिमन्यूच्या सहाय्यानें कौरवांनीं केलेल्या छलाचें उसनें फेडतील. कृष्णा, मी थोराची कन्या व थोरांची स्त्री असून मज-सारखी हतभाग्य कोणीही नसेल!!' हें बोलतांना द्रौप-दीच्या नेत्रांतून खळ खळ अश्रुधारा चालल्या होत्या; तें पाहून कृष्णालाही मोठा गहिंवर आला. त्यानें तिच्या मनाचें पुष्कळ प्रकारें समाधान केलें. आणि 'भगिनी, शोक करूं नको, कौरव निश्चयेंकरून नाश पावतील असेंच मी करीन. असें आश्वासन देऊन तो हस्तिना-पुरास गेला.

पुढें भारतीयुद्ध सुरू होऊन, युद्धाच्या नवव्या दि-वशीं भीष्मानें 'मी उद्यां निष्पांडवी पृथ्वी करीन' अशी

दुर्योधनाजवळ प्रतिज्ञा केली. भीष्माची प्रतिज्ञा कधीं-ही असत्य होत नसते; हें सर्वांस माहीत असल्यामुळें, युधिष्ठिरासहित सर्वांचीं तोंडें अगदींच उतरून गेलीं. द्रौपदीला तर असें वाटलें कीं, माझ्या सौभाग्य भांडा-रावर दरोडा घालण्या साठीं, हा मूर्तिमंत काळच माझ्या पुढें येऊन उभा राहिला आहे !! सारांश सर्वांचें धाबें अगदीं दणाणून गेलें. आतां या प्रसंगीं श्रीकृष्णाशिवाय दुसरा कोणीही आपलें रक्षण करण्यास समर्थ नाहीं. यासाठीं, सर्वांनीं त्याला शरण जावें हेंच उत्तम असें ठ-रून द्रौपदी सह सर्व पांडव कृष्णास शरण गेले.

भक्तवत्सल श्रीकृष्णानें पांडवांस आश्वासन देऊन, आपण स्वतः सेवकाचा वेष घेतला व द्रौपदीस घेऊन तो तितक्या रात्री तसाच भीष्माच्या शिबिरांत गेला. तेथें गेल्यावर आपण बाहेर उभा राहून, त्यानें द्रौपदीस आंत भीष्माकडे पाठविलें. श्रीकृष्णानें शिकविल्या प्रमाणें पां-चालीनें आपल्या तोंडावरून वस्त्राचा बुरखा घेतला हो-ता, तो भीष्माकडून आशीर्वाद मिळपर्यंत दूर केला नाहीं; अर्थात् ही द्रौपदीच आहे असें भीष्मास प्रथम स-मजलें नाहीं. कोणी तरी सौभाग्यवती स्त्री आहे असें स-मजून ' अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ' असा त्यांनीं तिला,

तिनें नमस्कार केल्याबरोबर आशीर्वाद दिला; तेव्हां द्रौपदीनें निर्भय होऊन आपल्या तोंडावरील बुरखा मागें सारून आणखीं एकवेळ उघडपणें भीष्मास नमस्कार केला आणि किंचित् हंसून ह्मटलें–' मामंजी, आपण दिलेला हा आशीर्वाद याजन्मीं सफल होणार कीं अन्य जन्मीं ? कारण याजन्मीं ह्मणावें तर उद्ईक आपण पांडवांस मारण्याची प्रतिज्ञा केलेली आहे ! ! तेव्हां, ती प्रतिज्ञा खरी कीं आतां दिलेला हा आशीर्वाद खरा ? एव्हढें कृपा करून सांगावें.

द्रौपदीस ओळखून व तिचें हें भाषण ऐकून भीष्म अगदीं चकित होऊन गेले; त्यांना खचित वाटलें कीं, द्रौपदीस येथें आणून मला फसविण्याचें काम त्या श्रीकृष्णाशिवाय दुसऱ्या कोणाचेंही नव्हे. असो; ते ह्मणाले– द्रौपदी, भगवंताच्याच मनांतून जर पांडवांचें रक्षण करावयाचें आहे तर त्यांच्याकडे वांकड्या नजरेनें कोण पहाणार आहे ? जेथें प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण अनेक युक्ति लढवून त्यांच्या संरक्षणार्थ उभा आहे, तेथें मज पामराची कथा काय ? असें बोलत असतां भीष्माच्या नेत्रांवाटे प्रेमाश्रु वाहूं लागले.

नंतर भीष्मानें शिबिराबाहेर येऊन जेथें भगवान

श्रीकृष्ण सेवकाचें रूप घेऊन उभा होता, तेथें जाऊन त्यास प्रेमालिंगन दिलें, आणि प्रभूच्या भक्तवात्सल्याविषयीं पुष्कळ वर्णन करून द्रौपदीचें आणि पांडवांना बोलावून त्यांचें समाधान केलें कीं, ' उद्यां तुमच्या बद्दल आह्मी स्वतःच आपला देह ठेवितों ' असें ह्मणून त्यांनीं पांडवांस शिखंडीची कथा सांगितली. पण प्रस्तुत चरित्राशीं तिचा संबंध नसल्यामुळें तो येथें लिहिलो नाहीं. असोः—

द्रौपदीला युधिष्ठिर, भीमसेन, अर्जुन, नकुल आणि सहदेव या पांचांपासून अनुक्रमें प्रतिविंध्य, श्रुतसेन, श्रुतकीर्ति, शतानीक आणि श्रुतकर्मा असें पांच पुत्र झाले होते; हे पांचही महारथी असून द्रौपदेय या नांवानें प्रख्यात असत.

द्रौपदी ही परम पतिव्रता, सद्गुणी व क्षमाशील बायको होती. भारतीयुद्धाच्या शेवटल्या दिवशीं दुर्योधन विकल होऊन रणांत पडला असतां अश्वत्थाम्यानें त्याजपासून सेनाधिपत्य स्वीकारून पांडवशिबिरावर छापा घातला आणि द्रौपदीच्या पांचही पुत्रांस ते निद्रिस्थ असतां मारिलें; त्यावरून भीमार्जुनानीं त्यास धरून द्रौपदीपुढें आणून उभें केलें; व आतां त्यास मारणार तों द्रौपदीला त्याची दया येऊन ती ह्मणाली—' मी जशी

माझ्या पुत्राच्या मरणानें दुःखी झाल्यें आहें, तशीच त्याची माताही होईल; यास्तव याचा वध करूं नका. शाबास!! होच खरी भूतदया आणि यालाच ह्मणावें क्षमाशीलवृत्ति!! द्रौपदीसारखीं कन्यारत्नें ज्यांच्या उदरीं निर्माण झालीं, तीं मातापितरें व विधात्यानें ज्याच्यांशीं तिची जन्माची सांगड घालून दिली ते पंडुपुत्र व तीं उभयकुळें या जगतीतलावर धन्य होत.

भारतीयुद्धाची समाप्ति झाल्यावर पांडवांनीं छत्तीस वर्षं राज्य केलें व निजधामास जाऊं लागले; तेव्हां द्रौपदीही त्यांजसमागमें गेली व अंतीं सायुज्यपदाप्रत पावली.

# सीता.



# सीता.

ही विदेहवंशीय सीरध्वजजनकाची पालित कन्या व पुराणप्रसिद्ध पंचकन्यांतील एक. ही दाशरथिरामाची पट्टराणी असून महापतिव्रता होती.

एकदां एका शेतकऱ्यास तो शेत नांगरीत असतां, त्यांत त्याला एक पेटी सांपडली; ती त्यानें सीरध्वजास आणून दिल्यावर उघडून पहातां तींतून अत्यंत सुंदर असें एक कन्यारत्न निघालें; त्या कन्येस पहातांच राजाला अद्भुत आश्चर्य वाटून मोठा आनंद झाला. त्यानें तिचें 'सीता' हें नांव ठेवून, तिला आपली पट्टराणी सुमेधा इच्या स्वाधीन केलें.

---

१ संस्कृत भाषेंत नांगराच्या फाळाला 'सीत' व त्यापासून भूमीस पडलेल्या रेषेला 'सीता' असें नांव आहे व त्यांत ती कन्या सांपडली अशा हेतूस्तव जनकानें तिचें 'सीता' हें नांव ठेविलें.

पुढें सीता उपवर झाल्यावर जनकराजानें तिचें स्वयंवर आरंभिलें; त्यांत शिवचापभंगाचा पण केला होता. कारण, सीता आपल्या बाळपणांत त्या धनुष्याचा घोडा करून खेळत असे. विश्वामित्राच्या आज्ञेवरून श्रीरामचंद्रानें मिथिलानगरीस जमलेले सर्वराजे, राजर्षि व ब्रह्मर्षि यांसमक्ष ज्या धनुष्यास पहातांच सर्व राजे भिऊन स्तब्ध बसले, ज्यानें महान् पराक्रमी लंकाधीशाची फटफजिती उडविली, त्या प्रचंड माहेशचापाला सहज लीलेनें गुण लावून त्याचा भंग केला; हें पाहून सीतेनें श्रीरामचंद्रास मोठ्या आनंदानें माळ घातली. नंतर कित्येक दिवस विवाहसंबंधीं सोहाळा होऊन जामातास असंख्य गज, अश्व, रथ, दास, दासी, रत्नें, भूषणें, वस्त्रें शिवाय द्रव्य व वरदक्षणा अर्पण केल्यावर जनकानें वसिष्ठ व विश्वामित्रादिकांचा, तसाच कौसल्या, सुमित्रा व कैकयी यांसह दशरथाचा वस्त्रादिकांनीं मोठा गौरव करून व मिष्टान्न भोजनें देऊन, त्यांना अयोध्येकडे मार्गस्थ केलें.

सीतेचा श्रीरामचंद्राशीं विवाह होऊन ती सासरीं आ-

ल्यावर लवकरच रामास पितृआज्ञा पालण्यासाठीं [१]वन-वासास जाणें प्राप्त झालें; त्यावेळीं सीता वयानें लहान ह्मणून, राम आपणासमागमें तिला अरण्यांत नेईनांत. पण शेवटीं सीतेनें 'जिकडे आपण तिकडे मी', असा आग्रह धरल्यावरून रामानें तिला आपल्या बरोबर अरण्यांत नेलें.

सीता ही रामासमागमें अरण्यांत गेली असतां, तो

---

१ श्रीरामचंद्रास वनवासास जाण्याचें कारण असें झालें कीं, 'दंडकारण्यानजीकच्या वैजयंतनगरीचा राजा तिमिरध्वज हा असुरांच्या साह्यानें प्रबल होऊन, त्यानें इंद्रास जर्जर केलें; तेव्हां इंद्रानें दशरथास आपल्या मदतीस बोलाविलें, त्यावरून दशरथानें तिमिरध्वजाशीं घोर युद्ध करून त्याचा पराभव केला. पण इकडे दशरथाला दुर्धर बाण लागून तो अगदीं मरणोन्मुख झाला; हें पाहून त्याची स्त्री कैकयी हिनें राजाचा रथ एकीकडे नेऊन, त्यास सावध केलें. दशरथानें सावध होऊन पाहिलें तों तिमिरध्वजासह सर्व दैत्य पळून गेले व आपण भयंकर मूर्च्छा येऊन पडलों असतां कैकयीनें आपलें संरक्षण केलें, असें त्यास आढळलें; त्यावरून दशरथानें प्रसन्न होऊन कैकयीस दोन वर मागण्यास सांगितले;ते तिनें त्यावेळीं न मागतां मला गरज लागेल तेव्हां मी मागेन असें सांगून ते तसेच राजाजवळ ठेविले.

जो जो आश्रम पाहून व जेथें जेथें वंदन करून सन्मान पावे, तेथें तेथें हीहि वंदन करून सन्मान पावे; तसेंच, राम जीं जीं फलें, कंदमुलें वगैरे भक्षण करी, त्यांतून जें अवशेष राही तें ही अमृततुल्य मानून भक्षण करी. हिनें अरण्यांत असतां रामास कठोरशब्दांनीं कधींही दुखविलें नाहीं; उलट रामाचें पादसंवाहन करणें आणि आपल्या मृदुवचनांनीं त्याच्या अंतःकरणास संतोषविणें अशीच वागे. याप्रमाणें, बराच काळ आपल्या पती-बरोबर व शेवटचे सहा महिने लंकेंत, मिळून चवदावर्षें अरण्यवास कंठला; तो असा.

राम, लक्ष्मण व सीता यांसह सर्वांचा निरोप घेऊन निघाला असतां, त्या समागमें नागरिकलोकांचा मोठा जमाव निघाल्यामुळें, तो रथांत न बसतां पायांनींच

---

( मागील टीप पुढें चालू. )

पुढें दशरथ राजा आपल्या वृद्धापकाळीं जेव्हां रामास राज्यावर बसवूं लागला, तेव्हां कैकयीनें आपल्या मंथरा नामक दासीच्या बुद्धीस लागून दशरथानें आपल्यास पूर्वीं दिलेले वर मागितले, ते असे–‘ एका वरानें भरतास राज्य द्यावें व दुसऱ्या वरानें रामास चवदावर्षें अरण्यांत पाठवावें. ’ तेव्हां कैकयीस दिलेलें वचन पूर्ण करण्यासाठीं दशरथला रामास अरण्यांत पाठविणें भाग पडलें.

चालूं लागला; नंतर अस्तमानीं तमसा नदीच्या तीरीं जाऊन तेथें संध्योपासनादि झाल्यावर, जलपान करून निद्रिस्थ झाला व मठ्या पहांटेस उठून, बरोबर आलेल्या नागरिक जनांस चुकविण्याच्या हेतूनें सीता व लक्ष्मण यांसह रथांत बसून तो दक्षिणदिशेकडे निघला. कोसलदेशाच्या सीमेवर रथ जातांच त्या त्रिवर्गांनीं अयोध्यानगरीस व तींतील देवतांस मोठ्या प्रेमानें नमस्कार करून. शृंगपुरीकडे गमन केलें. तेथें गेल्यावर तेथील राजा गुह ह्यानें त्यांचें उत्तम प्रकारें आदरातिथ्य करून, त्यांना भागीरथीच्या दक्षिणतीरास पोंहोंचविलें.

नंतर राम, लक्ष्मण व सीता यांसहित निघाला; त्यानें गंगा व यमुना यांच्या संगमाजवळ प्रयागास येऊन, तेथें राहणाऱ्या भारद्वाज ऋषीचें दर्शन घेतलें व त्यांची आज्ञा घेऊन तो तेथें जवळच असलेल्या चित्रकूटपर्वतावर येऊन तेथें पर्णकुटिका बांधून राहिला; तेथें असतां त्यांस दशरथाची खेदजनक मृत्युवार्ता कळली व त्याला अयोध्येस परत नेण्यासाठीं आलेला भरत भेटला. भरत व वसिष्ठ यांणीं प्रथम दशरथाचें मरणवृत्त निवेदन केलें, तें ऐकून राम, लक्ष्मण व सीता यांस अनिवार दुःख झालें. रामानें आपला शोक आंवरून पित्याचें और्ध्वदेहिक केलें. नंतर राम स्वस्थ झाला असें पाहून भरतानें अयो-

ध्येस परत येऊन राज्य स्वीकारण्याविषयीं त्याची प्रार्थना केली; पण रामानें मी पितृआज्ञेस कधींच व्यत्यय आणणार नाहीं असें स्पष्ट सांगितलें. वसिष्ठांनींही रामास पुष्कळ उपदेश केला तथापि त्याचा अरण्यवासाचा निश्चय पालटेना. शेवटीं नाइलाज झाल्यामुळें भरत श्रीरामचंद्राच्या पादुका घेऊन मागें परतला, तो अयोध्येस न जातां सर्व राज्य त्या पादुकांस अर्पण करून व आपण वल्कलें परिधान करून अयोध्येबाहेर नंदिग्रामीं जाऊन व्रतस्थ राहिला.

श्रीरामचंद्र चित्रकूटास चातुर्मासपर्यंत राहिल्यामुळें, तेथें शत्रुघ्न व अयोध्यावासी अपार जन वारंवार येऊं लागले, त्यामुळें तेथील ऋषिजनांस उपद्रव होऊं लागला; त्यावरून राम, लक्ष्मण व सीता यांसह चित्रकूट सोडून तेथून पुढें दक्षिणेकडे निघाला व जातांना वाटेंत त्यानें अत्रि व त्याची स्त्री अनुसूया यांची भेट घेतली.

अत्रीनें राम–लक्ष्मणाचें उत्तमप्रकारचें आदरातिथ्य केलें, तसेंच अनुसूयेनेंही सीतेचें आतिथ्य करून; तिला पातिव्रत्यसंबंधीं पुष्कळ नीति सांगितली व आपल्या हातांनीं तिची वेणी घालून व काजळ कुंकू इ० सौभाग्यालंकार लेववून; तिला मार्गसंबंधीं श्रम व राक्षसांपासून भीति उत्पन्न होऊं नये ह्मणून अंगरागादिक उत्तम उत्तम

वस्तु दिल्या; नंतर सीता व लक्ष्मण यांसहित रामास अत्रीनें दंडकारण्याचा मार्ग दाखवून, त्यांस मार्गस्थ केलें.

अत्र्याश्रम सोडून राम पुढें चालला असतां, त्यास ऋषींचे अनेक आश्रम आढळले, तेथें प्रत्येक आश्रमांत जाऊन त्या त्या ऋषींस वंदन करून, त्यांचे आशिर्वाद घ्यावे; याप्रमाणें जातां जातां त्यास एक मोठं भयंकर अरण्य लागलें; तेंच हें दंडकारण्य. येथें आल्यापासूनच श्रीरामचंद्रानें भूभार उतरण्यासाठीं असुरहननास प्रारंभ केला असें ह्मटलें पाहिजे. कारण, हीं त्रिवर्ग या अरण्यांतून चाललीं असतां, त्यांस प्रथम विराध[1] नांवाचा दैत्य भेटला; ह्या तिघांस पाहतांच त्यानें सीतेला उचलून घेऊन, तो जाऊं लागला. तेव्हां रामाचें व त्याचें कांहीं संभाषण होऊन रामानें त्याचा वध केला.

नंतर राम तेथून निघून शरभंग ऋषीच्या आश्रमास गेला, व त्याचे दर्शन घेऊन सुतीक्ष्ण ऋषीच्या आश्रमाकडे चालला असतां, मार्गांत त्यास अनेक ऋषि भेटले; त्यांनीं राक्षसांपासून आह्मांला फार ताप होतो

---

१ विराध हा मूळचा तुंबुर नामक गंधर्व असून, तो वैश्रवणाच्या शापानें राक्षसकुलांत जन्म पावला होता. हा दंडकारण्यांत क्रौंचावट नावाच्या वनांत रहात असे.

असें सांगून, आजपर्यंत या उन्मत्त असुरांच्या भक्ष्यस्थानीं किती तापसी पडले हें कळण्यासाठीं त्यांनीं तपस्व्यांच्या अस्थींचे पर्वतप्राय पडलेले ढीग रामास दाखविले; तेव्हां रामानें मी सर्व असुरांचा संहार करून तुह्मांस सुखी करीन असें त्यांस सांगून आपण सुतीक्ष्णाश्रमाकडे गमन केलें.

सुतक्ष्णाश्रमीं असतां सीतेनें ' शस्त्र धारणापासून धर्म कीं अधर्म ' या विषयावर रामास प्रश्न केला. त्यानें उत्तर दिलें कीं, ब्राह्मणांच्या संरक्षणासाठीं शस्त्र धरणें क्षत्रियांस अधर्म नाहीं. एरव्हीं क्षत्रियांनीं शस्त्र नधरलें तर ब्राह्मण आपलें संरक्षण करण्यास समर्थ नाहींत असें नाहीं. दुष्ट असुरांस शापानें दग्ध करण्यास ते समर्थ आहेत, पण संचित सुकृताचा ते असा व्यर्थ व्यय करीत नाहींत ह्मणून आह्मीच त्यांचें रक्षण केलें पाहिजे.

नंतर राम तेथून निघून पंचाप्सर सरोवरीं प्राप्त झाला-तों त्यासरोवरांतून येत असलेला गायनाचा ध्वनि ऐकून त्यास मोठें आश्चर्य वाटलें ह्मणून त्यानें तेथें जवळच राहणाऱ्या धर्मभृत ऋषीस त्याविषयीं प्रश्न केला, ते-

व्हां त्यानें रामाला मांडिकर्णी ऋषीची कथा सांगितली.

नंतर राम तेथून निघाला, तो कोठें दहा, कोठें चार, कोठें दोन, कोठें अर्द्धमास, कोठें वर्ष, असा रहात रहात व भेटतील त्या राक्षसांचा संहार करीत, त्यानें सीता व लक्ष्मण यांसह आरण्यवासाचीं दहा वर्षें घालविलीं, व पुन्हः सुतीक्ष्णाश्रमीं परत येऊन, अगस्त्य ऋषीच्या आश्रमाकडे वळला. राम तिकडे चालला असतां, मार्गांत त्यानें लक्ष्मणास अगस्त्याचा सर्व इतिहास सांगितला. सारांश; आश्रमाजवळ गेल्यावर लक्ष्मणानें अगस्त्यास राम आल्याचें वर्तमान कळविलें. त्यावरून त्यानें बाहेर येऊन रामास आंत नेलें व सीतेसहित त्याचें उत्तम प्रकारानें आदरातिथ्य केलें. पुढें त्यास अस्त्रांची प्राप्ति करून दिल्यावर पंचवटीकडे मार्गस्थ केलें. राम पंचवटीकडे जात असतां मार्गांत त्यास जटायूची भेट झाली.

---

१ हा दंडकारण्यांत राहणारा एक ऋषि. यानें दहाहजार वर्षें तपश्चर्या केल्यार, त्याच्या तपास विघ्न करण्यासाठीं इंद्रानें पांच अप्सरा पाठविल्या; त्यांस लुब्ध होऊन, यानें तप सोडिलें व त्यांसहवर्तमान गृहस्थाश्रम करीत तो एका सरोवरांत गुप्त राहिला. मांडिकर्णीऋषि अप्सरांसह ज्या सरोवरांत गुप्त झाला, त्यास पंचाप्सर सरोवर असें नांव पडलें.

पुढें श्रीरामचंद्रानें पंचवटींत जाऊन राहिल्यावर तेथें शूर्पणखा नांवाची रावणाची बहीण दंडकारण्याची स्वामिनी होती तिचें शासन केलें. त्यावरून तिचा सापत्न भ्राता खर हा रामाबरोबर युद्ध करण्याकरितां आला व आपल्या चौदाहजार असुरसेनेसह रामहस्तें मरण पावला.

खर मरण पावल्यावर शूर्पनखा लंकेंत गेली व तिनें रामाच्या हातून खरादिकांचा वध व आपलें [1]विरूपकरण झाल्याचें वर्तमान कळविलें. तें ऐकून रावण मारीच नावाच्या दैत्याकडे गेला व त्याला घडलेलें सर्व वर्तमान कळवून, त्यानें त्याजकरवीं सुवर्णरूप अशा सुंदर मृगवेषानें पंचवटींत संचार करविला. त्या वेषधारी सुवर्णतनुमृगास पाहतांच सीतेच्या मनांत मोह उत्पन्न होऊन, तिनें या मृगचर्माची कंचुकी—आपल्याला असावी अशी इच्छा दर्शविली; त्यावरून रामचंद्रानें लक्ष्मणास सीतेच्या रक्षणासाठीं ठेविलें व आपण त्या मृगामागें जाऊन त्याचा वध केला. परंतु त्यानें प्राण सोडितेवेळीं लक्ष्मणा धांव, लक्ष्मणा धांव असा रामाच्या स्वरासारखा स्वर काढिला; तो शब्द ऐकून ती साध्वी अति-

---

१ रामानें लक्ष्मणाकडून सूर्पणखेचें नाक व कान छेदविले होते.

शय घाबरून गेली ! रामचंद्राविषयीं तिच्या मनांत नानाप्रकारचे कुतर्क येऊन तिला मोठा धक्का बसला ! ! ती विव्हळ होऊन जमिनीवर पडली आणि तिनें स्वामीच्या रक्षणास जाण्यासाठीं लक्ष्मणाची दीनवाणीनें अतिशय प्रार्थना केली.

हें राक्षसांचें केवळ कपटकृत्य आहे असें लक्ष्मणाला पूर्णपणें कळल्यामुळें सीतेच्या मनांत निरर्थक उत्पन्न झालेली ही भीति जावी ह्मणून त्यानें तिची पुष्कळ प्रकारें समजूत केली. पण स्त्रीजात्यनुसार आपल्या भावी स्थितीविषयीं नाना कुतर्क सीतेच्या मनांत येऊन तिनें लक्ष्मणाला दुस्सह वाग्बाणांनीं ताडन केलें. त्यावरून लक्ष्मणालाही अतिशय क्रोध उत्पन्न होऊन त्यानें ‘ तूं षण्मासपर्यंत मोठ्या दुःखांत पडशील ’ असें सांगून व गुंफेच्या द्वारीं[1] आपल्या धनुष्यानें रेषा ओढून ‘ कांहीं झालें तरी तूं या रेषेच्या बाहेर येऊं नकोस असें सांगून आपण रामाचा शोध करीत निघाला.

इकडे लक्ष्मणाला जाऊन फार वेळ झाला नाहीं तोंच दशकंधर भिक्षुकवेषानें ‘ अलख ’ ह्मणून सीतागुंफेच्या द्वारीं दत्त !! रामभार्या अत्यंत सुंदर आहे हें त्यास पहिल्यापासून माहीत होतेंच ! तशांत अकंपन नांवाच्या राक्ष-

१ रामाच्या पंचवटींतल्या पर्णकुटिकेचें नांव.

सानें व शूर्पनखेनें सीतेच्या सौंदर्याचें वर्णन केल्यापसून तर रावणाची वृत्ति चंचल होऊन त्याचें मनही विकार-वश झालें होतें. असो ! सीतेनें त्या भिक्षुकाचा सत्कार केल्यावर त्यानें तिला विचारिलें कीं, तूं रूपानें अत्यंत सुंदर असून राक्षसांनीं व्यापिलेल्या या भयंकर आरण्यांत एकटी कां राहिलीस ? यावर सीता ह्मणाली–' महाराज, मी अयोध्येच्या दशरथ राजाचा ज्येष्ठ पुत्र जो राम त्याची स्त्री व मिथिलानगरीच्या जनक राजाची कन्या ! ! आह्मीं पितृ आज्ञा पाळण्यासाठीं प्रस्तुत आरण्यवास करीत आहों ! ! माझ्या प्राणपतीनें येथें दंडकारण्यांत आल्यापासून शूर्पनखेचें पारिपत्य करून त्रिशिरा, खर, दूषण इ. दुष्ट असुरांचा वध केला व आतां पुढें रावण व कुंभकर्ण यांस मारून रावणानें बंदींत घातलेल्या देवांस मुक्त करून मग आह्मीं परत अयोध्येस जाऊं. महाराज, आपण केव्हडा वेळ त्यांची वाट पहात उभे राहणार? राम लक्ष्मण वनांत गेले आहेत ते इतक्यांत येतील, तों-पर्यंत आपण या तृणासनावर स्वस्थ बसावें; ते आल्या-वर आपली पूजा करून आपलें इच्छित पूर्ण करितील. सीतेचें हें भाषण ऐकून रावणानें मनांत विचार केला कीं, गुंफेच्यादारीं असलेली चापरेषा उल्लंघून आंत जाण्याची

आपली शक्ति नाहीं. तेव्हां एकादि निराळीच युक्ति योजून आपला कार्यभाग साधावा, असें ह्मणून त्यानें एक निराळीच युक्ति योजिली; ती अशी–रावण प्रथम दांभिकपणानें सीतेला ह्मणाला–हे स्त्रिये, यावनांत तूं एकटीच रहात आहेस, यावरून तूं कोणी तरी राक्षसी नसशील कशावरून व मला येथें बसवून तूं मला भक्षण करणार नाहींस हें तरी कोणीं सांगावें? यावर सीता ह्मणाली–'शिव, शिव, यतिराज हें काय बोलतां? मी तुह्मांला शपथ वाहून सांगतें कीं, आह्मीं आपणासारख्या अतिथीचे किंकर आहोंत.

नंतर रावणानें मूर्च्छा आल्याचें लटकेंच मिष करून धरणीवर आंग टाकिलें व 'फलाहाराशिवाय माझा प्राण जातो तर तूं गुंफेबाहेर येऊन माझ्या तोंडांत फळ घाल' असें ह्मणून तो जमिनीवर गडबडां लोळूं लागला. हा अतिथि आपल्या दाराशीं भुकेनें व्याकुळ होऊन फुकट मरतो असें पाहून सीतेला त्याची दया आली व ती त्याला भिक्षा घालण्यासाठीं फळ घेऊन रेषेजवळ येऊन उभी राहिली; त्यावेळीं सर्व देव गुप्तरूपानें सीतेची स्तुति करून ह्मणूं लागले; 'हे जगन्माते, तूं आपलें मुख्यरूप अग्नींत गुप्त ठेवून केवळ

छायारूपानें लंकेंत जाऊन आमची सुटका कर. हे देवी, आह्मांला सोडविण्यास तुजवांचून कोणीही समर्थ नाहीं. कारण तुझ्या निमित्तानें तरी श्रीरामचंद्र लंकेस येऊन व रावणाचा वध करून आमची मुक्तता करील.' देवांचें हें भाषण ऐकून सीतेनें 'अवश्य' ह्मणून, भिक्षा घालण्यासाठीं आपला हात रेषे बाहेर केला मात्र; मग काय विचारावें? त्या दुरात्म्यानें तोच हात धरून सीतेला उचलून घेतलें व तिला आपलें खरें स्वरूप दाखवून-लंकेचा मार्ग सुधारला.

रावण सीतेला घेऊन चालला असतां, ती हा राम! हा राम! असा आक्रोश करीत होती. सीतेचा तो केविलवाणा स्वर ऐकून जटायु तेथें प्राप्त झाला व सीतेला सोडविण्यासाठीं त्यानें रावणाशीं बरेंच युद्ध केलें; पण रावणानें युक्तीनें त्याचे पंख उपटून त्यास मूर्च्छित केलें व आपण मोठमोठे पर्वत, अरण्यें नद्या व सागर ओलांडून लंकेंत गेला. सीतेनें जातां जातां आपले अलंकार एका वस्त्रांत बांधून ते ऋष्यमूक पर्वतावर बसलेल्या सुग्रीवादि पांच वानरांच्या मध्यें टाकून दिले.

हा वेळ पर्यंत सीतेनें आपल्या प्रिय पतीबरोबर अरण्यवासाचीं साडेतेरावर्षें कंठिलीं, त्याची हकीगत

वर लिहिलीच आहे. आतां आमच्या चरित्रनायिकेचा पुढील काल कोणत्या अवस्थेंत गेला तें पाहूं.

रावणानें लंकेंत आल्यावर सीतेला आपल्या अशोक नांवाच्या वनांत नेऊन ठेविलें व तिच्या रक्षणानिमित्त तेथें हजारों राक्षसींचा पहारा ठेविला; त्यासर्वांवर त्रिजटा नांवाची एक वृद्धराक्षसी प्रमुख होती. तिचा सहवास मात्र सीतेला सुखप्रद होई. कारण ती मोठी ज्ञानी व सुस्वभावी असल्यामुळें सीतेचें वारंवार शांतवन करून तिला इतर राक्षसींकडून फारशी पीडा होऊं देत नसे. पण त्रिजटा ज्या दिवशीं तेथें नसे, त्या दिवशीं इतर राक्षसीनीं सीतेच्या समक्ष रामाची निर्भत्सना करून लंकाधीशाच्या ऐश्वर्याचें वर्णन करावें, त्याप्रमाणें तिनें रावणाला वश व्हावें ह्मणून त्यांनीं कधीं तिला सामोपचारांनीं सांगावें व कधीं भीतिही दाखवावी; याप्रमाणें एके दिवशीं त्रिजटा तेथें नाहीं अशी संधी पाहून त्या राक्षसीनीं राम—लक्ष्मणांचीं मायावी शिरें निर्माण करून तीं सीतेपुढें आणून ठेविलीं व रावणानें रामलक्ष्मणांचा वध केला असें लटकेंच सांगितलें. पहा! जी आजपर्यंत राक्षसीनीं केलेल्या भयंकर छलाची अवगणना करून राहिली होती, ती जनकतनया रामलक्ष्मणाचीं शिरें पाह-

तांच अत्यंत शोकाकुल होत्साती धरणीवर पडली. हाय ! हाय !! बिचारीनें यावेळीं जो विलाप केला तो कोठवर वर्णावा ! ! ही दुःखद वार्ता ऐकून तर सीतेचें देहभान सुटून तिनें प्राणत्यागाचा निश्चय केला आणि जर त्या-वेळीं मारुती तेथें जाऊन पोहोंचला नसता व रामनामां-कित मुद्रिका सीतेपुढें ठेवून त्यानें रामाचें कुशलवृत्त तिला कळविलें नसतें तर तिनें खचितच गळफांस लावून आप-ल्या प्राणाचा अंत करून घेतला असता. असो !!

इकडे लक्ष्मण रामचंद्राचा शोध करीत चालल्याचें मागें सांगितलेंच आहे. पुढें त्याची व रामाची भेट झा-ल्यावर तूं सीतेला एकटी टाकून इकडे कां आलास ! ! असा रामानें लक्ष्मणास प्रश्न केला; त्यावरून लक्ष्मणानें घडलेलें एकंदर वर्तमान रामास निवेदन केलें; तें ऐकून रामानें त्याचें पुष्कळ समाधान केलें. नंतर ते दोघेही परत आश्रमा कडे यावयास निघाले. रामलक्ष्मण परत येत असतां त्यांना मार्गांत पुष्कळ कुशकुन झाले; त्यावरून भावी स्थितीविषयीं विपरीत भाव त्या उभय बंधूच्या म-नांत आल्यावांचून राहिला नसेल हें निराळें सांगावयास नकोच.

राम--लक्ष्मण पंचवटींत येऊन पाहतात तों तेथें सीता

नाहीं, ह्मणून त्यांनीं घावरून जाऊन तिचा पुष्कळ शोध केला; पण कोठेंच ठीकाणा लागेना ! तेव्हां त्या दोघांबंधूंच्या मनांत नानाप्रकारचे तरंग येऊन, सीतेची गांठ पडल्यादिवसापासून घडलेल्या सर्व गोष्टी सीतेप्रमाणेंच रामचंद्राच्याही मनांत एकदम उभ्या राहिल्या· आणि तेणेंकरून त्याचें मन अगदीं गोंधळून गेलें; मग ते दोघे तसेच सीतेचा शोध करीत चालले तों वाटेंत त्यांस मरणोन्मुख होऊन पडलेला जटायु आढळला. त्यानें घडलेली सर्व हकीगत रामचंद्रास कळवून व रामकार्यांत आपला अंत झाल्याबद्दल मोठें समाधान मानून जटायूनें प्राण सोडिला. जटायूच्या मरणाचें रामचंद्रास मोठें दुःख होऊन त्यानें त्याच्या मृत देहाचा दहनादि संस्कार केला.

नंतर राम पुनः अगस्त्याश्रमीं आला व तेथें त्यानें त्याजपासून शैवीदीक्षा ग्रहण केली. नंतर तो मतंगाश्रमाकडे चालला असतां मार्गांत त्यानें कबंध नामक राक्षसाचा वध केला व मतंगाश्रमीं गेल्यावर मातंग ऋषीचें दर्शन घेऊन तेथें शबरीचा उद्धार केला आणि लक्ष्मणासहित तेथून निघून तो पंपासरोवरीं आला.

येथें आल्यावर लक्ष्मणाशीं त्याचें सीतेविषयीं कांहीं

संभाषण झालें. नंतर तो ऋष्यमूक पर्वताकडे वळला. येथें आल्यावर सुग्रीवाश्रित व त्याचा सचिव जो मारुती त्याच्या मध्यस्तीनें रामाचें सुग्रीवाशीं अग्निसाक्षिक सख्य झाल्यावरून त्यानें सुग्रीवाचा ज्येष्ठ बंधु पण कट्टा वैरी जो वाली त्याचा वध करून सुग्रीवास किष्किंधेच्या गादीवर बसविलें व त्याजकडून मारुतीकरवीं सीतेची शुद्धि करविली. मारुती मोठा चतुर व बलाढ्य असल्यामुळें त्यानें लंकेंत जाऊन सीतेचा शोध केला, इतकेंच नव्हे तर रामनामांकित मुद्रिका प्रत्यक्ष तिच्यापुढें ठेवून व तिला रामाचें कुशल वर्तमान कळवून तिच्या वेणींतील चुडामणि रामापुढें आणून ठेविला. त्यावरून रामाला पराकाष्ठेचा आनंद होऊन, त्यानें मारुतीच्या बलाची व चातुर्याची पुष्कळ प्रशंसा केली व सुग्रीवास लंकेवर स्वारी करण्याची सिद्धता करण्यास सांगितलें.

इकडे लंकेंत बिभीषणानें सीतेला सोडून देण्याविषयीं आपल्या बंधूला–रावणाला–बंधुत्वाच्या नात्यानें करावयाचा तितका उपदेश केला, पण रावणाला आपल्या बाहुबलाचा मोठा गर्व झाल्यामुळें, त्याला बिभीषणाचा उपदेश कोठून रुचणार? उलट त्यानें बिभीषणाचा पराकाष्ठेचा धिःकार केला; त्यावरून तो रामाकडे येऊन त्याच्या आश्रयास राहण्याची इच्छा करूं लागला.

विभीषणास आश्रय द्यावा कीं न द्यावा या विषयीं तेथें बरीच भवति न भवति होऊन शेवटीं रामानें त्याला आश्रय देऊन त्याशीं सख्य केलें.

विभीषणाशीं सख्य झाल्यावर रामानें लंकेवर जाण्यासाठीं विश्वकर्म्याच्या अंशानें जन्मलेल्या नल नांवाच्या वानराकडून समुद्रावर पाषाणमय सेतु बांधवून लंकेंत आल्यावर सुवेलाचलासमीप सेनेचा निवेश केला.

सुवेलाचलीं आल्यावर रामानें राजनीतीस अनुसरून व विभीषणाचें अनुमोदन घेऊन अंगदास साम करण्यासाठीं रावणाकडे पाठविलें.

अंगदानें रावणाकडे जाऊन त्याला पुष्कळ प्रकारें बोध केला; पण त्यानें प्रथम तिकडे लक्ष दिलें नाहीं. तेव्हां अंगदानें आपलें पुच्छमय सिंहासन लंकाधीशाच्या सिंहासनापेक्षांही उंच करून आपली शिष्टाई सुरू केली. अंगदाचा हा उद्धटपणा पाहून रावणाला पराकाष्ठेचा राग येऊन त्यानें अंगदाला बांधण्याची आज्ञा केली. तेव्हां मारुतीप्रमाणेंच याणेंही आपल्या तेजाचा प्रभाव दाखवून कित्येक राक्षसांस मारिलें व आपण रावणाच्या राजमंदिराचें एक शिखर घेऊन रामाकडे परत आला व साम होत नाहीं असें ह्मणाला; त्यावरून रामानें यु-

द्धाची तयारी करून रावणासह सर्व असुरांचा संहार केला व बिभीषणाची लंकेच्या राज्यावर स्थापना केली आणि आपण सीतेकरवीं दिव्य करवून तिचा अंगिकार केला.

नंतर राम, सीता, लक्ष्मण, बिभीषण त्याचप्रमाणें सुग्रीव मारुती आदि करून सर्व कपिगण पुष्पकविमानांत बसून अयोध्येस यावयास निघाले.

याप्रमाणें पुष्पक विमान अंतरिक्षांतून जात असतां रामानें आपण ज्या ज्या स्थलीं वास केला, तीं सर्व स्थलें सीतेस दाखवून तेथें घडलेलें सर्व वर्तमान तिला निवेदन केलें. वाटेंत सीतेच्या आग्रहावरून किष्किंधा नगरींतील सुग्रीवादिकांच्या स्त्रियांस रामानें विमानांत घेतलें. नंतर राम भारद्वाज ऋषीच्या आश्रमांत उतरला व चवदा वर्षें पूर्ण होण्यास एकाच दिवसाचा अवधि असल्यामुळें, आपण आल्याचें वर्तमान भरतास कळावें ह्मणून त्यानें मारुतीस भरताकडे पाठविलें. भरताची रामावर अत्यंत प्रीति असल्यामुळें, राम आल्याचें वर्तमान ऐकून त्याला पराकाष्ठेचा आनंद झाला; त्यानें मारुतीचा मोठा सन्मान करून त्याला प्रेमालिंगन दिलें व शत्रुघ्नाकडून सर्व अयोध्या नगरी उत्तमप्रकारें शृंगारविली.

दुसऱ्या दिवशीं भरताची व रामाची भेट झाल्यावर उभयतांस जो आनंद झाला तो काय सांगावा ! ! भरतानें रामचंद्रास प्रेमालिंगन दिल्यावर लक्ष्मण, बिभीषण, त्याचप्रमाणें सुग्रीवादिकांसही प्रेमालिंगनें देऊन सीतेच्या चरणांवर मस्तक ठेविलें. नंतर रामचंद्रानें सीतेसह नगरांत प्रवेश करून राजवाड्यांत गेल्यावर कौसल्यादि मातांस व वसिष्ठास वंदन केलें. मग वसिष्ठानें सुमुहूर्त पाहून रामास राज्याभिषेक केला. त्या दिवशीं अयोध्यावासी जनांनीं मोठा उत्सव करून आनंद प्रदर्शित केला.

श्रीरामचंद्रानें राज्याभिषेकसमयीं लक्षावधि अश्व, धेनु, वस्त्रें, आभरणें व तीस कोटी सुवर्णमुद्रा दान केल्या असें पुराणांतरीं वर्णन आहे. असो !

याप्रमाणें सोहाळा झाल्यावर सहा महिने पर्यंत सुग्रीवादिकांस ठेवून घेऊन वस्त्राभरणांनीं त्यांचा गौरव करून त्यांस निरोप दिल्यावर सुग्रीव किष्किंधेस व बिभीषण लंकेस गेला.

रामराजा उत्तम नीतीनें राज्य करीत असतां, ‘ सीता ही सहा महिने रावणाच्या घरीं असून, तिचा रामानें अंगिकार केला हें चांगलें नाहीं; ’ अशी लोकवार्ता कर्णोपकर्णीं रामाच्या कानांवर आली. रामासारख्या पुत्रवत्

प्रजापालन करणाऱ्या नीतिमान् राजाला ही वार्ता ऐकून दुस्सह दुःख झालें; तथापि आपल्या प्रजेच्या संतोषासाठीं अग्नि–ब्राह्मणांसमक्ष जिचा शपथपुरःसर अंगिकार केला, त्या धर्मपत्नीचा–ती गरोदर असतांही–त्याग करण्यास तो तयार झाला. पहा, सारखें चवदा वर्षेंपर्यंत वनवासाचें खडतर दुःख कंठून कोठें आनंदाचे दिवस नजरेस पडतात तोंच सीतेवर ही आकाशाची कुऱ्हाड कोसळावी ही तिच्या दुर्दैवप्रभावाची उत्तम साक्ष देणारी जबरदस्त गोष्ट होय !! सीता लंकेंत असतां तेथें दुष्टबुद्धीच्या राक्षसींकडून घडोघडीं तिचा अपमान होत असतांही तिला झालें नसेल एव्हढें दुःख यावेळीं झालें. सीता लंकेंत असतां तिला रामचंद्राची भेट होण्याची आशा होती इतकेंच नव्हे, तर रामचंद्र माझी येथून सुटका करून मजवर पूर्ववत् प्रीति करील अशीही तिला बळकट आशा होती पण आतां त्या आशेला सुद्धां खग्रास ग्रहण लागल्यामुळें सीतेच्या दुःखाला पारावारच नाहींसा झाला. पण उपयोग काय ? भोक्तृत्व तितकें भोगलेंच पाहिजे असा ईश्वरी नेमानेम आहे.

रामानें लोकापवादास्तव आपल्या धर्मपत्नीचा त्याग करून, तिला लक्ष्मणाकरवीं गंगेच्या पलीकडे एका अर-

ण्यांत नेऊन सोडविलें. लक्ष्मण आपणास सोडून देऊन परत अयोध्येस गेला असें पाहून ती साध्वी विलाप करीत तेथेंच बसली. हाय ! हाय !! त्यावेळीं बिचारीच्या मनाची स्थिति काय झाली असेल याची कल्पनाही होणें कठीण !!! शिव शिव !! रामराजाच्या धर्मपत्नीवर सुद्धां असा भयंकर प्रसंग यावाना ? तस्मात् काळचक्र हें मोठें जबरदस्त आहे ! तें कोणाच्या कपाळीं केव्हां कसें हापटेल आणि त्या चक्रांत सांपडल्यावर बिचाऱ्या अनाथ दुर्दैव्याची काय अवस्था होईल याचा नेम नाहीं !!

सीता त्या अरण्यांत विलाप करीत असतां, तिची करुणावाणी ऐकून तेथें जवळ असलेले वाल्मीकाचे शिष्य तेथें आले. त्यांनीं तिची सर्व हकीगत विचारून घेऊन हें वर्तमान आपल्या गुरूला कळविलें, त्यावरून वाल्मीक ऋषि तेथें आला आणि त्यानें सीतेचें शांतवन करून तिला आश्रमीं नेलें व ऋषिपत्न्यांच्या समाजांत ठेवून त्यांस तिचें उत्तम प्रकारें पालन करण्यास सांगितलें.

सीता वाल्मीकाश्रमांत सदाचरणानें कालक्षेप करीत

असतां, तेथें यथाकाळीं प्रसूत होऊन तिला दोन पुत्र झाले. हें वाल्मीकास कळतांच त्याला मोठा आनंद झाला. त्यानें त्या दोघां पुत्रांचे नामकरणादि संस्कार करून त्यांतील एकाचें कुश व एकाचें लहु अशीं नांवें ठेविलीं. ते दोघेही मोठे तेजस्वी व आकृतीनें रामासारखेच होते.

उभयतां सीतापुत्र मोठे झाल्यावर वाल्मीकानें त्यांचें मौंजीबंधन करून वेदवेदांगें व धनुर्विद्या यांत त्यांस निष्णात केलें. शिवाय आपल्या शतकोटि रामायण काव्यांतून गायत्रीमंत्रप्रचुर चोवीस हजार काव्यही त्यांस पढविलें होतें.

याप्रमाणें कुश व लहु ऋषिवेषानें वाल्मीकाश्रमीं अध्ययन करीत असतां, तिकडे अयोध्येंत सीतेचा निष्कारण त्याग केल्यामुळें बारावर्षेपर्यंत पडलेल्या अवर्षणाच्या प्रतीकारार्थ वसिष्ठाच्या आज्ञेवरून रामानें अश्वमेध आरंभून यज्ञसंबंधी घोडा पृथ्वीवर सोडला. तो यदृच्छेनें फिरत फिरत वाल्मिकाश्रमांत जेथें लहु इतर ऋषिकुमारांबरोबर खेळत होता तेथें आला. त्या अश्वास पहातांच लहूला मोठें आश्चर्य वाटलें; त्यानें त्याच्या मस्त-

कावर असलेली सुवर्णपत्रिका वाचून त्यास तेथें जवळच एका कर्दळीस्तंभाशीं बांधून ठेविलें. त्यावेळीं वाल्मीकऋषि आश्रमांत नव्हता, कारण तो पाताळांत वरुणाच्या यज्ञास गेला असून लहूचा ज्येष्ठबंधु कुश हाही फळें आणण्यासाठीं वनांत गेला होता.

इकडे लहूनें अश्व धरलेला पाहून त्याचें रक्षण करीत असलेल्या शत्रुघ्नास मोठा राग आला, त्यानें लहूला अश्व सोडण्यास सांगितलें पण तें त्यानें ऐकिलें नाहीं. ह्मणून शत्रुघ्नाकडील वीर मनगटाच्या जोरावर तो घोडा सोडून नेऊं लागले, हें पाहून लहु क्रोधानें खवळून गेला व हातीं धनुष्यबाण घेऊन सज्ज झाला. मग काय विचारावें ? तेथें तुंबळ रण मातलें; त्यांत लहूनें मोठा पराक्रम करून शत्रुघ्नाच्या चतुरंग सेनेस जर्जर करून सोडिलें. आपल्याला हा आटपत नाहीं असें पाहून शत्रुघ्नानें त्याशीं मल्लयुद्ध केलें व त्यांत त्याचा पराभव करून त्यास आपल्या रथांत घातलें व सेनेसह अयोध्येचा मार्ग धरिला.

हें वर्तमान ऋषिकुमारांनीं आश्रमांत येऊन सीतेस कळविलें. तें ऐकून ती धाय मोकलीत धरणीवर पडली.

त्यावेळीं तिणें जो शोक केला त्याचें वर्णन कोण करील !!! हाय ! हाय ! विचारीची संकटांनीं तर पाठच पुरविली होती !! आपल्या पोटच्या गोळ्यांकडे पाहून जानकीला पतिविरहदुःखाचा विसर पडतो न पडतो तोंच पुत्रविरहाचें दुःख पुढें हात जोडून दत्त !! जानकी याप्रमाणें दुःखांत चूर होऊन धाय मोकलीत आहे इतक्यांत तिचा ज्येष्ठ पुत्र कुश तेथें आला. आपल्या मातेची ही अवस्था पाहून विचारा कुश घाबरून गेला. मातेची अशी स्थिति होण्याचें कांहींच कारण त्याला कळेना. तो वनांत गेल्यामुळें आपला कनिष्ठ भ्राता शत्रूनीं धरून नेला हें त्याला कोठून माहींत असणार ? सीतेनें कुशास पाहतांच मोठ्यानें हंबरडा फोडिला व घडलेलें वर्तमान त्याला कळविलें; तें ऐकून त्या बालवीराचा क्रोधाग्नि एकदम प्रज्वलित झाला. तो ह्मणाला-'माते, तूं कांहीं काळजी करूं नको, शत्रुघ्नानें लहूला जरी पाताळीं नेला असला तरी ही पृथ्वी पालथी घालून व शेषाचें मस्तक फोडून त्याला घेऊन येईन. माते, फार काय, पण तुझ्या आशीर्वादानें इंद्र, चंद्र, कुबेर अथवा ब्रह्मा, विष्णु आणि प्रत्यक्ष शंकर जरी असला तरी त्यांच्याशीं सुद्धां युद्ध करून जय मिळवीन, मग त्या

यःकश्चित् शत्रुघ्नाचा पाड काय ?' असें ह्मणून त्यानें मातेच्या चरणावर मस्तक ठेविलें व तिचा आशिर्वाद घेऊन जो निघाला तो शत्रुघ्नाच्या सैन्याचा संहार करीत चालला ! मग काय विचारावें ? शत्रुघ्नाची ती चतुरंग सैना वायुवेगानें त्या बालवीरावर तुटून पडली, पण त्यानें सर्वांस जर्जर करून शत्रुघ्नासही मूर्छित केलें.

हें वर्तमान रामास कळतांच, त्यानें लक्ष्मणास व मागून भरतास मारुतीसारखे वज्रदेही वीर बरोबर देऊन पाठविलें.

इकडे आपल्या ज्येष्ठ भ्रात्यास पहातांच लहूला अधिक वीरश्री चढून, त्यानें शत्रुघ्नाच्या रथांतून खालीं उडी टाकिली व सूर्याचें स्तवन करून, त्याजपासून धनुष्य संपादन केल्यावर, तो कुशासमीप येऊन उभा राहिला ! ! मग तर त्या उभयतांनीं मोठा प्रलय करून सोडला ! ! एव्हढी प्रचंड सेना, पण त्या चिमुकल्या बालवीरांनीं हं हं ह्मणतां तिचा धुव्वा उडवून लक्ष्मण, भरत, सुग्रीव, मारुति, जांबुवंत आदिकरून प्रमुख व वज्रदेही वीरांस मूर्छित करून धरणीवर पाडिलें.

शेवटीं असें झालें कीं, यज्ञदीक्षा असतांही रामास

स्वतः तेथें यावें लागलें; तेथें येऊन त्यानें त्या बालवीरांस पाहिलें मात्र; तों त्याच्या अंतःकरणांत साहजिक मोह उत्पन्न होऊन. तो ' तुह्मी कोणाचे पुत्र ' इत्यादि हकीगत त्यांस विचारूं लागला. त्यावर कुश ह्मणाला— ' युद्ध करावयाचें सोडून आमचें कुलगोत्र विचारण्यांत काय अर्थ आहे. ' रामचंद्र ह्मणाला; ' तें कळल्यावांचून मी युद्ध करणार नाहीं. ' त्यावरून कुश ह्मणाला—" हे अयोध्याधिपते, आह्मीं सीतेचे पुत्र आहोंत !! वाल्मिकऋषीनें आमचें पालन व उपनयन करून आह्मांला सर्वविद्या शिकविल्या. तुझे वीर माझ्या कनिष्ठ भ्रात्यास तो मूर्च्छा येऊन पडला असतां धरून नेऊं लागले ह्मणून मला युद्ध करणें भाग पडलें. " कुशाचें हें भाषण ऐकून रामास मूर्च्छा आली तथापि तो त्वरेनें सावध होऊन त्याशीं युद्ध करूं लागला. पण सीताविरहाचें असह्य दुःख व पुत्रमोह यांहीं करून रामाच्या शरीरांतील युद्धोत्साह नाहींसा झाल्यामुळें त्याचा पराभव होऊन त्यास प्रबल मूर्च्छा आली. इकडे सीतापुत्रांनीं मोठा जयघोष करून व रामलक्ष्मणाचीं किरीटकुंडलादि भूषणें काढून घेऊन आश्रमाकडे गमन केलें.

पुत्रांस पहातांच सीतेला गहिंर येऊन तिचे डोळे पाण्यानें भरून आले; तिनें त्या दोघांस पोटाशीं धरून रणांतील वर्तमान विचारिलें; तेव्हां कुशानें मातेच्या चरणांवर मस्तक ठेवून सांगितलें कीं–'माते, तुझ्या आशिर्वादानें रामासह चौघेबंधु रणभूमीवर पाडिले. ' ही शोचनीय वार्ता ऐकून जानकी मूर्च्छागत होऊन जमिनीवर पडली. हाय ! हाय ! जानकीनें यावेळीं जो विलाप केला त्याचें वर्णन करितां येणेंही अशक्य ! ! आपल्या मातेच्या या शोचनीय स्थितीमुळें बिचारा कुशही घाबरून जाऊन " माते, रामलक्ष्मण मूर्च्छा येऊन पडले आहेत ते आतां सावध होतील, असें ह्मणून तो सीतेची समजूत करीत आहे; इतक्यांत वाल्मिकऋषि तेथें प्राप्त झाला व त्याला हें सर्व वर्तमान कळलें; तेव्हां तो श्रीरामचंद्र व त्याचे बंधु आणि सैन्य जेथें होतें तेथें येऊन, त्यानें आपल्या अमृतमयदृष्टीनें सर्वांस सावध करून सीता व लहु, कुश यांची सर्व हकीगत त्यांस सांगितली; व सीतेच्या पवित्रतेविषयीं खात्री होण्यासाठीं हजारों लोकांसमक्ष तिजकरवीं दिव्य करवून; तिला पुत्रांसह रामाच्या स्वाधीन केलें. अहाहा ! त्यावेळीं सर्वांस जो आनंद

झाला तो कोठवर वर्णावा ? सीता व राम यांची भेट झाल्यामुळें, स्वर्गस्थ सुरवरानांही मोठा आनंद होऊन त्यांनीं रामावर सुमनवृष्टि केली. असो ! रामचंद्र वाल्मिकाचा निरोप घेऊन मोठ्या आनंदानें अयोध्येस परत आल्यावर त्यानें अश्वमेधाची समाप्ति केली. रामाचें एकपत्नीव्रत मोठें कडकडीत असल्यामुळें, त्यानें अश्वमेधसमयीं सीतेची सुवर्णाची मूर्ति करविली होती, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

पुढें सीता ही पतीबरोबर आनंदानें काळ घालवीत असतां, एकाएकीं भूमि विदारून तींत अदृश्य झाली व रामापूर्वींच निजधामास गेली.

नाना प्रकारचीं संकटें व पतिविरहासारिखीं भयंकर दुःखें कोसळलीं असतांही जिनें न डगमगतां धैर्यानें दिवस कंठून, एकनिष्ठता व पातिव्रत्य यांचें उत्तम फळ अक्षय्यसुख व अजरामर कीर्ति मिळविलीं; इतकेंच नव्हे तर जिनें आपल्या अवतारचरित्रानें आह्मां सारख्या अज्ञजनांस नीतीच्या पुष्कळ गोष्टी शिकविल्या; त्या सीतेसारखीं स्त्रीरत्नें ज्या भूमींतून पैदा झालीं ती आर्यभूमि व ज्यांच्या पदरीं तीं पडलीं ते रामचंद्रासारखे

महात्मे मोठे धन्य होत ! ! हें रसाळ चरित्र सोंपविण्यापूर्वी, आणखी एका गोष्टीचा उल्लेख केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं ! ती हीच कीं, रामानें लोकापवादास्तव सीतेचा बारा वर्षेपर्यंत त्याग केला असतांही तिजवरील त्याचें प्रेम रतीभरसुद्धां कमी झालें नव्हतें.

# तारामती.



# तारा.

ही पुराणप्रसिद्ध हरिश्चंद्र राजाची पट्टराणी असून महान् साध्वी होती. हिला ‘ तारामती ’ असेंही ह्मणत असत.

विप्रवेषधारी विश्वामित्रानें हरिश्चंद्रापासून स्वप्नांतरीं राज्यदानाचें उदक घेतल्यावर एके दिवशीं तो दक्षिणा मागण्यासाठीं ह्मणून हरिश्चंद्राकडे आला. राज्यदान-समयीं अडीच भार सुवर्ण दक्षिणेचेंही उदक सुटलें होतें ! ! असो; हरिश्चंद्रानें त्या विप्रवेषधारी विश्वामित्राचा मोठा सन्मान करून, आपलें सर्वस्व त्याच्या स्वाधीन केलें आणि ह्मणाला ‘ द्विजवर्या, आपणास जी दक्षिणा द्यावयाची ती प्रस्तुत मजजवळ नसल्यामुळें अवकाशानें देईन. ’ पण राजाचें हें बोलणें ऐकतो कोण ? वेषधारी द्विजवर्य तर “ आतांच दक्षिणा पाहिजे ” ह्मणून खळी खणून बसले ते कांहीं केल्या हालेनात. तेव्हां हरिश्चंद्राला मोठें संकट पडलें ! ! हो न जाणो ! आपलें सत्व नष्ट

---

1 अडीच भार ह्मणजे वीसहजार तोळे.

होऊन शिवाय ब्राह्मणाचा ( हा विश्वामित्र असून, तो आपलें सत्व पहाण्यासाठीं आला आहे हें हरिश्चंद्रास माहीत नव्हतें. ) कोप व्हावयाचा ही भीति. पण अखेरीस तारामतीसारख्या महान् पतिव्रतेच्या पूर्वपुण्याईनें दक्षिणा देण्यास सातदिवसांचा अवकाश मिळाला. नंतर हरिश्चंद्र आपली राजधानी ( अयोध्या ) सोडून वाराणशी नगरीकडे जाण्यास निघाला; हें पाहून साध्वी तारामतीही आपल्या ' रोहित ' पुत्रासह त्याजसमागमें निघाली.

हरिश्चंद्र आपल्या पत्नीपुत्रासह चालला असतां, त्यांचें सत्व हरण करण्यासाठीं विडा उचलून आलेल्या विश्वामित्रानें त्या त्रिवर्गांचा मार्गांत जो छळ केला तो ऐकून आंगावर कांटाच येईल ! विश्वामित्रानें दावाग्नि [illegible]ऊन जेव्हां एका भयंकर अरण्यांत त्या तिघांची तुटातुट केली तेव्हां, पतिपुत्रांच्या वियोगानें साध्वी तारामतीची जी अवस्था झाली तिचें वर्णन करणेंही अशक्य !!! असो; शेवटीं तीं तिघेंही काशीस पोंचून त्यांची भेट होते न होते इतक्यांत, ते वेषधारी द्विजवर्य दक्षिणा मागण्यासाठीं पुढें दत्त !! तेव्हां हरिश्चंद्रानें त्याचें समाधान करून सांगितलें कीं, " महाराज, आतां लवकरच आपली दक्षिणा देतों; " पण येथें इतका धीर

कोणाला ? आपली दक्षिणा लवकर मिळावी ह्मणून, त्या वेषधारी विश्वामित्रानें राजास ताडण करण्यासही कमी केलें नाहीं; असो.

इकडे हरिश्चंद्रानें विचार केला कीं, आपल्या तिघांच्या देहांशिवाय आपण सर्वस्व दान केलें आहे, तेव्हां तिघांचे देह विकल्यावांचून ब्राह्मणाच्या ऋणांतून मुक्त होण्यास दुसरा मार्ग नाहीं. असा विचार करून तो पत्नीपुत्रांसह नगरांतील एका प्रसिद्ध ठिकाणीं येऊन उभा राहिला व आपल्या स्त्रीपुत्रांस दास्यत्वासाठीं कोणीतरी विकत घ्यावें ह्मणून रस्त्यांतून जाणारे येणारे लोकांस दीनवाणीनें विनवीत आहे, इतक्यांत कालकौशिक नांवाच्या ब्राह्मणास ( हें रूप विश्वामित्रानेंच घेतलें होतें. ) त्यांची दया येऊन, त्यानें त्या दोघांस विकत घेतलें. हाय हाय !! तारामती सारख्या महान् साध्वीवर दुसऱ्याचें दास्यत्व करण्याचा प्रसंग यावा हें खरोखरच तिचें दुर्दैव होय ! असो; शेवटीं हरिश्चंद्रानें ब्राह्मणाच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं आपणासही विकून घेतलें.

हरिश्चंद्रास ज्यानें दास्यत्वासाठीं विकत घेतलें होतें तो वीरबाहु नांवाचा चांडाळ असून त्यानें हरिश्चंद्राला मसण राखण्याचें काम दिलें होतें.

इकडे साध्वी तारामती व रोहित हीं काळकौशिका-च्या घरीं त्याची सेवा करीत असतां, एके दिवशीं नित्याप्रमाणें रोहित आपल्या सवंगड्यांसह फुलें, दर्भ, समिधा इत्यादि आणण्यासाठीं अरण्यांत गेला असतां, तेथें जवळच असलेल्या एका तळ्यांत सुंदर फुललेलीं कमळें पाहून तीं आणावयास तो गेला असतां एका मोठ्या भयंकर विषारी सर्पानें त्यास दंश केला. हें पाहून त्याजबरोबर असलेलीं मुलें घाबरून जाऊन त्यांनीं हें वर्तमान तारामतीस येऊन कळविलें. पुत्राची ही वार्ता ऐकून तारामती धाडकन जमिनीवर पडली; तिनें त्यावेळीं जो विलाप केला त्याचें वर्णन कोठवर करावें! असो; तारामतीनें आपला शोक आंवरून पुत्राकडे जाण्यासाठीं काळकौशिकाजवळ आज्ञा मागितली; पण त्या पाषाणहृदयीपुरुषानें मध्यरात्र होईपर्यंत तिला तिकडे जाऊं दिलें नाहीं. मध्यरात्रीच्या सुमारास तिला पुत्राकडे जाण्यास परवानगी मिळाली.

साध्वी तारामती रोहित जेथें मृत होऊन पडला होता तेथं आली, आणी तिनें त्यास उचलून मांडीवर घेतलें. हाय! हाय! त्यावेळीं तारामतीला रडण्याचा जो हुंदका आला तो कांहीं केल्या आंवरेना!! बिचारी पु-

त्राकोरतां धाय मोकलीत आहे इतक्यांत तो निर्दय कालकौशिक कित्येक नागरिक जन बरोबर घेऊन तेथें आला आणि दुरूनच तारामतीकडे बोट दाखवून ह्मणतो " अरे ही पहा पोरें खाणारी राक्षसी ! ! ही नेहमीं आपल्या नगरांतील पोरें नेऊन खात असते. " शिव शिव ! कायहो हें भयंकर कर्म ! ! ( रागाचा मोठा आवेश आल्यासारखें दाखवून. ) अरे ह्या दुष्टेला धरा आणि महाराजांकडे घेऊन चला ह्मणजे ते या घोर अपराधाबद्दल हिला चांगलेंच शासन करतील. कालकौशिकाच्या तोंडून वरील उद्गार निघाल्यावर मग काय विचारावें ? सर्वांनीं एक गिल्ला करून तें पुत्राचें शव तिच्याच डोकीवर देऊन तिला राजवाड्याकडे चालविलें.

आधींच पुत्रवियोगजन्य दुःखानें होरपळून गेलेली तारामती राजवाड्याकडे चालली असतां, कालकौशिक आदिकरून सर्वत्रानीं तिजवर शिव्याशापांचा भडिमार चालविला; याप्रमाणें तो घोळका राजद्वारापुढें येऊन उभा राहिला. वाराणशीच्या अधिपतीनीं ( नांव ग्रंथांत आढळत नाहीं. ) सर्व हकीगत ऐकून घेऊन तारामतीचा शिरच्छेद करण्यासाठीं तिला वीरबाहूच्या स्वाधीन करविलें; वीरबाहूनें तिला हरिश्चंद्राच्या हवालीं केलें. हरिश्चं-

द्रास आवध करणें योग्य न वाटल्यामुळें व तारामती-स पाहतांच तिजविषयीं त्याच्या अंतःकरणांत दया उत्पन्न झाल्यामुळें त्यानें वीरबाहूची पुष्कळ प्रकारें समजूत केली, पण धन्याच्या हुकुमापुढें त्याचा निरुपाय होऊन त्याला समशेर उपसणें भाग पडलें. तेव्हां हरिश्चंद्र आपली तरवार पडताळून ह्मणाला. हे स्त्रिये, तूं लोकापवादाप्रमाणेंच जर नरमांसभक्षक दुष्ट असुरी असशील तर माझें कांहीं ह्मणणें नाहीं. कारण, अपराध्यास शासन हें झालेंच पाहिजे; पण जर निरपराधी मनुष्य असशील तर मात्र फुकट प्राणास मुकशील. यासाठीं तुझा कोणी रक्षणकर्ता असल्यास त्याचें स्मरण कर. त्या उदार महात्म्याच्या तोंडचे हे उद्गार ऐकून साध्वी तारामती ह्मणाली—हे पुण्यपुरुषा, प्रस्तुत दुर्दैवानें माझी पाठ पुरविल्यामुळें मी सर्वप्रकारें दीन झालें आहें. पति तर ब्राह्मणाच्या ऋणाकरितां मला केव्हांच अंतरला आणि तेव्हांपासून ह्या पोटच्या गोळ्याकडे पाहून काळाचे दिवस कंठीत होतें पण 'तेंही परमेश्वराला बघवलें नाहीं !! ( दुःखवेगानें ) देवा ! देवा ! मी अगदींच किंरे फुटक्या कपाळाची !! माझा या जगांत कोणीही वाली उरला नाहीं; आतां मी कोणाला आळवूं ? ( उसासा

टाकून ) शिव ! शिव ! काय हें माझें दैव कीं, मी पुत्रमरणानें विव्हळ होऊन बसलें असतां, मजवर हा असा भयंकर लोकापवाद येऊन मी मांसखाणारी असुरी ठरल्यें ! असो; प्रभूची मर्जी !! पुत्र तर मला सोडून गेलाच आणि मीहि आतां लवकरच मरणार ह्मणून प्रभूपाशीं एवढेंच मागत्यें कीं, "हरिश्चंद्रासारखा पति, रोहितासारखा पुत्र, वसिष्ठासारखा गुरु आणि विश्वामित्रासारखा याचक जन्मोजन्मीं मिळो !!! साध्वी तारामतीच्या तोंडचे हे उद्गार ऐकून, हरिश्चंद्र चित्रासारखा स्तब्ध झाला. ( यावरून, उभयतांच्या पूर्वस्थितींत पुष्कळ फरक होऊन त्यांनीं एकमेकांस ओळखिलें नसावें असें वाटतें. ) इकडे विश्वामित्रासही दयेचा मोठा उमाळा येऊन, तो तेथें प्रगट झाला आणि त्यानें रोहिदासास जीवंत करून साध्वी तारामती, हरिश्चंद्र व रोहिदास यांच्या परस्पर भेटी करविल्या; इतकेंच नव्हे तर इंद्रासमक्ष वसिष्ठाजवळ केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणें लोहपिष्ट खाऊन साठहजार वर्षें केलेल्या तपश्चर्येचें पुण्य हरिश्चंद्रास अर्पण करून शिवाय त्याचें राज्यही त्यास दिलें. अहाहा ! त्यावेळचा तो आनंद काय विचारावा ? इंद्रा-

दिकांसही मोठा आनंद होऊन, त्यांनीं त्यांवर पुष्पवृष्टि केली.

नंतर हरिश्चंद्रानें रोहिदासास राज्यावर बसवून, आपण या नरदेहाचें सार्थक व्हावें ह्मणून तपश्चर्या करण्याकरितां अरण्यांत गेला; त्याजबरोबर तारामती गेली व अंतीं पतिसमागमें सायुज्य पदाप्रत पावली.

भयंकर प्रसंगींही ज्यांनीं आपलें सत्व ढळूं दिलें नाहीं, इतकेंच नव्हे तर आपल्या प्रेमळ व सत्वशील वर्तनानें विश्वामित्रासारख्या मानी तपोनिधीसही खालीं पहावयास लाविलें त्या तारामतीसारख्या साध्वी या जगतीतलावर धन्य ! धन्य ! धन्य ! होत !!!

# मंडोदरी.



# मंडोदरी.

ही मयासुरास[1] "हेमा" अप्सरेपासून झालेली कन्या व लंकाधीश रावणाची पट्टराणी.

मंडोदरी ही महाज्ञानी व पतिव्रता असल्यामुळें, आपल्या पतीनें सीतेचें हरण केलें हें तिला मुळींच आवडलें नाहीं; तिनें सीतेला सोडून देऊन श्रीरामचंद्राशीं सख्य करावें ह्मणून पतीला पुष्कळ बोध केला; पण मदोन्मत्त व मानी लंकाधीशानें तिकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं इतकेंच नव्हे तर सीतेनें आपल्यास वश व्हावें ह्मणून तिचें मन वळविण्यासाठीं मंडोदरीला तिजकडे पाठविलें. पहा; मंडोदरीसारखी सुशील धर्मचारिणी आपल्या हिताचा मार्ग दाखवीत असतांही तिकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणें ह्मणजे त्या साध्वीचा अपमान करणें होय. असो. पतीचें हें करणें जरी तिला आवडलें नाहीं तरी पतीच्या आज्ञे बाहेर पाऊलही टाकावयाचें नाहीं असा तिच्या मनाचा निर्धार असल्यामुळें तिचा निरुपाय झाला.

---

१ पांडवांस ज्यानें "यमसभा" निर्माण करून दिली तोच हा.

पतीच्या आज्ञेप्रमाणें मंडोदरीनें ' अशोक ' वनांत जाऊन ब्रह्मज्ञानाचें मोठें अवडंबर रचिलें; पण सीतेच्या चतुरस्त्रपणामुळें तें जेथच्या तेथेंच थिजून गेलें आणि शेवटीं मंडोदरीला सीतेच्या चरणावर मस्तक ठेवून परत यावें लागलें.

मंडोदरी परत आल्यावर तिनें घडलेली हकीगत रावणास सांगून ह्मटलें " प्राणप्रिया, जानकी काल्त्र-यींही आपल्यास वश होणार नाहीं; यासाठीं तुह्मी तिला रामाकडे पाठवून देऊन त्याशीं सख्य करा. प्राणनाथ; तो कधींही आपली उपेक्षा करणार नाहीं. " मंडोदरीचें हें हितप्रद भाषण लंकाधीशास मुळींच मानवलें नाहीं. असो.

इकडे पुत्र व बंधु नष्ट होऊन कुलक्षय झाला तथापि रावणास जयाची आशा सुटेना ह्मणून, असुरगुरु शुक्राचार्यानें दिलेल्या " मृत्युंजय " मंत्राचें अनुष्ठान करण्यासाठीं तो एका गुप्तस्थलीं जाऊन बसला. हें वर्तमान बिभीषणानें रामास कळविल्यावरून, रामानें अंगद, मारुति आदिकरून दहा वीरांस तिकडे पाठविलें. त्यांनीं लंकेंत जाऊन रावणाचा पुष्कळ शोध केला; शेवटीं, बिभीषणाच्या राणीनें–सरमेनें हस्तसंकेतानें तें स्थळ त्यांस दाखविलें; मग काय विचारावें ? त्यांनीं एका क्ष-

ण्यांत तेथें प्रवेश करून यज्ञ—सामग्रीचा विध्वंस केला आणि रावणानें उठून युद्धास यावें ह्मणून त्यांनीं त्यास पुष्कळ त्रास दिला.

रावण आपलें आसन सोडीत नाहीं असें पाहून अंगदानें मंडोदरीस तेथें आणून तिचा छळ आरंभिला; त्यावेळचे तिचे ते करुणारव ऐकून रावणानें आपले नेत्र उघडले आणि अंगद, मारुति इत्यादिकांस तेथून हांकून दिलें व मंडोदरीचें समाधान करून लंकेंतील अवशेष सेनेसह मोठ्या त्वेषानें येऊन रामाशीं भयंकर युद्ध केलें व त्यांतच तो रामहस्तें मृत्यु पावला.

रावण रणांत पडल्याची वार्ता ऐकून लंकेंत व त्यांत विशेषतः राणीवसांत मोठा हाहाःकार उडून मंडोदरीसह रावणाच्य ऐशीं हजार स्त्रिया रणांत येऊन शोक करूं लागल्या. हाय ! हाय ! त्या भयंकर प्रसंगाचें वर्णन कोण करील !!! वाचक हो, जिचें नखसुद्धां कोणाच्या नजरेस पडावयाचें नाहीं त्या साध्वी मंडोदरीची त्यावेळची ती अवस्था पाहून व तिचे ते करुणाविलाप ऐकून एखाद्या पाषाणास सुद्धां पाझर सुटला असता. मग श्रीरामचंद्र, बिभीषण आदिकरून सर्वत्रांस गहींवर येऊन ते क्षणभर तटस्थ झाले यांत नवल तें काय ? पतिवि-

योगजन्य दुःखानें होरपळून गेलेल्या मंडोदरीचें श्रीरामचंद्रानीं पुष्कळ समाधान करून सांगितलें; " हे महासाध्वी मंडोदरी, आजपासून जे नारीनर प्रातःकालीं तुझें नामस्मरण करितील ते पापापासून मुक्त होतील; " असें सांगून बिभीषणाकरवीं तिला लंकेंत पोंचविलें. मंडोदरीला इंद्रजित आदिकरून अनेक पुत्र होते. असो !

ज्या परम सुशील धर्मचारिणीनें आपल्या रसवंती वाणीनें " परस्त्रीअभिलाष " व परस्त्री हरण या निंद्य व अनुचित गोष्टींपासून आपल्या प्रियभर्त्याचें मन परावृत्त व्हावें म्हणून त्याला वारंवार हितोपदेश करून आपलें कर्तव्य बजाविलें; ती साध्वी मंडोदरी " पतिव्रता " या बहुमानास खरोखर पात्र आहे, आणि अशा पतिव्रता आपल्या देशांत होऊन गेल्या हेंही आपणास एकप्रकारें मोठें भूषण आहे.

# सावित्री.



# सावित्री.

ही मद्रदेशाचा स्वामी अश्वपति याची कन्या. अश्वपति अनपत्य असल्यामुळें त्यानें अठरा वर्षेपर्यंत सावित्री देवीचें आराधन केलें व त्याच्या समाप्तिकाळीं तो हवन करीत असतां अग्नींतून सावित्री देवी प्रत्यक्ष प्रगट होऊन ती अश्वपतीस "वर माग" असें ह्मणूं लागली; तेव्हां राजानें पुत्राची याचना केली. परंतु देवीनें "प्रस्तुत तुला कन्या होईल" असें सांगितलें. पुढें यथाकालीं राजाची ज्येष्ठराणी प्रसूत होऊन तिला अप्रतिम लावण्यवती कन्या झाली. ती सावित्रीच्या प्रसादानें झाली असल्यामुळें राजानें तिचें नांव 'सावित्री' असें ठेविलें.

सावित्री उपवर झाली तेव्हां अश्वपतीला तिच्या विवाहाची मोठी चिंता पडली. कारण जो ह्मणून हिला पहाण्यास येई तो हिच्या तेजास दिपूनच माघारा जाई; त्यामुळें हिचा विवाह होईना. जसजशी मोठी होत चालली तसतशी तिच्या पित्याला तिच्या विवाहाची अधिकाधिक काळजी वाटूं लागली; तो एके दिवशीं

तिला ह्मणाला–' सावित्री, दिवसेंदिवस तूं मोठी होत चाललीस असून कोणीही राजपुत्र तुला वरण्याची इच्छा दर्शवीत नाहीं, यास्तव आतां तूं तरी देश हिंडून एखादा राजपुत्र जो तुला मान्य होईल तो वर; त्याशीं मी तुझा विवाह करीन.

पितृआज्ञेप्रमाणें सावित्री वृद्ध वृद्ध मंत्रीजन आपणासमागमें घेऊन निघाली, ती अनेक देश, नगरें व तपोवनें पहात फिरत असतां, तिनें द्युमत्सेन राजाचा पुत्र सत्यवान् यास पसंत केलें व परत आली.

सावित्री परत आल्यावर आपण पसंत केलेला वर पित्यास कळवावा ह्मणून ती त्याकडे गेली. आपला पिता नारदऋषीशीं संभाषण करीत आहे असें पाहून त्या उभयतांसही नमस्कार करून ती कांहींवेळ तेथेंच एका बाजूस मर्यादेनें उभी राहिली. सावित्रीस पाहून नारद ह्मणाला–' राजा, ही तुझी कन्या कोठें गेली होती व हिचा विवाह अजून कां झाला नाहीं ? ' यावर अश्वपति ह्मणाला–' हिला वर पहाण्यासाठीं देशांतरीं पाठविलें होतें. तिकडून ही आतांच आली आहे. येथून पुढें हिच्या लग्नाचा विचार ! ! ' त्यावरून नारदानें पुसलें– ' सावित्री, तूं कोणता वर निश्चित केला आहेस तें सांग.'

नारदाच्या या भाषणानें सावित्रीला संकोच उत्पन्न झाल्यामुळें तिच्यानें बोलवेना; असें पाहून तिजबरोबर असलेला वृद्ध मंत्री हात जोडून ह्मणाला–' मुनिवर्य, शाल्वदेशाचा राजा द्युमत्सेन नामक अंध असून, दायादांनीं त्यास पदच्युत केल्यामुळें तो प्रस्तुत अरण्यवास करून आहे; त्याचा सत्यवान् नांवाचा पुत्र मोठा गुणवान् व रूपवान् आहे, त्यास सावित्रीनें वरिलें आहे.

त्या वृद्धमंत्र्याचें हें भाषण ऐकून नारद त्या राजपुत्राची स्तुति करीत बोलले–' तो योग्य आहे खरा, पण त्याच्या आंगीं एक मोठाच उणेपणा आहे; तो सांगण्याचें जरी मला कारण नाहीं तरी सावित्रीच्या हितासाठीं सांगणें अवश्य आहे. ' तें ऐकून राजा ह्मणाला–' मुनिवर्य, काय उणेपणा असेल तो निःसंशय सांगा. ' यावर नारद ह्मणाले–'राजा, सांगूं ? एक तर !! सत्यवान् संवत्सरायु आहे. ' मुनिश्रेष्ठाचें हें भाषण ऐकून अश्वपति भयभीत होऊन ह्मणाला–' सावित्री, मुनिवर्यांनीं काय सांगितलें तें ऐकलेंसनां !!! यासाठीं, त्वां दुसरा वर पहावा हें उत्तम. ' अश्वपतीच्या या भाषणावर सावित्रीनें जें उत्तर दिलें तें प्रत्येक स्त्रीपुरुषानें आपल्या हृद्तपट्टिकेवर खोदून ठेवण्यासारखें आहे; ती ह्मणाली–

'बाबा, मी जो वर एकदां वरला तो वरलाच ! आतां कसाही असला तरी तो मला देवासमान आहे.' सावित्रीचें हें भाषण ऐकून नारदानें सांगितलें–'राजा, ज्या अर्थीं हिचा सत्यवानासच वरण्याचा निश्चय झाला आहे तर ही सत्यवानासच वरो;' असें सांगून नारदमुनि निघून गेले.

अश्वपतीनें लागलीच विवाहाची सिद्धता करून, सावित्रीसह मोठ्या लवाजम्यानिशीं ज्या वनांत सत्यवान् रहात होता तेथें येऊन द्युमत्सेनाची भेट घेतली व येण्याचें कारण कळविलें. तो ह्मणाला–'महाराज द्युमत्सेन, माझ्या कन्येनें आपल्या पुत्रास मनेंकरून वरल्यामुळें मी त्याशीं तिचा विवाह करून देण्यासाठीं आलों आहें.' अश्वपतीचें भाषण ऐकून द्युमत्सेन ह्मणाला–'मी स्वतः अंध, तशांत राज्यभ्रष्ट होऊन या अरण्यांत अशा निकृष्टस्थितींत काळ कंठित आहें, तेव्हां हा विवाह तुह्मांला सुखकर कसा होईल ? अश्वपतीनें सांगितलें–'महाराज, हा सर्व विचार करूनच मी आलों आहें; आतां त्याविषयीं विचार करण्याचें कारण राहिलें नाहीं.' उभयतांचें इतकें बोलणें होऊन द्युमत्सेनाचें अनुमोदन मिळतांच अश्वपतीनें सावित्री, सत्यवानास अर्पण केली व चार दि-

वसपर्यंत मोठ्या थाटाचा समारंभ करून सर्वांस संतोषित केलें. नंतर सावित्रीस तेथेंच ठेवून तो आपल्या नगरास परत आला.

अश्वपति परत गेल्यावर सावित्री आपल्या अंध श्वशुराची, सासूची व पतीची इतक्या उत्तम रीतीनें सेवा करूं लागली कीं, तेणेंकरून तीं प्रसन्न होत्सातीं तिजवर प्राणापेक्षांही अधिक ममता करूं लागलीं; हें पाहून सावित्रीला मोठें सुख होई. ती सर्वकाळ आनंदवृत्ति असे पण पतीच्या आयुष्याचें स्मरण झालें ह्मणजे तिला मोठा खेद उत्पन्न होई; तथापि तो तिनें त्यांस कधींच दाखविला नाहीं.

याप्रमाणें सावित्री वनांत आपल्या पतीच्या आयुष्याचें स्मरण धरून दिवस मोजीत असतां त्याचें आयुष्य आजपासून तीन दिवस राहिलें असें जाणून, त्याच्या आयुर्वृद्धीस्तव तिनें घोर व्रत आरंभिलें. त्या तीन दिवसांत तिनें अन्न इ०, कांहींच खाल्लें नाहीं. नंतर चवथ्या दिवशीं असें झालें कीं, आश्रमांत लांकडें नाहींत ह्मणून हातीं कुऱ्हाड घेऊन सत्यवान लांकडें आणावयासाठीं अरण्यांत जावयास निघाला; हें पाहून सावित्रीनेंही सासुसासऱ्यांस विनंति करून पतिसमागमें वनशोभा

पहावयास जाण्याची आज्ञा मागितली. पण आज आपणांवर ईश्वरी क्षोभ होऊन आकाश कोसळणार आहे हें तिनें त्या उभयतांस व आपल्या पतीस अगदीं कळूं दिलें नाहीं. असो; सासुसासऱ्याची आज्ञा घेऊन सावित्री पतिसमागमें अरण्यांत गेली.

अरण्यांत गेल्यावर सत्यवानानें काष्ठें तोडलीं; तशींच उत्तम उत्तम फळें व कंदमुळें घेऊन तो आतां आश्रमाकडे परतणार तों एकाएकीं त्याच्या मस्तकांत शूल उत्पन्न होऊन तो तेथेंच एका वटवृक्षाखालीं बसला व सावित्रीस मस्तकांत वेदना उत्पन्न झाल्याचें वर्तमान कळविलें; तें ऐकून तिनें त्याचें मस्तक आपल्या मांडीवर घेतलें व त्यास कुरवाळूं लागली. तो दिवस सत्यवानाच्या मरणाचा असल्यामुळें सावित्रीच्या मृदु अंकावरच त्याला भयंकर निद्रा लागली. शिव शिव !! सत्यवाना सारख्या राजपुत्राला आपल्या प्रियतमेशिवाय दुसरें कोणीही नाहीं अशा निर्जन अरण्यांत मृत्यु यावा हें त्याचें दुर्दैव होय. हाय हाय ! दैवदुर्विलासाच्या या प्रबल आघातानें सावित्रीची अवस्था काय झाली असेल ह्याची कल्पनाही होणें शक्य नाहीं.

इकडे सावित्री सत्यवानाचें मस्तक आपल्या मांडी-

वर घेऊन बसली आहे; इतक्यांत त्यास नेण्यासाठीं स्वतः यम तेथें प्राप्त झाला. यमास पाहतांच सावित्रीनें आपल्या पतीचें मस्तक खालीं वस्त्रावर ठेवून त्यास नमस्कार केला व पुसूं लागली–'महाराज, आपण कोण व येथें कोणत्या हेतूनें येणें केलें ?' सावित्रीचें हें नम्र व मधुर भाषण ऐकून यम ह्मणाला–' सावित्री, यम असें ज्यास ह्मणतात तोच मी असून प्रस्तुत तुझ्या पतीचें आयुष्य सरल्यामुळें त्यास न्यावयास आलों आहें.' यमाचें हें भाषण ऐकून सावित्री ह्मणाली–'धर्मराज, प्राणिमात्रांस नेण्यासाठीं आपले दूत येत असतात असें मीं पुष्कळ वेळां ऐकिलें आहे; असें असतां येथें आपणच कां आलां? एव्हढें कृपा करून सांगावें.'तेव्हां यम ह्मणाला–' सावित्री, धर्मपरायण पुरुषांस माझे दूत मुळींच स्पर्श करीत नाहींत; त्यांस नेण्यास मी स्वतःच येत असतों. राजकन्ये, तुझा पति मोठा पुण्यवान् असल्यामुळें त्यास नेण्यासाठीं आलों आहें;' असें सांगून यमानें सत्यवानाच्या प्राणांचें–वासनारूप सूक्ष्मदेहाचें आकर्षण करून दक्षिण दिशेचा मार्ग धरिला.

आपला पति प्राणरहित झाला असें पाहून सावित्रीनें त्याचा देह वस्त्रानें आच्छादून ठेविला व आपण तशीच

यमाच्या मागें निघाली. सावित्री आपल्या मागें येत आहे हें पाहून यम तिला ह्मणाला–'राजतनये, माझ्या-मागें कशाला येत्येस ? तूं परत जा आणि पतीचें और्ध्वदेहिक करून स्वस्थ रहा.' यमधर्माचें हें भाषण ऐकून सावित्री मोठ्या नम्रपणानें म्हणाली–'धर्मराज, जिकडे पति तिकडे स्त्री, म्हणून माझें येणें युक्तच आहे. इतकें बोलून सावित्रीनें यमधर्माची पुष्कळ स्तुति केली; तेव्हां यमधर्म प्रसन्न होऊन म्हणाला–' सावित्री, तूं पतीच्या प्राणाशिवाय एक वर माग व माघारी जा.' हें ऐकून सावित्री म्हणाली–'धर्मराज, माझ्या अंध श्वशुराचे नेत्र पूर्ववत व्हावेत एव्हढें द्या. ' त्यावरून यम 'तथास्तु' म्हणून पुढें चालला, तरी ही मागें येतच आहे. ते पाहून यम पुनः म्हणाला–' सावित्री, तूं माझ्या मागें कशाला येतेस ? अशानें तुझ्या या सुकुमार देहाला पुष्कळ श्रम होतील; या साठीं आतां माघारी जा. परत जातांना मार्गांत तुला श्रम न होवोत हा माझा आशिर्वाद आहे.' यावर सावित्री म्हणाली--'धर्मराज,पतिसमागमें चालणाऱ्या स्त्रियांस श्रम मुळींच होत नाहींत तशांत आपणासारख्या सत्पुरुषांचा समागम असल्यावर 'श्रम' या शब्दाचा उच्चार सुद्धां नको ! !सावित्रीचें हें

नम्र व चातुर्याचें भाषण ऐकून यमानें तिला 'दुसरा वर माग व माघारी जा' असें सांगितलें; तेव्हां सावित्रीनें 'माझ्या सासऱ्यास त्याचें पूर्वीचें राज्य प्राप्त व्हावें' असा वर मागितला. त्यावरून यमधर्म 'तथास्तु' ह्मणून पुढें चालला तरी ही त्याच्या मागें चालली; तें पाहून यमानें तिला 'तिसरा वर माग व माघारी जा' असें सांगितलें; तेव्हां सावित्रीनें 'माझ्या पित्यास शतपुत्र व्हावेत' असा वर मागून, शेवटीं आपल्यालाही शतपुत्र मागून घेतले; तेव्हां अर्थातच यमधर्माला सत्यवानास सोडणें भाग पडलें. सावित्रीचा दृढनिश्चय, चातुर्य व तिची आपल्या पतीवरील निष्ठा पाहून यमधर्माला मोठा आनंद झाला. तो ह्मणाला—'सावित्री, तूं मोठी पतिव्रता आहेस; मी प्रसन्न होऊन तुझा पति सोडिला, आतां तूं आपल्या घरीं जाऊन पतिसमागमें चारशें वर्षेपर्यंत राज्यलक्ष्मीचा मोठ्या आनंदानें उपभोग घे. तुला व तुझ्या पित्याला शतपुत्र होतील; असा माझा आशिर्वाद आहे' असें ह्मणून यमधर्मानें यमपुरीकडे गमन केलें.

मग तेथून निघून गेल्यावर सावित्री सत्यवान मृत होऊन पडला होता तेथें परत आली व त्याचें शिरकमळ

तिनें पूर्ववत आपल्या अंकावर घेतलें; इतक्यांत, एखादा मनुष्य गाढ झोपेंतून खडबडून जागा व्हावा, त्याप्रमाणें सत्यवान जागा झाला; व उठून बसून ह्मणूं लागला— ‘ प्राणवल्लभे, मी निद्रिस्थ असतां एकाएकीं काळासारखा एक भयंकर पुरुष प्राप्त होऊन, तो मला ओढून नेऊं लागला; त्यानें मला सोडावें ह्मणून एक नवयौवना तरुणी दीनवाणीनें त्याची विनवणी करीत होती. अखेरीस त्या काळपुरुषाला त्या तरुणीची दया येऊन त्यानें मला सोडिलें व मी जागा झालों. ’ सत्यवानाचें हें भाषण ऐकून सावित्रीनें घडलेलें सर्व वर्तमान त्याला श्रुत केलें.

त्यावेळीं तेजोराशि अस्ताचलास जाऊन बराच वेळ झाल्यामुळें रात्रही बरीच झाली होती ह्मणून सत्यवान ह्मणाला—‘ प्रिये, माझीं मातापितरें वाट पहात बसलीं असतील; यासाठीं लवकर आश्रमीं चल. ’ इतकें बोलतांच तीं उभयतां आश्रमाकडे येण्यास निघालीं.

बरीच रात्र झाली तरी सत्यवान् व सावित्री अरण्यांतून येत नाहींत ह्मणून द्युमत्सेन चिंता करीत आहे, तों काय चमत्कार झाला तो पहा; यमधर्माच्या वरप्रदानानें द्युमत्सेनाचे नेत्र पूर्ववत होऊन त्यास एकाएकीं

दिसूं लागलें. आज असें कशानें झालें ह्मणून त्याला मोठें आश्चर्य वाटून आनंदही झाला. इतक्यांत सत्यवान् व सावित्री ह्यांनीं येऊन वंदन केलें. मग तर त्याच्या आनंदाला भरतें येऊन त्यानें त्या उभयतांस मोठ्या प्रेमानें पोटाशीं धरून उशिराचें कारण विचारतांच सावित्रीनें घडलेलें सर्व वर्तमान द्युमत्सेनास निवेदन केलें. तें ऐकून त्याच्या आनंदाची परमावधि झाली. त्यानें त्याचवेळीं सावित्रीकडून, तिनें तीन दिवसपर्यंत केलेल्या उपोषणाचें पारणें करविलें. सारांश यमधर्माच्या वरप्रदानाप्रमाणें द्युमत्सेनास त्याचें राज्य प्राप्त झालें. तसेंच सावित्रीच्या पित्यास–अश्वपतीस शंभर पुत्र झाले. सत्यवानाला सावित्रीच्या पातिव्रत्याबद्दल मोठा आनंद होऊन ती त्याला अगदीं जीवकीं प्राण वाटे. सावित्रीचेंही सत्यवानावर अलौकिक प्रेम होतें.

पुढें द्युमत्सेनानें सत्यवानास राज्यावर स्थापिलें असतां यमवचनाप्रमाणें सावित्रीस शतपुत्र होऊन तिनें आपल्या पतिसह चारशें वर्षेंपर्यंत मोठ्या आनंदानें राज्यलक्ष्मीचा उपभोग घेतला.

पहा ! जिनें आपल्या आंगच्या शहाणपणानें व दृढ निश्चयानें प्रत्यक्ष काळासही प्रसन्न करून घेऊन आपल्या

मृतपतीस उठविलें. तसेंच आपल्या सासुसासऱ्याचें व पित्याचें कोटकल्याण केलें. त्या साध्वीची योग्यता माझ्यासारख्या अल्पमतीनें कोठवर वर्णावी ! !

सावित्रीसारखीं कन्यारत्नें ज्यांच्या उदरीं निर्माण झालीं तीं मातापितरें व ईशकृपेनें ज्यांच्या पदरीं तीं पडलीं ते सत्यवानासारखे राजपुत्र व त्यांचीं मातापितरें हीं खरोखर मोठीं भाग्यशाली होत.

# सुलोचना.



# सुलोचना.

ही शेषाची कन्या व रावणपुत्र इंद्रजिताची स्त्री; ही मोठी चतुर व परम पतिव्रता होती.

श्रीरामचंद्रांनीं सीतामुक्तीसाठीं ह्मणून लंकाधीश रावणाशीं जें भयंकर युद्ध केलें; त्यांत इंद्रजित हा लक्ष्मणाच्या हातून मरण पावला असतां, त्याचा एक भुज जाऊन त्याच्या प्रियपत्नीच्या-सुलोचनेच्या आंगणांत पडला. आपल्या पतीचा हस्त पहातांच सुलोचनेला पराकाष्ठेचें दुःख होऊन, तिनें पुष्कळ शोक केला, पण उपयोग काय! ईश्वरीसत्तेपुढें कोणाचेंही शहाणपण नाहीं. असो; शेवटीं पतीचें वर्तमान कळावें ह्मणून सुलोचनेनें रणांतील सर्व मजकूर त्या भुजेपासून लिहून घेतला; त्यावरून आपल्या पतीचें शिर सुवेलाचळीं श्रीरामचंद्राकडे आहे असें तिला समजलें. ह्मणून ती आपल्या सासुसासऱ्यांची आज्ञा घेऊन सुवेलाचळीं श्रीरामचंद्राकडे गेली. सुलोचनेचें स्वरूप पाहून ही श्री जानकीच येत आहे असें सर्व कपिगणांस प्रथम वाटलें; त्यांनीं ही आनंदाची वार्ता श्रीरामचंद्रास कळविली, परंतु हा त्यांना

भ्रम लौकरच दूर होऊन बिभीषणाच्या सांगण्यावरून तो इंद्रजिताची राणी सुलोचना येत आहे असें समजलें. तेव्हां कपिगणांस मोठें आश्चर्य वाटलें. शिव शिव; जिचें नख सुद्धां नजरेस पडावयाचें नाहीं, ती सुलोचना आज दीन होत्साती येत आहे हें पाहून तर बिभीषणाच्या नेत्रांवाटे अश्रुधारा लोटल्या !! श्रीरामचंद्रांनीं बिभीषणाचें शांतवन करून सुलोचनेस प्रश्न केला कीं 'हे साध्वी, तुझें येणें आमच्याकडे कोणत्या हेतूनें झालें ? तें सांग.' तेव्हां, सुलोचना श्रीरामचंद्रास नमस्कार करून ह्मणाली–' हे भगवन्, माझ्या मनांतून सहगमन करावयाचें असून पतीचें शिर आपल्याकडे असल्यामुळें, तें मागण्यासाठीं मी आलें आहें तर हे सीतापते, या दीन अभागीवर कृपा करून तें द्यावें' सुलोचनेचें हें नम्र भाषण ऐकून श्रीरामचंद्रांनीं तिला पुनः प्रश्न केला; ते ह्मणाले–' हे साध्वी सुलोचने, तुझ्या पतीचें शिर आमच्या जवळ आहे हें तुला कसें समजलें ?' यावर सुलोचना ह्मणाली–' प्रभो, माझ्या पतीच्या एका भूजेनें तो सर्व मजकूर मला लिहून दाखविला.' असें ह्मणून इंद्रजिताच्या भुजेनें लिहून दिलेलें पत्र सर्वांस दाखविलें. तें पाहून राम, लक्ष्मण, बिभिषण आदिकरून

सर्वांस मोठें नवल वाटलें. ते सर्व आश्चर्यानें चकित होऊन क्षणभर तटस्थ झाले. निर्जीव भुजा पत्र कसें लिहून देईल असें ह्मणून बहुतेकांनीं ती गोष्ट अगदीं खोटी ठरविली परंतु सुलोचनेनें पुनः पुनः तेंच सांगितल्यावरून शेवटीं तेथें अशी तोड निघाली कीं, ' सुलोचनेनें येथें असलेलें आपल्या पतीचें शिर हंसविलें तरच आह्मी सुलोचनेचें बोलणें खरें मानूं; नाहींपेक्षां सर्व असत्य आहे असें समजून इंद्रजिताचें शिर हिला नेऊं देणार नाहीं ! !

असा ठराव झाल्यावर ज्याच्या कपाळीं शेंदुराचा मळवट भरला असून जटा मोकळ्या सुटल्या आहेत, जिभेचा लोळ बाहेर पडला आहे, क्रोधातिशयामुळें ज्याचा वामनेत्र आरक्त दिसत असून, ज्यानें आपला सव्यनेत्र घट्ट मिटला आहे असें तें इंद्रजिताचें शिर श्रीरामचंद्रांनीं ऋषभाकरवीं आपल्या समोर आणविलें.

आपल्या पतीचें शिर पहातांच सुलोचनेला गहिंवर दाटून तिच्या नेत्रांवाटे खळखळ अश्रुधारा वाहूं लागल्या. तिनें त्या शिरकमलाला प्रेमानें आलिंगन दिलें. नंतर जमिनीवर वस्त्र पसरून, त्यावर तें शिर ठेविलें व आपण हात जोडून पुढें उभी राहिली आणि पतीच्या शिराला हंसविण्याविषयीं ती प्रयत्न करूं लागली. तिनें त्यावेळीं नानाप्रकारें प्रयत्न केला, पण इंद्रजिताच्या

शिराला कांहीं हंसें येईना ! तेव्हां, सुलोचनेला खेद उत्पन्न होऊन ती मोठ्या संकटांत पडली. हाय ! हाय ! यावेळीं शेषतनयेनें जो विलाप केला, तो कोठवर वर्णावा ? सारांश—पतीच्या शिरानें हंसावें ह्मणून सुलोचेनेनें आपल्याकडून अगदीं पराकाष्ठा करून सोडिली पण इंद्रजिताला कांहीं हंसें ह्मणून येईना. खरेंच आहे कीं, शोकरसाच्या ऐन भरांत हास्यरस कधींही उत्पन्न व्हावयाचा नाहीं; कारण, ते परस्पर अत्यंत विरोधी आहेत.

सुलोचनेची अगदीं निराशा झाली तथापि तिनें धैर्य सोडिलें नाहीं; ती मोठी चतुर असल्यामुळें, तिनें फिरून प्रयत्न करून पहाण्याचा निश्चय केला. ती ह्मणाली—"प्राणवल्लभा, हें भवितव्य जर मला पूर्वींच कळतें तर मी तुमच्या साह्यास आपल्या पित्यास बोलावून जय मिळविला असता."

सुलोचनेनें हे शब्द आपल्या मुखावाटे उच्चारिलेमात्र; तोंच तें इंद्रजिताचें निर्जीव शिर आपला सव्यनेत्र उघडुन मोठ्यानें खदखद हंसलें व हा प्रत्यक्ष चमत्कार सर्वांच्या दृष्टीस पडला ! ! मग काय विचारावें ? अखिल कपिसेनेंत सुलोचनेचा जयजयकार होऊन, सर्व वानरांनीं व स्वर्गस्थ सुरवरांनीं शेषतनयेवर पुष्पवृष्टि केली व श्रो-

रामचंद्रानींही मोठ्या आदरानें इंद्रजिताचें शिर तिच्या स्वाधीन केलें.

इकडे इंद्रजिताचें शिर हंसलें हें सर्वांनीं प्रत्यक्ष पाहिलें पण त्यांतलें वर्म कोणासही समजलें नाहीं. ह्मणून सर्वांनीं श्रीरामचंद्रास शिर हंसण्याचें कारण विचारलें; तेव्हां श्रीरामचंद्र ह्मणाले–' सुलोचना ज्यास साह्यास आणणार होती, त्या तिच्या पित्यानेंच इंद्रजितास मारिलें ! ! सुलोचनेचा पिता शेष व तोच हा शेषावतार प्रत्यक्ष लक्ष्मण ! ! आतां प्रत्यक्ष श्वशुरानेंच जर जामाताचा वध केला तर सुलोचना साह्य तरी कोणास आणणार होती ? या गोष्टीचें इंद्रजिताला मोठें आश्चर्य वाटून हंसें आलें. असो; इंद्रजितानें हा वेळपर्यंत माझें खरें स्वरूप ओळखिलें नव्हतें; तें आतां ज्ञानरूप सव्यनेत्रानें अवलोकन करून तो मुक्त झाला.

इकडे जामाताचा वध करून कन्येला वैधव्यकूपांत लोटून दिल्याबद्दल लक्ष्मणाला मोठें दुःख होऊन तो शोकाकुल झाला. तेव्हां श्रीरामचंद्रानीं—' हा क्षात्रधर्म मोठा कठीण आहे; रणाचे ठायीं पिता, पुत्र, बंधु, जामात जरी असले तरी त्यांचा वध करावा, ' अशी नीति आहे.

इत्यादि प्रकारें त्याचें पुष्कळ शांतवन केलें. शेवटीं, लक्ष्मणाचा शोक अनावर झाला असें पाहून श्रीरामचंद्र ह्मणाले–'बा सौमित्रा, तुझी इच्छा असल्यास मी इंद्रजितास जीवंत करून या उभयतांचें ऐक्य करून देतों.' श्रीरामचंद्राचें हें भाषण ऐकून सर्वांस मोठा धाक पडला. इंद्रजित पुनः जीवंत झाल्यास प्रसंग मोठा कठीण आहे असें जाणून मारुती सर्वांपुढें होऊन ह्मणाला–प्रभो, ह्या महान् पराक्रमी इंद्रजिताला मारण्यासाठीं आह्मांला केव्हढे सायास करावे लागले आहेत, तें पाहूनच काय करणें असेल तें करावें. वायुसुताचें हें भाषण ऐकून लक्ष्मण ह्मणाला–' प्रभो–इंद्रजित जीवंत व्हावा असा माझा आग्रह नाहीं; जेणें करून सर्वांचें कल्याण व समाधान होईल तेंच करावें.

लक्ष्मणाच्या तोंडचे हे शब्द ऐकून सुलोचनेची निराशा झाली, तिनें आपल्या पतीचें शिर घेऊन श्रीरामचंद्राच्या चरणांवर मस्तक ठेविलें आणि विनंति केली कीं, ' हे भक्तवत्सल प्रभो, मी आज पतिसमागमें अग्निप्रवेश करणार आहें तर आपण आज लंकेवर न जातां मला सद्गति देऊन नंतर युद्ध करावें.' श्रीरामचंद्रानीं


'तथास्तु' ह्मणून त्या वीरपत्नीच्या मस्तकीं आपला वरदहस्त ठेविला. नंतर सुलोचना श्रीरामचंद्राची मूर्ति हृदयीं धारण करून रणाचे ठिकाणीं आली व आपल्या पतीचें कलेवर घेऊन, तिनें लंकेंत प्रवेश केला.

लंकेंत आल्यावर सुलोचनेनें समुद्रकांठीं एक प्रचंड कुंड तयार करविलें व आपण सती जाण्याची सर्व तयारी करून, आपला वाडा ब्राह्मणांकरवीं लुटविला, त्याचप्रमाणें सुवासिनी स्त्रियांस सौभाग्यवायनें देऊन, शिवाय पुष्कळ दानधर्म केला आणि सासुसासऱ्यांसह सर्वांचा अखेरचा निरोप घेऊन, पतिसमागमें मोठ्या आनंदानें अग्निकाष्ठें भक्षण केलीं ! ! हाय ! हाय ! त्यावेळेचा भयंकर प्रसंग पाहून सर्वांनीं एकच हंबरडा फोडिला ? रावण व मंदोदरी यांस तर देहभानच नाहींसें झालें ! ! सारांश त्या दिवशीं ती लंकानगरी भयाण व शोकमय भासत होती.

पहा, जिच्या पातिव्रत्यप्रभावानें निर्जीव भुजेस लिहितां आलें हें तर काय पण जिनें प्रत्यक्ष श्रीरामचंद्रासमोर आपल्या पतीचें निर्जीव शिर हंसविलें आणि पतिनिधन झाल्याबरोबर आपली संसारयात्रा आटपून व

मायामोहाचे सारे पाश तोडून, जिनें आपल्या पतीच्या मृतदेहाबरोबरच आपला देह अग्नीला अर्पण करून अजरामर कीर्ति मिळविली; त्या सुलोचनेसारखीं अद्वितीय प्रतापशाली कन्यारत्नें आपल्या या पवित्र आर्यभूला खरोखरच भूषणें होत ! !

# सीमंतिनी.



# सीमंतिनी.

आर्यावर्तांत फार प्राचीन काळीं चित्रवर्मा नांवाचा राजा राज्य करीत होता; तो मोठा कुलीन, चतुर, उदार व पुण्यशील अशी त्याची सर्वत्र ख्याति असे. चित्रवर्मा स्वतः मोठा पराक्रमी, न्यायी, धूर्त, मानी आणि दुर्जनांचा काळ असल्यामुळें आसपासच्या सर्व राजांना त्याचा दरारा असे; ते चित्रवर्म्याला आपला सार्वभौम मानून त्याच्या संतोषासाठीं त्याला वार्षिक खंडही देत.

चित्रवर्मा हा कडकडीत शिवउपासक असून त्याच्या उपास्यदेवताच्या पूर्ण कृपेनें त्याला पुत्रसंतति पुष्कळ असून सीमंतिनी नांवाची एकच कन्या होती. हीच राजकन्या आमच्या या गोष्टीचें प्रधान पात्र होय. सीमंतिनी फार सुंदर असल्यामुळें तिला पाहणारांस ही प्रत्यक्ष इंदिराच अवतार घेऊन या भूमंडळावर या राजाच्या पोटीं निर्माण झाली आहे असें वाटे. सीमंतिनी आपल्या पित्याचा केवळ पंचप्राणच असल्यामुळें तिला पाहतांक्षणीं चित्रवर्म्याला मोठा आनंद होई पण तो फारवेळ टिकत नसे. कारण, सीमंतिनीच्या जन्मकालावरून एका

ज्योतिषशास्त्रज्ञ ब्राह्मणानें "सीमंतिनीला तिच्या चव-दाव्या वर्षी वैधव्य प्राप्त होईल; तत्रापि श्रीशंकराच्या कृ-पाप्रसादानें तीन वर्षांनीं ती पुनः सौभाग्यवती होईल" असें भविष्य वर्तविलें होतें. प्रत्यक्ष पोटच्या गोळ्याच्या वाईटाबद्दल द्विजवेदींतून निघालेल्या या खेदोद्गाराचें त्याला स्मरण झालें ह्मणजे भीतीनें त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे रहात. यक्ष—किन्नर योषितांनींही जिचें दा-स्यत्व करावें अशा आपल्या प्रियकन्येच्या सौंदर्याची माती होणार ह्मणून चित्रवर्मा नेहमीं उद्विग्न असे. आणि तो उपवर झाल्यापासून तर त्याच्या दुःखाला पारावारच नाहींसा झाला; तथापि भविष्यवादींच्या वचनांवर वि-श्वास ठेवून भवितव्य टाळण्यासाठीं कन्येला अविवाहित ठेवणें त्याला प्रशस्त वाटेना. अखेरीस कांहींही होवो; जें कपाळीं असेल तें कांहीं केलें तरी चुकत नाहीं असें ह्म-णून त्यानें सीमंतिनीचा विवाह करण्याचा निश्चय केला व तिच्या रूपास अनुरूप असा वर शोधण्यासाठीं चित्र-वर्म्यानें चतुरमंत्री देशोदेशीं पाठविले.

ब्राह्मणानें सांगितलेलें भविष्य सीमंतिनीनें आपल्या दासींच्या तोंडून ऐकिलें होतें आणि तेव्हां पासूनच ति-च्या जिवाला एकसारखी हुरहुर लागून शोकपर्यवसायी

डचें पाणी पळालें. नावाड्यांनीं आपली होती तेवढी शिकस्त केली पण तिचा कांहींएक उपयोग न होतां थोड्याच वळानें ती नौका दिसेनाशी झाली.

झालें, सर्वच आटपलें. सीमंतिनीचा सौभाग्यतरणि अस्ताचलास गेला आणि जिकडे तिकडे मोठा हाहाःकार उडून तें यमुनातीर भयाण स्मशानाप्रमाणें भासूं लागलें.

ही दुःखकारक वार्ता तावडतोब जिकडे तिकडे पसरली. ज्याला थोड्या वेळापूर्वीं आपण अगदीं उत्तम स्थितींत पाहिलें; त्या राजजामाताच्या मरणाची भयंकर बातमी प्रथम कोणास खरी सुद्धां वाटेना आणि ती खरी न वाटणें साहजिक होतें. पण उपयोग काय ? खरीच ती ! ज्यानें ऐकावी त्याला धसकन धक्का बसावा; त्याचें हृदय करपून जावें आणि कोणाचें करपणार नाहीं ? ही शोकप्रद वार्ता ऐकून जो तो कालिंदीतटाकडे धांवूं लागला. राजा, राणी व सीमंतिनी यांच्यावर हा भयंकर विजेचा लोळ आदळतांच त्यांनीं मोठ्यानें हंबरडा फोडून धरणीवर आंग टाकिलें. प्रधानादि मंत्री मंडळीनें व सुहृद्—आप्तजनांनीं त्यांस सांवरून त्यांची पुष्कळ प्रकारें समजूत केली, पण व्यर्थ. सीमंतिनी ज्या कर्माला भीत होती तेंच कीं हो आज ओढवलें. हाय ! हाय ! बिचारीच्या

सौभाग्यभांडारावर दरोडा पडून सर्व ऐहिक सुखांचा व मनोरथ यांचा भंग झाल्यामुळें सीमंतिनीला केव्हढें दुःख झालें असेल ह्याची कल्पना वाचकांना होईल तर त्यांनीं करावी; आमच्यानें शब्दांनींही वर्णवत नाहीं.

इकडे इंद्रसेन व लावण्यवती—चित्रांगदाचा पिता व माता—यांना हें वर्तमान कळतांच तींही तेथें आलीं; मग तर सर्वत्रांच्या दुःखशोकाला पारावारच नाहींसा झाला. सर्वांनीं आपल्या जिवाचा हवा तितका आटापीट केला पण परमेश्वरसत्तेपुढें कोणाचाही इलाज नसल्यामुळें शेवटीं ‘ प्रभूची मर्जी ’ असें ह्मणून—चित्रांगदाच्या विरहजन्य दुःखानें हाय हाय करीत तीं आपल्या स्थलीं गेलीं.

मनुष्यावर संकटें येऊं लागलीं ह्मणजे तीं चोहोंकडून येतात. आधींच पुत्रविरहजन्य दुःखानें शोकसागरांत बुडालेल्या इंद्रसेनाला लावण्यवतीसह त्याच्याच दायादांनीं प्रतिबंधांत ठेवून त्याचें सर्व राज्य हिरावून घेतलें.

चित्रांगद बुडाल्याचें वरतीं लिहीलेंच आहे. राजपुत्र फार सुंदर व तरुण असल्यामुळें नागकन्यांनीं मोहित होऊन त्याला पाताळांत नेलें. नागभुवनीचें[1] अनुपमेय ऐ-

---

[1] पाताळांत नागांचें राज्य आहे अशी पौराणिक कल्पना आहे.

भवितव्यतेचा भयंकर देखावा तिच्या डोळ्यांपुढून मुळींच हालेना. पण ती मोठी विचारी असल्यामुळें तिनें आपलें दुःख कोणालाही कळूं दिलें नाहीं, तथापि भावी स्थितीचा विचार मनांत आला ह्मणजे तिच्या काळजाचें पाणीच व्हावें ! ! शेवटीं तिनें याज्ञवल्क्यमुनिपत्नी मैत्रेयी इचे पाय धरिले आणि तिला आपली सर्व हकीगत सांगून ह्मणाली—" मातोश्री, अक्षय्य सौभाग्यदायक असें व्रत मला सांग " सीमंतिनीची हकीगत ऐकून मैत्रेयीलाही मोठें दुःख वाटलें. ती ह्मणाली—" मुली, तूं कांहीं काळजी करूं नको. परमेश्वरकृपेनें तुझे सर्व मनोरथ परिपूर्ण होतील, मात्र आजपासून तूं प्रदोषसमयीं श्रीशंकराची मनोभावें करून षोडशोपचारें पूजा कर आणि नित्य सहस्र ब्राह्मण भोजन व दंपत्यपूजन कर. तुजवर कसाही प्रसंग पडला तरी तूं हें व्रत टाकूं नको. ऋषिपत्नीनें सांगितल्याप्रमाणें सीमंतिनीनें प्रदोषपूजा ब्राह्मणसंतर्पण व दंपत्यपूजन करण्यास प्रारंभ केला.

इकडे सीमंतिनीला वर पहाण्यासाठीं जे मंत्री गेले होते त्यांनीं नैषधदेशच्या राजाचा पुत्र चित्रांगद यास पसंत केलें. चित्रांगद हा पुराणप्रसिद्ध नलराजाचा पौत्र व इंद्रसेनाचा पुत्र होय.

पुढें लवकरच सुमुहूर्तावर सीमंतिनी व चित्रांगद यांचा मोठ्या थाटानें विवाह झाला व तो समारंभ पुष्कळ दिवसपर्यंत चालून चित्रवर्म्यानें असंख्य अश्व, गज, रथ, दास, दासी, रत्नें, भूषणें, वस्त्रें शिवाय द्रव्य व वरदक्षिणा हीं जामातास अर्पण केलीं.

विवाहसमारंभ आटपल्यावर चित्रवर्म्यानें वरपक्षाकडील वऱ्हाडीमंडळीचा वस्त्रादिकांनीं मोठा गौरव करून त्यांची रवानगी केली व इंद्रसेनाच्या परवानगीनें विजयादशमी, दिपवाळी इत्यादि सणांनिमित्त जामातास कित्येक दिवस पर्यंत ठेवून घेतलें.

श्वशुरगृहीं असतां एके दिवशीं चित्रांगद कांहीं लोक बरोबर घेऊन यमुनेच्या तीरीं मृगया करण्या करितां गेला. मृगयेमुळें फार श्रम होऊन राजपुत्राला थकवा आला असें पाहून, त्याच्या मुख्य कारभाऱ्यानें तावडतोब एक उत्तम नौका आणविली आणि एक दोन निवडक सेवकांसह राजपुत्राची स्वारी नावेंत बसून जलविहार करण्या करितां निघाली. नौकावाहक राजपुत्रास घेऊन मध्यावर गेले न गेले तों सीमंतिनीच्या दुर्दैवभावल्यामुळेंच कीं काय एकाएकीं प्रचंड वारा सुटून नावाड्यांसही ती नौका अनावर झाली. हें पाहून सर्वांच्या तों-

आहार करी. पतिनिधन झाल्यापासून ती नित्य यमुनास्नान करीत असे.

पुढें एके दिवशीं सीमंतिनी नित्याप्रमाणें यमुनास्नानास गेली असतां तेथें तिची व एका तरुण पुरुषाची एकाएकीं एक नजर होऊन तीं उभयतां तटस्थवृत्ति धारण करून एकमेकांकडे पहात उभीं राहिलीं. मंगलसूत्ररहित कंठ, कुंकुमविरहित भाल, कज्जलविवर्जित नेत्र असें तें सीमंतिनीचें रूप पाहून त्या तरुण पुरुषास फार वाईट वाटलें; त्याच्या डोळ्यांतून खळखळ अश्रुधारा वाहूं लागल्या. तथापि हें कोणाच्याही लक्षांत येऊं न देतां तो मोठ्या अदबीनें ह्मणाला--"हे स्त्रिये, तूं कोणाची कोण आहेस तें मला सांग; तुझी हकीगत ऐकण्याविषयीं मी फार उत्सुक आहें." त्या तरुण पुरुषाच्या सांगण्यावरून सीमंतिनी आपली हकीगत सांगत असतां तिच्या पोटांत भडभडून आलें; नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागून मुखावाटे शब्दही निघेनासा झाला. सीमंतिनीच्या सख्या फार चतुर होत्या; आपल्या धनिनीची झालेली ही अवस्था पाहून त्यांतील एकजण मोठ्या धैर्यानें पण अदबीने ह्मणाली--" महाराज, या आमच्या धनिनीचा-बाईसाहेबांचा--भ्रतार ( बोट दाखवून ) येथें यमुनेंत बुडा-

ल्यास आज तीन वर्षें होत आलीं. शिवाय सासुसास-ऱ्यालाही त्यांच्याच दायादांनीं प्रतिबंधांत ठेविलें आहे. सीमंतिनीच्या दासीचें हें बोलणें ऐकून चित्रांगदाला दुःखाचा मोठा उमाळा आल्यामुळें तो कांहीं वेळ खालीं मान घालून स्तब्ध उभा राहिला.

इकडे सीमंतिनीनें त्या तरुण पुरुषाच्या नकळत दासीला खूण करून त्याची हकीगत ऐकण्याची इच्छा दर्शविली. हें पाहून, त्याला जरी वरचेवर दुःखाचे उसासे येत होते तरी ते त्यानें आंत दाबून बोलण्यास प्रारंभ केला. तो ह्मणाला–' मी सिद्धपुरुष आहें. भूत, भविष्य, वर्तमान सर्व कांहीं मला समजतें. स्वर्ग, मृत्यु, पाताळ या तिहीं लोकीं पाहिजे तेव्हां मी गमन करितों" असें ह्मणून त्यानें सीमंतिनीचा हात धरिला आणि ह्मणाला–" हे लावण्यलतिके सीमंतिनी, तुझा पति जिवंत असून तो आजपासून तिसऱ्या दिवशीं तुला भेटेल. सीमंतिनी, माझ्या वचनावर तूं विश्वास ठेव. मी सांगितलेलें कधींही असत्य व्हावयाचें नाहीं तथापि तीन दिवस पर्यंत तूं ही गोष्ट गुप्त ठेव." असें सांगून तो नैषधनगराकडे निघून गेला.

तिकडे नागराजा वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन राजपुत्र

श्वर्य पाहून राजपुत्र आश्चर्यानें थक्क झाला. नागकन्यांनीं चित्रांगदाला नेऊन आपल्या राजापुढें उभें केलें. राजपुत्रानें नागराजा—तक्षकापुढें साष्टांगनमस्कार घालून त्यास आपली सर्व हकीगत सांगितली. राजपुत्राची हकीगत ऐकून घेऊन तक्षक ह्मणाला—" हे रूपयौवनसंपन्न राजपुत्रा, तुह्मी मर्त्यलोकीं कोणत्या दैवताची उपासना करितां ? " नागश्रेष्ठाचें हें भाषण ऐकून चित्रांगद मोठ्या नम्रतेनें हात जोडून ह्मणाला—" राजाधिराज, आह्मी श्रीशंकराची उपासना करितों. " कश्यपात्मज श्रीशंकराच्या भूषणांपैकींच एक असल्यामुळें आपल्या धन्याचें नांव ऐकतांच नागेंद्राला मोठा आनंद होऊन तो आपली मान डोलवूं लागला व चित्रांगदाला मोठ्या प्रेमानें आलिंगन देऊन ह्मणाला " राजपुत्रा, तुझ्याविषयीं माझ्या मनांत मोठी प्रीति उत्पन्न झाली आहे; तूं नेहमीं माझ्याजवळ असावेंस असें मला वाटतें. तर हे राजपुत्रा, त्वां येथें सुखानें रहावें; तुला येथें कोणत्याही गोष्टीची न्यूनता नाहीं. " फणिश्रेष्ठाच्या या भाषणावर चित्रांगद ह्मणाला—" राजाधिराज, मजविषयीं आपल्या मनांत प्रेमा उत्पन्न झाला हें पाहून मी आपणाला मोठा दैववान् समजतों, पण माझें इतकें अनुकूल दैव कोठें आहे ! !

महाराज, मी आपल्या मातापित्यांचा एकुलता एक पुत्र असल्यामुळें तीं माझ्या वियोगानें फार दुःखी असतील. माझ्यासाठीं त्यांचा जीव तिळ तिळ तुटत असेल; आणि माझी नवयौवना प्रिया सीमंतिनी तर माझ्या विरहदुःखानें आपले प्राणच त्यागील( हें बोलत असतां राजपुत्राचे डोळे पाण्यानें भरून आले. ) " यासाठीं या आपल्या दीनदासाला मृत्युलोकीं पोहोंचवावें. "

राजपुत्राचे हे बोल ऐकून तक्षकाला त्याची मोठी कींव आली. त्यानें प्रसन्नचित्तानें--" राजपुत्रा, तुला द्वादशसहस्र नागांचें बळ दिलें आणि जेव्हां तूं माझें स्मरण करशील तेव्हां येऊन मी तुझें साहाय्य करीन " असें सांगून त्यानें राजपुत्राला पुष्कळ अमूल्य वस्तु दिल्या व बरोबर एक नाग देऊन त्याला यमुनेच्या तीरीं आणून सोडिलें.

इकडे सीमंतिनीवर जरी दुःखाचे डोंगर कोसळले होते तरी ऋषिपत्नीनें सांगितलेलें व्रत तिनें मोडलें नाहीं. ती नित्य उपोषित राहून ब्राह्मणभोजन व दंपत्यपूजन करी आणि संध्याकाळीं श्रीशंकराची षोडशोपचारें पूजा केल्यावर आपल्या प्रियपतीचें स्मरण करून थोडा

आशा नसल्यामुळें ती फिरून मोठ्या विस्मयांत पडली. तिचें मन गोंधळून जाऊन तिला कांहीं सुचेनासें झालें; तिनें परमेश्वराची अनन्यभावें प्रार्थना करून ह्मटलें— " भो भक्तकामकल्पद्रुम गिरिजारमणा, त्या तरुण सिद्ध पुरुषानें सांगितल्याप्रमाणें तीन दिवसांत माझ्या प्रिय पतीची भेट होईल तर तत्प्रीत्यर्थ तुझ्या नांवानें अकरा लक्ष दंपत्यें पूजीन. "

वरील शब्द सीमंतिनीच्या तोंडून निघाले मात्र; तोंच राजपुत्र चित्रांगद नैषधपुरास आल्याचें आनंददायक वर्तमान चित्रवर्म्यास दूतमुखें कळलें. त्यावेळीं राजा, राणी व पतिनिधनदुःखाच्या कष्टतम स्थितींत जिनें तीन वर्षें कंठलीं त्या सीमंतिनीला मोठा आनंद झाला हें सांगावयास नकोच. ही आनंददायक वार्ता आणणाऱ्या हेरास चित्रवर्मानें उत्तम भरजरी पोषाख दिला आणि सर्व नगर शृंगारून ठिकठिकाणीं आनंदोत्सव सुरू केले. सीमंतिनीकरवीं दिव्यालंकार लेववून कंठीं मंगलसूत्र बांधिलें आणि सौभाग्यसंबंधीं करावयाचे ते सर्व उपचार केले.

चित्रांगदाची मृतक्रिया झाली होती ह्मणून जीवनोपायादि संस्कार पुनः करण्यासाठीं चित्रवर्म्यानें जामातास

बोलावणें पाठविलें. चित्रांगदही आपल्या मातापित्यांसह मोठ्या लवाजम्यानिशीं श्वशुरगृहीं यावयास निघाला. चित्रांगद् येत आहे असें कळतांच चित्रवर्मा आपले सरदार, मानकरी, स्वार, शिबंदी यांसह कित्येक कोस पर्यंत त्यांस सामोरा आला. चित्रांगदास पहातांच चित्रवर्म्यांला प्रेमाचा मोठा पूर आला. त्यानें धांवत जाऊन जामताच्या कंठीं मिठी घातली.मग उभयतांचे कुशलप्रश्न झाल्यावर चित्रवर्म्यानें इंद्रसेन व लावण्यवती यांची मोठ्या आनंदानें भेट घेतली आणि त्यांस मोठ्या समारंभानें मिरवत मिरवत नगरांत आणिलें. चित्रांगद् हा गुणवान् व देखणा असल्यामुळें त्याला पहाण्यासाठीं बायकापुरुषांचे दुतर्फा थवेच्या थवे उभे होते. चित्रांगदास पहातांच कित्येक वृद्ध बायांच्या पोटांत पुत्रवात्सल्य उत्पन्न झालें. उपवर झालेल्या सुस्वरूप मुली हात जोडून " जय देवबापा, आह्मांला असाच पति मिळूंदे " असें ह्मणाल्या आणि जिकडे तिकडे सीमंतिनीविषयीं स्तुतीपर पोंवाडे ऐकूं येऊं लागले.

पुढें राजवाड्यांत गेल्यावर सीमंतिनी व चित्रांगद यांचे जीवनोपाय व विवाहादि संस्कार पुनः झाले; तेव्हां त्यांवर सुरगणांनीं आकाशांतून सुमनवृष्टि केली आणि प्रजा-

चित्रांगद परमेश्वराच्या कृपाप्रसादानें ' द्वादशसहस्र नागबली ' होऊन आला आहे आणि प्रसंग विशेषीं नागांचा राजा तक्षक त्याचें साहाय्य करण्यास तयार आहे ' असें सर्वत्र सांगूं लागला. प्रथम या गोष्टीचें सर्वांस मोठें आश्चर्य वाटलें. पण ज्या अर्थी हा वृद्ध ब्राह्मण सांगतो (त्या काळांत सर्व लोकांचा ब्राह्मणांवर पूर्ण विश्वास होता) त्या अर्थीं ती खरीच असावी असें पुष्कळांस वाटलें. मग काय विचारावें ! ! हं हं ह्मणतां ती बातमी सर्वतोमुखीं झाली. ज्यांनीं इंद्रसेन व लावण्यवती यांना कारागृहांत ठेविलें होतें त्यांना हें वर्तमान ऐकून मोठी धास्ती पडली; त्यांनीं इंद्रसेन व लावण्यवती यांची क्षमा मागून त्यांस बंधमुक्त केलें आणि त्यांचें पूर्वीचें सर्व राज्य त्यांच्या स्वाधीन केलें.

चित्रांगद निघाला तो नैषधपुराच्या बाहेर एका मोठ्या रम्य उपवनांत जाऊन उतरला. आपला पुत्र आल्याची बातमी कळतांच इंद्रसेन व लावण्यवती यांना मोठा आनंद होऊन जगच्चालकाच्या अगाध कर्तृत्वाचें मोठें नवल वाटलें. राजाज्ञेनें नगरांत जिकडे तिकडे आनंदोत्सव सुरू झाला. चित्रांगदानें सुमुहूर्त पाहून नगरांत प्रवेश केला; त्यावेळीं प्रजाजनांनीं मोठ्या आनंदानें

राजपुत्रावर सोन्याचीं फुलें उधळलीं. चित्रांगदानें आपल्या मातापित्यांस पहातांच सद्गदित होऊन त्यांच्या चरणीं लोटांगण घातलें. लावण्यवतीला तर पुत्रवात्सल्यामुळें मोठा गहिंवर येऊन तिच्या मुखावाटे शब्दही निघेना; तिनें चित्रांगदाला पोटाशीं धरिलें आणि ज्याप्रमाणें वनवास करून चतुर्दश वर्षांनीं श्रीरामचंद्र कौसल्येस भेटले तद्वत सौख्य होऊन लावण्यवती व इंद्रसेन यांना प्रेमाचा जो हुंदका आला तो कांहीं केल्या आंवरेना; कंठ सद्गदित होऊन नेत्रांतून आनंदाच्या अश्रुधारा वाहूं लागल्या. सारांश—तो दिवस सणाप्रमाणें सर्वांस मोठा आनंददायक वाटला.

आतां आपण सीमंतिनीच्या हकीगतीकडे वळूं. सीमंतिनीनें प्रथमच जेव्हां त्या तरुण पुरुषास पाहिलें तेव्हां तिला हाच चित्रांगद असावा असें वाटलें. कांहींही असो. ज्या अर्थीं त्या तरुण सिद्धपुरुषानें हात धरून ‘ सीमंतिनी, तुझा पति जीवंत असून तो आजपासून तिसऱ्या दिवशीं तुला भेटेल. माझ्या वचनावर तूं विश्वास ठेव. मी सांगितलेलें कधींही असत्य व्हावयाचे नाहीं. ’ इ० त्यानें काढिलेल्या उद्गारांवरून तर तिची शंकाच फिटली. पण एकदां मृत झालेला प्राणी पुनः जिवंत होण्याची

मला मोठा आनंद झाला. आतां आपणाला माझी अशी विनंति आहे कीं, नैषधपुरीं चित्रांगदराजाची धर्मपत्नी सीमंतिनी ' मृत्युंजयमृडानी ' प्रीत्यर्थ नित्य दंपत्यपूजा करीत असते, तर तुह्मां दोघांतून एक पुरूष व एक स्त्री होऊन दंपत्यवेषानें तुह्मीं तेथें जावें ह्मणजे ती तुमचा मोठा सत्कार करून दिव्यालंकारांसह तुमची षोडशोपचारें पूजा करील व दक्षिणा ह्मणून पुष्कळ धन देईल; मग तुह्मी मजकडे या ह्मणजे मीही तुह्मांला अभय करीन. " राजाचें हें विनोदाचें भाषण ऐकून द्विजपुत्रांना मोठें आश्चर्य वाटलें; ते ह्मणाले—" राजाधिराज, पुरुषानें स्त्रीवेष घेणें हें मोठें निंद्य व अनुचित कृत्य असून शिवाय कामिनीवेष घेणाऱ्या पुरुषाला पुनः पुनः तोच जन्म घ्यावा लागतो अशी कडक शास्त्राज्ञा आहे. सारांश, पुरुषानें आपलें पौरुष सांडून बांगड्या भरणें कोणालाही संमत नाहीं. महाराज, आह्मी विप्रसुत, तशांत सर्व धनांमध्यें श्रेष्ठ जें विद्याधन तें आह्मांजवळ परिपूर्ण आहे; त्याच्या योगानें आह्मांला पुष्कळ राजे प्रसन्न होतील. " पण राजाला सीमंतिनीचें सत्व पहावयाचें होतें ह्मणून तो तसें करण्याविषयीं त्यांना पुनः पुनः आग्रह करूं लागला. मग सीमंतिनीसारख्या नि-

स्सिम पतिव्रतेचा पुण्यमहिमा सर्व जगाला कळावा ह्म-णन ह्मणा अगर होणार ह्मणून ह्मणा त्यांना तशी बु-द्धि झाली. माता, पिता, गुरु आणि राजा यांची आज्ञा कधींही अमान्य करूं नये; या वचनाचा त्या विप्रसुतां-ना मोह पडून त्यांनीं राजाचें ह्मणणें मान्य केलें.

मग राजानें उत्तम वस्त्रें व अलंकार आणविले; सो-मवंतानें स्त्रीवेष घेतला आणि सीमंतिनीचें सत्व पहाण्या-करितांच कीं काय त्या वेषधारी दंपत्यानें नैषधपुरीकडे गमन केलें.

नैषधपुरीस दंपत्यपूजनाचा समारंभ चालल्याची वार्ता ऐकून पुष्कळ दंपत्यें तेथें येत; त्याप्रमाणेंच हें वेष-धारी दंपत्यही अगदीं ऐन पूजेच्यावेळीं तेथें येऊन पोहोंचलें. सीमंतिनीनें त्या दंपत्याचा मोठा आदरसत्कार केला, पण यांत कांहींतरी कपट असावें असें त्या साध्वीनें तेव्हांच ताडलें; परंतु आपलें सत्व जाऊं नये ह्मणून तिनें पूजाप्रसंगीं त्या दंपत्याच्या मस्तकीं आपला हस्त ठेविला आणि ‘ हर गौरी ’ असें ह्मणून त्या दंप-त्याची षोडशोपचारें पूजा करून सुग्रास भोजन व दक्षिणा ह्मणून पुष्कळ धन दिलें आणि ‘ शिवपार्वती ’ असें मानून त्यांस नमस्कार केला.

जनांनींही आपली स्वामिनिष्ठा उत्तम प्रकारें व्यक्त केली.

इकडे सीमंतिनी व चित्रांगद यांच्या आनंदाला तर पारावारच नाहींसा झाला; त्यांची एकांतीं गांठ पडल्यावर एकमेकांच्या प्रेमालिंगनांत आनंदाचें भरतें आंवरेना. चित्रांगदानें सीमंतिनीला आपली हकीगत सांगून नागलोकाहून आणिलेले सर्व अलंकार स्वहस्तें लेवविले.

सीमंतिनीनें मोठ्या आनंदानें सासुसासरा, मातापिता आणि वडील आप्तजनांच्या चरणीं मस्तक ठेवून त्यांचे कल्याणप्रद आशीर्वाद घेतले. चित्रांगद व सीमंतिनी यांचा तो रतिमदनतुल्य जोडा पाहून सर्वांस मोठा आनंद झाला आणि ज्यानें हा परमानंदाचा दिवस दाखविला त्या परमेश्वराच्या अगाध करणीचें सर्वांस मोठें कौतुक वाटलें.

याप्रमाणें आनंदांत बरेच दिवस लोटल्यावर चित्रांगद आणि सीमंतिनी यांसह इंद्रसेन नैषधपुरास परत आला. नैषधपुरास आल्यावर इंद्रसेनानें आपले वृद्ध चतुर मंत्री आणि मांडलिकराजे यांच्या विचारानें चित्रांगदास राज्याभिषेक केला व आपण या नरदेहाचें सार्थक व्हावें ह्मणून तपश्चर्या करण्या करितां वनांत गेला.

# वेषधारी दंपत्य.

( सुमेधा आणि स्त्रीरूपी सोमवंत )

मागील गोष्टीचा शेवट गोड झाला हें फार चांगलें झालें. सीमंतिनीची दुःखस्थिती संपून जरी आज ती पतीसह आनंदपर्वताच्या अत्युच्च शिखरावर बसली होती तरी त्याबद्दल तिला यत्किंचितही गर्व नव्हता. स्वभाव पालटण्याला एव्हढें मोठें स्थित्यंतर झालें असूनही तिची मूळचीच वृत्ति कायम राहिली हें प्रत्येकानें पूर्णपणें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. परमेश्वराच्या पूर्ण कृपेचेंच हें फळ आहे असें ती पक्केपणीं जाणत होती आणि तदनुरूप तिचें आचरण ही असे; तिनें आपल्या पतिप्रीत्यर्थ केलेल्या नवसाप्रमाणें अकरालक्ष दंपत्यांची पूजा करण्याचा निश्चय करून तो तावडतोब अमलांतही आणिला.

याप्रमाणें सीमंतिनी दंपत्यपूजन करीत असतां विदर्भ नगरींतील सुमेधा आणि सोमवंत या नांवाचे दोन ब्राह्मणपुत्र दशग्रंथांचा उत्तम अभ्यास करून पितृआज्ञेनें आपल्या देशच्या राजाला भेटावयास गेले. द्विजपुत्रांची विद्वत्ता पाहून वैदर्भराजास मनांत मोठा संतोष वाटला. तो ह्मणाला-"महाराज, आपली विद्वत्ता पाहून

पुढें काय प्रकार झाला तो पहा ! तें वेषधारी दंपत्य मोठ्या आनंदानें वैदर्भ नगरीस परत जात असतां वाटेंत त्या स्त्रीरूपी सोमवंताचीं आपल्या पतीशीं-सुमेधाशीं— चाललेलीं विनोदयुक्त भाषणें ऐकून पुष्कळ लोकांस हंसूं येई. याप्रमाणें तीं बरींच दूर गेल्यावर त्यांस एक निबिड कुंजवन लागलें; तें एकांत स्थान पाहतांच स्त्रीरूपी सोमवंताला पंचशरानें आपल्या बाणांनीं घायाळ करून सोडिल्यामुळेंच कीं काय त्यानें सुमेधाच्या कंठीं मिठी घातली. हें पाहून सुमेधा ह्मणाला-" मित्रा सोमवंता, तूं व मी गुरुबंधु, तशांत दशग्रंथी व ब्रह्मचारी असें असून तूं हें वेड्यासारखें काय करितोस ? अरे मार्गांत जाणारे येणारे लोक आपल्याला पाहून हंसतातनां ! तर तूं आपला हा स्त्रीवेष टाकून देऊन मजबरोबर निमुटपणीं चल कसा ! त्या बिचाऱ्याला सोमवंताची ' सोमवंती ' झाली हें काय माहीत !! सोमवंती कामराजाच्या तडाख्यांत सांपडल्यामुळें बेहोष होऊन जमिनीवर पडली; तें पाहून तो सुमेधानामें ब्राह्मणपुत्र अतिशय घाबरून गेला. आपला मित्र पुरुष नसून स्त्री झाला आहे अशी जेव्हां त्याची खात्री झाली; तेव्हां या गोष्टीचें त्याला मोठें आश्चर्य वाटून पश्चात्तापही झाला. तशांत त्या स्त्रीरूपी सोमवंतानें तर त्याला ' त्राहि भगवान ' करून

सोडिल्यामुळें मी या राजाच्या नादीं लागून आपल्याला कुठला हा गळफांस लावून घेतला असें झालें. आपल्या मूर्खपणाबद्दल सुमेधानें आपली पुष्कळ निर्भत्सना केली. आणि 'इतःपर कोणाच्याही नादीं लागावयाचें नाहीं' असें ह्मणून आपले कान पिरगळले, जीभ चावली आणि आलेलें संकट टाळण्यासाठीं त्यानें परमेश्वराची पुष्कळ प्रार्थना केली.

शेवटीं सुमेधानें त्या स्त्रीरूपी सोमवंताला मोठा धाक दाखवून व बोधाच्या दोन गोष्टी सांगून ह्मटलें—" सोमवंता, आपण आपल्या घरीं जाऊं आणि तेथें या गोष्टीचा विचार करूं. " सोमवंत जसा तसा एकदांचा कबूल झाला आणि ते दोघे आपल्या घरीं जावयास निघाले.

घरीं आल्यावर सुमेधानें सोमवंताला त्याच्या पित्याच्या स्वाधीन करून घडलेलें यच्चयावत् वर्तमान त्याला सांगितलें. हातातोंडास आलेला, तशांत विद्वान व एकुलता एकच पुत्र आणि त्याची ही स्थिति पाहून सारस्वतानें—सोमवंताच्या पित्यानें—राजवाड्यांत जाऊन मोठा अनर्थ मांडला आणि राजानें आपला सर्वस्वीं घात केला ह्मणून त्यावर शिव्या—शापांची वृष्टी करून त्या ब्राह्मणानें प्राणत्यागाचीच वेळ आणिली. हें पाहून राजाला फार वाईट वाटलें. त्यानें आपल्या हातून घडलेल्या या

घोर अपराधाबद्दल त्या ब्राह्मणाचा अनन्यभावें क्षमा मागितली.

हें कृत्रिम सत्य कसें झालें ह्याचें राजाला मोठें आश्चर्य वाटलें; त्यानें या गोष्टीचा पुष्कळ विचार केला पण यांतलें इंगित कांहीं त्याला कळेना; तेव्हां त्यानें नगरांतील सर्व ब्राह्मणांस बोलावून त्यांस सांगितलें कीं, "जेणेंकरून या विप्रसुताला त्याची पूर्वस्थिति प्राप्त होईल असें कडकडीत अनुष्ठान करा." राजाचें हें भाषण ऐकून ब्राह्मण ह्मणाले—"नृपश्रेष्ठा, हें ईश्वरी कर्तृत्व आह्मां मानवांच्या हातून कदापिही फिरावयाचें नाहीं."

ब्रह्मवृंदाच्या या भाषणानें राजालाही पण रागच आला; त्यानें स्वतः सात दिवसपर्यंत निराहार उपोषण करून त्या स्त्रीरूपी सोमवंतासह भयंकर हवन आरंभिलें. पूर्णाहुति होतांच देवीनें प्रत्यक्ष दर्शन दिलें; तेव्हां वैदर्भाधिपतीनें त्या स्त्रीरूपी सोमवंतास पुढें करून व आपण साष्टांग नमस्कार घालून प्रार्थना केली कीं, "मातोश्री, हा सारस्वत नांवाच्या ब्राह्मणाचा एकुलता एक व महाविद्वान् पुत्र असून या हतभागी दासाच्या महान अपराधामुळें याला ही स्थिति प्राप्त झाली आहे; तर हे भक्तवत्सले, या शरणागतावर कृपा करून या विप्रसुताला याची पूर्वस्थिति प्राप्त होईल असें कर." राजाचें हें भाषण ऐकून

१८४



देवी ह्मणाली–" हे लोकपाला, सीमंतिनी सारख्या निस्सीम पतिव्रतेचें कर्तृत्व फिरविण्यास कोणीही समर्थ नाहीं; या साठीं त्या पतिव्रतेच्या इच्छेनुरूप सुमेधा आणि सोमवंत ( प्रस्तुत स्त्री ) यांचा विवाह व्हावा हेंच उचित. नृपश्रेष्ठा, सारस्वताच्या वंशवृद्धीस्तव त्याला वेद व शास्त्रसंपन्न असा एक दिव्य पुत्र होईल. " असें सांगून ती देवी अंतर्धान पावली.

पुढें लवकरच देवीनें सांगितल्याप्रमाणें सुमेधा व स्त्री-रूपी सोमवंत यांचा विवाह होऊन तीं मोठ्या आनंदानें संसार करूं लागलीं.

वरील गोष्टीवरून आमच्या वाचकांना पुष्कळ बोध होण्यासारखा आहे. पहा; जिनें आपल्या अंगच्या सद्गु-णांनीं परमेश्वरास प्रसन्न करून घेऊन आपलें नष्ट झालेलें सौभाग्य पुनः मिळविलें; ज्या पतिव्रतेचें कर्तृत्व फि-रविण्यास प्रत्यक्ष देवीही असमर्थ होती; त्या परम सा-ध्वीचें कितीही वर्णन केलें तरी तें अपुरेंच होणार. असो; आमची आमच्या देशबंधु-भगिनींस अशी प्रार्थना आहे कीं, त्यांनींही सीमंतिनीप्रमाणें सद्गुणी होऊन लोकादरास पात्र व्हावें.

---

पुरंदरे आणि कंपनीनें मुंबईंत "गणपत कृष्णाजीच्या" प्रे छा.